जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार २३ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.००✦ पृष्ठ १०

मुख्य न्यायाधीश म्हणाले

आमचा वेळ वाया घालवू नका

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी कॉक्रोच जनता पक्षाच्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, 'आम्हाला व्हिडिओ पाहण्यात कोणतीही रु ची नाही. आमच्याकडे ते पाहण्यासाठी वेळ नाही. आम्हाला व्हिडिओ पाहायचे नाहीत.' जेव्हा वकिलांनी पुन्हा विद्यार्थ्यांवरील मारहाण आणि व्हिडिओचा उल्लेख केला, तेव्हा सरन्यायाधीश म्हणाले, 'आमचा वेळ वाया घालवू नका.'

CJP वरील पोलिसांच्या कारवाईविरोधात SC त सुनावणी नाही; व्हिडिओ पाहण्यासाठी वेळ नाही

कॉक्रोच जनता पक्षाने २० जुलै रोजी संसद मार्च काढला होता. यावेळी हजारो आंदोलक संसदेच्या दिशेने पुढे सरसावले होते, त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केला होता. यात १०० हून अधिक पोलीस कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना दुखापती झाल्या होत्या. २० जुलै रोजी काकरोच जनता पक्षाने संसद मार्च काढला होता. यावेळी अनेक ठिकाणी पोलिस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली होती.

याचिकाकर्त्या वकिलांनी म्हटले की, विद्यार्थ्यांकडून महत्त्वाचे मुद्दे ऊस्थित केले जात आहेत. ते नीट परीक्षेचे योग्य संचालन आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीमध्ये सुधारणा यांसारख्या मुद्द्यांवर बोलत आहेत. यावेळी सीजेआय सूर्यकांत यांनी त्यांना थांबवत म्हटले, खूप खूप धन्यवाद. याचिकाकर्त्या वकिलांनी सांगितले की, पोलिसांच्या कथित क्रुरतेचे व्हिडिओ देखील आहेत. शक्य असल्यास, या प्रकरणाची सुनावणी गुरु वारी करावी, कारण विद्यार्थी अजूनही प्रभावित आहेत. यावर सीजेआय म्हणाले, 'आम्हाला व्हिडिओमध्ये रस नाही, आमच्याकडे पाहण्यासाठी वेळ नाही.' दिल्ली उच्च न्यायालयानेही तातडीच्या सुनावणीस नकार दिला.मंगळवारी असेच एक प्रकरण दिल्ली उच्च न्यायालयातही पोहोचले होते. तेव्हा दिल्ली उच्च न्यायालयानेही अशाच याचिकेवर तातडीच्या सुनावणीस नकार दिला होता. कोर्टाला यात ओढू नका, असे म्हटले होते.

आधी धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, मग चर्चा

लोकसभा उद्यापर्यंत तहकूब; महिला खासदारावर टिप्पणी प्रकरणी कल्याण बॅनर्जी निलंबित

काळ्या कपड्यांमध्ये विरोधी खासदारांनी संसदेबाहेर घोषणाबाजी केली.

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान बुधवारी विरोधकांनी कॉक्रोच जनता पक्षाच्या समर्थकांवरील पोलीस कारवाईच्या मुद्द्यावरू न गदारोळ केला. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी लोकसभेत विचारले की, पोलिसांना मुलींचे कपडे फाडण्याचा अधिकार कोणी दिला? लोकसभेत काँग्रेस खासदार के.सी. वेणुगोपाल म्हणाले की, विरोधकांची मागणी अगदी स्पष्ट आहे की केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. त्याला ऊत्तर देताना संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू म्हणाले की, सरकार गेल्या तीन दिवसांपासून NEET पेपरफुटीच्या मुद्द्यावर सातत्याने चर्चेची ऑफर देत आहे. राहुल गांधी यांच्यासह इतर विरोधी खासदार काळे कपडे घालून संसदेत पोहोचले. विरोधी पक्ष २० जुलैच्या संसद मार्चदरम्यान विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाई, पेपरफुटी आणि धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सातत्याने आंदोलन करत आहे. टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांना पावसाळी अधिवेशनातून निलंबित करण्यात आले. महिला खासदारांविरु द्ध अपमानास्पद भाषा वापरल्याबद्दल कल्याण यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. मे २०२६ मध्ये, तृणमूल काँग्रेसच्या खासदार काकोली घोष दस्तीदार यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून कल्याण बॅनर्जी यांच्याविरु द्ध औपचारिक तक्रार दाखल केली होती. मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, 'आधी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, त्यानंतर सभागृहात या विषयावर चर्चा होईल. पंतप्रधान मोदींनी आधी यावर आश्वासन द्यावे. वास्तविक पाहता, सरकार सभागृहात नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे.'

लोकसभेचे कामकाज गुरु वारपर्यंत तहकूब- लोकसभेतील गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज गुरु वारपर्यंत तहकूब करण्यात आले आहे. राज्यसभेचे कामकाज आज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब राहील. लोकसभेत नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यास सरकारने सहमती दर्शवली आहे. यानंतर, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संसदेत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, लोकसभेत या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यास सरकारने सहमती दर्शवली आहे. इतकेच नाही, तर चर्चेचे नियम, तारीख आणि कालावधी निश्चित करण्यासाठी सर्व पक्षांची बैठक बोलावण्याची विनंती सरकारने लोकसभेच्या अध्यक्षांना केली आहे.

लोकसभेत काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी सांगितले की, विरोधी पक्षांची मागणी स्पष्ट आहे: केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. यावर ऊत्तर देताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, गेल्या तीन दिवसांपासून सरकार सातत्याने सांगत आहे की ते नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे. त्यांनी सांगितले की, सरकारला प्रस्थापित नियमांच्या चौकटीत राहून अर्थपूर्ण चर्चा हवी आहे, जेणेकरून देशातील तरु ण आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करता येईल.लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजता सुरू झाले. किरेन रिजिजू यांनी सभागृहात सांगितले, 'सरकार चर्चेसाठी तयार आहे. सर्व पक्षनेत्यांशी सल्लामसलत करून निर्णय घेतला पाहिजे.➪(पान २ वर)

सीजेपीला बांगलादेश आणि पाकिस्तानकडून पाठिंबा-निशिकांत दुबे

भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी २१ जुलै रोजी पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर झालेल्या आंदोलनावरू न राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले, 'काल राहुल गांधी ज्या प्रकारे आंदोलन करत होते, त्याच प्रकारे जर माझा मुलगा परीक्षेला ऊशिरा पोहोचला असता, तर त्याच्यासाठी काही वेगळी व्यवस्था केली गेली असती का? तो एका नेत्याचा मुलगा नाही का, तो विद्यार्थी नाही का, तो परीक्षार्थी नाही का? असे लज्जास्पद राजकारण फक्त काँग्रेस पक्षच करू शकतो.' दुबे म्हणाले, 'जंतर मंतर येथील आंदोलनाला बांगलादेश, पाकिस्तान आणि काही इस्लामी देशांकडून पाठिंबा मिळत आहे. अशा लोकांसोबत उभे राहून काँग्रेस पक्ष देश तोडण्याच्या कटाचा भाग बनत आहे. गांधी कुटुंब देशद्रोही घटकांसोबत उभे असल्याचे दिसत आहे.'

आज महाराष्ट्र बंद

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने

मुंबई/प्रतिनिधी : राज्यात पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर उद्या २३ जुलै रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या आंदोलनात डावी लोकशाही आघाडी, संविधानवादी आघाडी, महाविकास आघाडी, आंबेडकरवादी पक्ष व संघटना, विविध पुरोगामी पक्ष, विद्यार्थी, युवक, महिला, शेतकरी, शेतमजूर, कामगार संघटना तसेच इतर सामाजिक संघटनांचा सहभाग असणार आहे.

आयोजकांनी सर्व नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांच्या पदाधिक-यांना महाराष्ट्र बंदमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होणा-या निदर्शनात ऊस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. यावेळी विद्यार्थ्यांवर झालेला लाठीमार, शांततेच्या मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनाचे दमण यासह इतर प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी घोषणाबाजी व शांततापूर्ण आंदोलन करण्यात येणार असल्याचेही आयोजकांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र बंद यशस्वी करण्यासाठी सर्व घटकांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहन आंदोलनकर्त्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्यातील 533 शेतक-यांची पहिली यादी जाहीर

मुंबई/प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि माजी ऊमुख्यमंत्री अजित पवार यांची पहिली जयंती याचे औचित्य साधत राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र ५३३ शेतक-यांची पहिली प्रातिनिधीक यादी जाहीर केली. मंत्रालयात आयोजित सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी याबाबतची घोषणा केली. राज्यातील ५६ लाख शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. महात्मा फुले शेतकरी कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या १२ लाख शेतक-यांनाही २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.आजपर्यंतची सगळ्यात मोठी अशी ही ऐतिहासिक कर्जमाफी योजना असणार असल्याचे बाबासाहेब पाटील म्हणाले. कर्जमाफी योजनेसाठी ४० हजार ९८० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यानंतर नुकत्यात पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ही योजना आणखीन विस्तारित करण्यात आली. महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतक-यांचाही समावेश यात करण्यात आला. आता बुधवारी अधिकृतरित्या प्रातिनिधीक स्वरू पात सात जिल्ह्यातील निवडक ५३३ पात्र लाभार्थ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली. लाभार्थी शेतक-यांची यादी आणि लाभ वितरणाची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक करण्यात आली आहे. ही योजना केवळ कर्जमुक्ती नसून शेतक-यांवरील आर्थिक ताण कमी करु न त्यांना नव्या जोमाने शेती करता यावी यासाठी आमचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. यापूर्वी कर्जमाफी झाल्यास शेतक-याला कर्ज मिळत नव्हते.➪(पान २ वर)

दिल्लीतील मेट्रो स्थानके अनिश्चित काळासाठी बंद

नवी दिल्ली : दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या तीव्र आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेची खबरदारी म्हणून दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने बुधवारी सकाळी मोठा निर्णय घेतला. राजीव चौक, सेंट्रल सेक्रेटरीएट, मंडी हाउस, आयटीओ आणि खान मार्केट या प्रमुख स्थानकांसह एकूण १६ मेट्रो स्थानके पुढील आदेश येईपर्यंत प्रवाशांसाठी बंद ठेवण्यात आली आहेत. कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनासाठी दिल्लीत हजारो आंदोलक जमा झाले असून सुरक्षेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी दिल्ली पोलीस आणि प्रशासनाच्या सूचनेनुसार १६ मेट्रो स्थानके बंद करण्यात आली आहेत. दरम्यान, या मेट्रो स्थानकांची एन्ट्री आणि एक्झिट गेट्स बंद असले तरी राजीव चौक, मंडी हाउस आणि सेंट्रल सेक्रेटरीएट या महत्त्वाच्या जंक्शनवर स्थानकांदरम्यान गाड्या बदलण्याची सुविधा सुरू च राहेल, अशी माहिती डीएमआरसीने दिली. मेट्रो सेवा विस्कळीत झाल्याने सकाळी कामावर निघणा-या आणि प्रवास करणा-या सामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतरच ही स्थानके पुन्हा ऊघडण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

अनंतनागमध्ये दहशतवादी हल्ला

अनंतनाग : दक्षिण कश्मीरमधील अनंतनागमध्ये गस्त घालणा-या पोलिसांवर बुधवारी दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात एक क?न्स्टेबल गंभीर जखमी झाला. जखमी कॉन्स्टेबलला तात्काळ ऊपचारासाठी रु ग्णालयात नेण्यात आले, तिथे ऊपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. आशिक हुसेन कुरेशी असे शहिद क?न्स्टेबलचे नाव आहे. या घटनेनंतर परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. कुरेशी हे अनंतनागच्या लाल चौक परिसरात कोकरनाग रस्त्यावर कर्तव्यावर होते. यादरम्यान एका वाहनातून आलेल्या दहशतवाद्यांनी कुरेशी यांना लक्ष्य करत त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात आशिक हुसेन घटनास्थळीच गंभीर जखमी होउन कोसळले. हल्ल्यानंतर हल्लेखोर तात्काळ घटनास्थळावरू न पळून गेले. सहकारी जवान आणि स्थानिकांच्या मदतीने त्यांना ऊपचारासाठी जवळच्या जीएमसी अनंतनाग रु ग्णालयात दाखल करण्यात आले. दहशतवाद्यांच्या गंभीर जखमी झाल्याने रु ग्णालयात ऊपचारादरम्यान कुरेशी यांचा मृत्यू झाला. शहीद हेड कान्स्टेबल आशिक हुसेन कुरेशी➪(पान २ वर)

विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जने अन्ना हजारे दुःखी, केंद्र सरकारला पत्र; करणार आंदोलन

मुंबई/प्रतिनिधी :नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावरू न दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जमुळे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे दुःखी झाले आहेत. त्यांनी केंद्र सरकारला पत्र लिहून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर करत अहिल्यानगरच्या वांडिया पार्क येथील गांधी स्मारकावर मौन आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. गुरु वारी सकाळी ११ ते दुपारी १ दरम्यान ते आंदोलन करतील. या ठिकाणाला प्रतीकात्मकरीत्या 'नगरचे जंतर-मंतर' असे नाव देण्यात येणार आहे. सरकारला लिहिलेल्या पत्रात अण्णा म्हणाले, 'लोकशाहीत दडपशाहीऐवजी संवादाच्या माध्यमातून प्रश्न सोडवायला हवेत. विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जची घटना अत्यंत दुःखद आहे. गेल्या २५ दिवसांपासून विद्यार्थी आंदोलन करत आहेत. गैरप्रकार घडल्यास केवळ छोट्या कर्मचा-यांवर कारवाई न करता, वरच्या पातळीवरही जबाबदारी निश्चित व्हायला हवी. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेतल्यान सरकार कोसळणार नाही. ऊलट, इतर मंत्र्यांनाही आपल्या खात्याचा कारभार योग्य पद्धतीने करण्याचा स्पष्ट संदेश जाईल. दुस-या बाजूला, काकरोच जनता पार्टीचे जंतर-मंतरवर आंदोलन सुरू च आहे. सीजेपीचा मुख्य प्रवक्ता सौरव दासने ने म्हटले आहे की, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी दुस-यांदा चर्चेसाठी बोलावले आहे. मात्र, जोवर मागण्या मान्य होत नाहीत, तोवर आपण त्यांची भेट घेणार नाहीत. आमचा वेळ मुल्यवान आहे.' एवढेच नाही तर, मागण्या पूर्ण करणार असाल तरच आमच्याशी बोल,' असे सांगत CJP ने आपल्या अटींवर ठाम असल्याचे स्पष्ट केले आहे.

जंतर-मंतरवर विद्यार्थी-पोलिसांत झटापट:पोलिसांनी अश्रु धुराचा मारा केला

कॉक्रोचसाठी कोलकाता येथून सुमारे 2,000 जवान दिल्लीत दाखल

नवी दिल्ली : बुधवारी रात्री दिल्लीतील जंतर मंतर येथे विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. सीजेपीच्या आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फेकल्या.या घटनेचे व्हीडीओ समोर आले असून, त्यामध्ये आंदोलक काठ्या घेउन पोलिस अधिका-यांवर हल्ला करताना दिसत आहेत. यापूर्वी, २० जुलै रोजी सीजेपीच्या संसद मोर्चादरम्यान संघर्ष झाला होता. आंदोलक संसदेच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचले होते आणि त्यांना पांगवण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला होता. अभिजीत दीपके यांनी सोनम वांगचुक यांना ऊपोषण संपवण्याचे आवाहन केले. देशाला त्यांची गरज आहे, असे सांगून पक्षाचे शांततापूर्ण आंदोलन सुरू च राहील, असे आश्वासन दिले. केंद्र सरकारने दिल्लीत पश्चिम बंगालमधून २० अतिरिक्त सीआरपीएफ कंपन्या तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार पश्चिम बंगालमधील कोलकाता येथून सुमारे २,००० जवानांना विमानाने आणण्यात आले. सुरक्षेच्या कारणास्तव दिल्लीतील सोळा मेट्रो स्थानके बंद करण्यात आली होती. मात्र, सायंकाळी सर्व स्थानके पुन्हा सुरू झाली. सीजेपीच्या आंदोलनादरम्यान आरएएफ जवानावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये काही आंदोलक आरएएफ जवानाला मारहाण करताना, आरएएफच्या वाहनावर दगडफेक करताना आणि त्याची तोडफोड करताना दिसत आहेत. दिल्ली ऊच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांवरील हल्ल्यासंदर्भातील एका याचिकेवर सुनावणी घेतली. ऊच्च न्यायालयाने सरकारला हल्ल्याचे सीसीटीव्ही फुटेज जतन करण्याचे निर्देश दिले.

गुरुवार २३ जुलै २०२६
E-paper - www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

आरोपी भोंदू दत्तगिरी महाराजला थेट न्यायालयीन कोठडी

-पोलिसांवर सरकारचा दबाव आहे का ? यशोमती ठाकूर यांचा सवाल

चांदूर रेल्वेमधील आनंद मठातील अत्याचार प्रकरण

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-

चांदूर रेल्वे येथील आनंद मठातील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्तगिरी जयराम महाराज (मुळ नाव - जयकृष्ण रघुनाथ सोनटक्के, रा. यावली शहीद) याला चांदूर रेल्वे पोलिसांनी मंगळवारी अटक केली. त्याच दिवशी आरोपीला न्यायालयात हजर केले असता पोलीसांनी पीसीआर न मागितल्याने आरोपीला थेट न्यायालयीन कोठडी मिळाल्याने सदर प्रकरण पुन्हा चर्चेत आले. यानंतर बुधवारी काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर प्रसारमाध्यमांशी बोलतांना चांगल्याच संतापल्या. पोलिसांवर सरकारचा दबाव आहे का ? असा सवाल उपस्थित केला.

यावेळी बोलतांना यशोमती ठाकूर यांनी म्हटले की, आपला अमरावती जिल्हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व गाडगेबाबा यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोन आणि

यांच्या अध्यात्म सोबत जोडलेलो आहोत. पण आता अमरावती जिल्ह्यामध्ये खरात सारखा भोंदू पण येथे आलेला आहे. दत्तगिरी महाराज नाव असलेल्या भोंदूबाबा ने चांदूर रेल्वेत आनंदमठ सुरू केले होते. असे भोंदू बाबा या भाजपच्या साम्राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसत आहे. धर्माचं नाव घ्यायचं, भगवा वस्त्र परिधान करायचा आणि अशी भोंदूगिरी या ठिकाणी सुरू आहे. या सगळ्या गोष्टी खरं अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याच्या अंतर्गत येतात. सदर भोंदू बाबांच्या निर्मितीला हे सरकारचं जबाबदार आहे. या भोंदूबाबा सोबत उत्तरप्रदेशचे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, अमरावती जिल्ह्यातील खासदार अनिल बोंडे, वरुडचे आमदार या सगळ्यांसोबत त्याचे फोटो आहे. अत्याचार करणाऱ्या भोंदूबाबावर कठोर कारवाई झाली पाहिजे. मात्र आश्चर्य आहे की, या भोंदूला एकदम न्यायालयीन कोठडी मिळाली. पोलिसांनी जर अजून चौकशी केली असती तर आणखी काही गोष्टी बाहेर आल्या असत्या. पण कुठेतरी पोलिसांवर सरकारचा दबाव आहे आणि सरकार या भोंदू बाबाला प्रोटेक्ट करण्याचं पूर्ण प्लॅनिंग करून राहिले असं माझं ठाम मत आहे असे यशोमती ठाकूर म्हणाल्या.

खरात सारखे अनेक प्रकरण उघडण्याची शक्यता ?

सदर आरोपी महाराजाला अटक केल्यानंतर खरात सारखे अनेक प्रकरणे उघड होण्याची शक्यता चांदूर रेल्वे शहरात चर्चेतून व्यक्त केली जात होती. मात्र आरोपीचा पीसीआर घेऊन त्यात सखोल चौकशी न करता आरोपीची थेट जेलमध्ये रवानगी झाल्याने नागरिकांत संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे आता वरिष्ठ पोलीस अधिकारी या प्रकरणात लक्ष देतील का ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

पीसीआर ची मागणी केली नाही - ठाणेदार

आयओंनी आरोपीची चौकशी केली असता इतर काही निष्पन्न झाले नाही. त्यामुळे पीसीआर ची मागणी केली नाही. मेडीकल वगैरे प्रक्रीया पुर्ण करून एमसीआर करण्यात आला. तसेच आमच्यावर कुठलाही राजकीय दबाव नाही,अशी प्रतिक्रिया चांदूर रेल्वेचे ठाणेदार सुरेश मस्के यांनी दिली.

मतदारयादीत नाव कायम ठेवण्यासाठी विशेष मोहीम

गणनापत्रक भरून देण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

अमरावती, भारत निवडणूक आयोगामार्फत मतदारयादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत पूर्णपणे नव्याने मतदारयादी तयार करण्यात येणार आहे. मतदारयादीत नाव कायम ठेवण्यासाठी दि. २४ ते २६ जुलैदरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी मतदानकेंद्रावर जाऊन गणनापत्रक भरून द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

मतदारांनी गणनापत्रक भरून दिले नसल्यास त्यांची नावे आगामी प्रारूप मतदारयादीमधून वगळल्या जातील. त्यामुळे मतदारांनी वेळेत हे पत्रक जमा करणे आवश्यक आहे. उर्वरित मतदारांचे नाव मतदारयादीत यावे, यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष मोहीम राबवली जात आहे. शुक्रवार, दि. २४ जुलै ते रविवार, दि. २६ जुलै दरम्यान दररोज सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्व संबंधित विधानसभा मतदान केंद्रे ही विशेष मोहिम राबविली जाणार आहे. त्यामुळे मतदारांनी गेल्या २०२४ मधील विधानसभा निवडणुकीत ज्या केंद्रावर मतदान केले आहे, त्याच ठिकाणी उपस्थित राहावे लागणार आहे. उपस्थित बीएलओकडून गणनापत्रक प्राप्त करून घ्यावे, तसेच सदर अर्ज पूर्ण भरून बीएलओकडे त्वरित जमा करावे. यामुळे मतदार यादीत मतदारांचे नाव समाविष्ट होण्यापासून कोणीही वंचित राहणार नाही. जिल्ह्यातील एकूण २५ लाख मतदारांपैकी सुमारे १६ लाख मतदारांनी आपले गणनापत्रक भरून दिले आहे. उर्वरीत ९ लाख मतदारांनी संबंधित 'बीएलओ' यांच्याकडे गणनापत्रक जमा केलेले नाही. त्यामुळे मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवणे आणि एकही मतदार वगळला जाऊ नये, यासाठी सर्व मतदारांनी तातडीने गणनापत्रक भरून देऊन या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २ हजार वृक्ष लागवड

अचलपूर/प्रतिनिधीः-

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त अचलपूर नगर परिषदेतर्फे तब्बल दोन हजार वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे आयोजन २२ जुलै रोजी करण्यात आले होते. यामध्ये प्रमुख अतिथी म्हणून अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे, मेळघाट मतदार संघाचे आमदार केवलराम काळे ,अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने,अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड,भाजपा पक्षाचे महामंत्री सुधीर रसे,तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे,नगरसेवक अभय माथने,माजी नगरसेवक रुपेश ढेपे प्रामुख्याने उपस्थित होते. पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने अचलपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष रुपाली अभय माथने व मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड आणि समस्त नगरसेवक

व नगरसेविका यांच्या पुढाकाराने अचलपूर येथील नवीन कंपोस्ट डेपो परिसरात २२ जुलै रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या औचित्यावर विविध प्रकारचे वृक्षारोपण मान्यवरांचे हस्ते केले करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने कडूनिंब ,चिंच, आंबा असे विविध दोन हजार झाडे लावण्यात आली . या परिसरासह जुळ्या शरीरातील विविध भागात सुद्धा वृक्षारोपण केले जाणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अचलपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी दिली आहे .या परिसरात अचलपूर नगर परिषद तर्फे लावली जाणाऱ्या झाडाचे संवर्धन सुध्दा केले जाणार असल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.जुळ्या शहरात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलच्या पदग्रहण सोहळा

अध्यक्ष डॉ. दीपक कन्हे यांचा सेवाभावी संकल्प

अमरावती/प्रतिनिधीः-

लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलच्या १८ व्या पदग्रहण सोहळ्याचा भव्य आणि दिमाखदार कार्यक्रम दिनांक १८ जुलै २०२६ रोजी हॉटेल aurtus , राजापेठ चौक ,अमरावती येथे भव्य दिमागदार व उत्साहात पार पडला. यावेळी

कार्यक्रमास इन्स्टॉलिंग ऑफिसर एमजेएफ निशिकांत प्रतापे , प्रमुख वक्ते एमजेएफ विजय पालीवाल , इंडक्शन ऑफिसर एमजेएफ ॲड. प्रशांत देशमुख, झोन चेअरपर्सन लायन निलेश गावंडे , मनीष दारा, तराळे सर, डॉ. रामदेव सीकची , मनोज मिश्रा माजी अध्यक्ष,यांच्यासह जिल्ह्यातील सर्व क्लबचे अध्यक्ष ,सचिव , कोषाध्यक्ष , वरिष्ठ लायन सदस्य, डॉ.सत्यनारायण कासट, हिरालाल इंधाने,लायन क्लब इंद्रपुरीच्या अध्यक्ष पुष्पलता इंधाने,लायन लेडीज व मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. दीपक कन्हे यांनी सांगितले की, वर्षभरातील सर्व सेवा उपक्रमांचे नियोजन प्रोजेक्ट

इन्चार्ज व त्यांच्या टीमकडे राहणार असेल तर उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांचेकडे सोपविण्यात येणार आहे. टीमवर्क, वेळेचे नियोजन आणि सातत्य यावर भर देत समाजोपयोगी उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी क्लबमध्ये डॉ. किशोर चिठोरे, डॉ. संजय गोरे, नितीन ठवलारे, ज्योती ठवलारे आणि आकाश तायवाडे यांचा नवीन सदस्य म्हणून लायन्स परिवारात प्रवेश झाला. या सर्व नवीन सदस्यांचे स्पॉन्सर लायन डॉ. दीपक कन्हे होते.

एमजेएफ ॲड. प्रशांत देशमुख यांच्या हस्ते त्यांचा इंडक्शन सोहळा पार पडला. कार्यक्रमाला डॉ. दिपक कन्हे यांच्या पत्नी ज्योती कन्हे, कन्या शर्वरी कन्हे, क्लबचे पदाधिकारी, उपाध्यक्ष – लायन सुरेंद्र मावले, सचिव – लायन श्याम जडिया, खजिनदार – लायन गौरव कोटवाणी, प्रशासक – लायन दिनेश अग्रवाल, GLT – लायन जितेंद्र झा, LCIF – लायन प्रकाश आवतरमानी, इव्हेंट को-ऑर्डिनेटर – लायन जयप्रकाश तेजवानी, टेमर – लायन गिरीश बोधानी,सल्लागार समिती लायन जयप्रकाश लड्ढा, लायन संजय लड्ढा, इश्वह राजा किंगराणी, लायन हरेश उदासी, लायन विवेक भेतालू, लायन हेमंत वालचाळे, लायन हेमंत पच्छीगर,संचालक मंडळ लायन डॉ. निखिल जैन, लायन चंद्रदत्त मिश्रा, लायन चेतन पटेल, लायन लक्ष्मीकांत जोशी, लायन समीर गवळी, लायन संजीव पोटे, सदस्य लायन सुनील राणा, लायन ओमप्रकाश खेमचंदानी, लायन शैलेश शिरभाते, लायन संजीव विंचूरकर, लायन सोहिल तापर, लायन अमित जैस्वाल, लायन पंकज दुबे, लायन मनोज चांदवानी तसेच मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व सूत्रसंचालन लक्ष्मीकांत जोशी व त्यांच्या पत्नी विशाखा जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे सांगता सचिव श्याम जाडीया यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

१ व १० वरिल उर्वरित

आधी धर्मेंद्र प्रधान यांनी

काँग्रेसचे खासदार रेणुका चौधरी आणि सय्यद नासिर हुसेन यांनी बुधवारी राज्यसभेत स्थगन प्रस्तावाची नोटीस सादर केली. विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाई आणि देशाच्या परीक्षा पद्धतीवर चर्चा व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. या नोटिसांमध्ये विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाई, नीट पेपरफुटी आणि सीबीएसईच्या ऑप-स्क्रीन मार्किंग पद्धतीतील अनियमितता हे मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. काँग्रेसच्या खासदारांनी सभागृहात या विषयांवर तातडीने चर्चा व्हावी, अशी मागणी केली आहे. काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांनी विद्यार्थी मुद्द्यावरून केंद्र सरकारवर निशाणा साधला. त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त असून ते आपल्या हक्कांसाठी आवाज उठवत आहेत. प्रियांका यांनी आरोप केला की, शिक्षण बजेट १.४ लाख कोटी रुपये असताना, सरकार अदानी आणि अंबानी यांचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ करत आहे.

राज्यातील ५३३ शेतक-यांची

आता कर्जमाफी झाल्यानंतर त्या शेतक-यांना कर्ज दिले पाहिजे अशी कायदेशीर तरतूद करण्यात आली असल्याचेही बाबासाहेब पाटील म्हणाले. शेतीबाहय ऊत्पन्नावर आयकर भरणा-या शेतक-यांना याचा लाभ मिळणार नाही. त्याबाबत केंद्र सरकारशी सातत्याने संपर्क सुरू असून त्यासाठी खास अधिकारीही नेमण्यात आला आहे. ही आकडेवारी आल्यानंतर एकदोन दिवसांत संपूर्ण यादी प्रसिदध करण्याचा सरकारचा प्रयत्न असणार आहे. यादी प्रसिदध झाल्यानंतर काही आक्षेप असल्यास जिल्हास्तरावरील समितीकडे अपील करता येईल. तिथे समाधान न झाल्यास राज्य स्तरावर त्याचे निराकरण करण्यात येणार आहे. २ लाखापेक्षा ज्या शेतक-यांची रक्कम जास्त आहे. त्यांना वरची रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत भरावी लागणार आहे. त्यानंतर त्यांना २ लाखापर्यंतच्या रकमेचा लाभ मिळणार आहे.

अनंतनागमध्ये दहशतवादी

(बेल्ट क्र. २०, आयआर ३ बटालियन) हे बडगामच्या बिरू भागातील रहिवासी होते. पोलिस प्रशासनाकडून नियमांनुसार पुढील वैद्यकीय-कायदेशीर कार्यवाही केली जात आहे. हल्ल्याची माहिती मिळताच, अतिरिक्त पोलिस आणि लष्करी तुकड्या घटनास्थळी दाखल झाल्या. सुरक्षा दलांनी संपूर्ण लाल चौक आणि आजूबाजूचा परिसर सील केला आहे. हल्ला करणा-या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

एमबीबीएस 'मॅनेजमेंट कोटा'च्या

पोलिसांकडे धाव घेतली. तक्रारीच्या आधारे गाडगेनगर पोलिसांनी सौरभ कुमार गुप्ता, अमन कुमार, रणधीर कुमार, सतीश गोस्वामी, निखिल सिंह, चंदन चौधरी यांच्यासह सात जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. सर्व आरोपी हे मध्य प्रदेशातील इंदोर येथील रहिवासी असल्याची माहिती तक्रारदाराने दिली आहे. या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, बँक खात्यांमधील देवाणघेवाण तसेच प्रवेशाच्या नावाखाली झालेल्या व्यवहारांची कागदपत्रे तपासली जात असून पुढील तपास सुरू आहे.

कठोरा रोडवर सापडला अज्ञात

तज्ज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. घटनास्थळाचा सखोल पंचनामा करून विविध भौतिक पुरावे आणि तांत्रिक माहिती संकलित करण्यात आली. प्राथमिक तपासात मृताच्या अंगावर शर्ट किंवा टी-शर्ट नसल्याचे, तर त्याने केवळ पॅन्ट आणि पायात बूट घातलेले असल्याचे आढळून आले. या परिस्थितीमुळे मृतदेह इतरत्र आणून येथे फेकण्यात आला असावा, अशी शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे. त्याचबरोबर अपघात अथवा इतर कारणांमुळे मृत्यू झाला असण्याच्याही शक्यता पडताळल्या जात आहेत. मृताची ओळख पटविण्यासाठी जिल्ह्यातील तसेच शेजारच्या पोलीस ठाण्यांमधील बेपत्ता व्यक्तींच्या नोंदींची छाननी सुरू करण्यात आली आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. तोपर्यंत आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास वेगाने सुरू असून, मृताची ओळख आणि मृत्यूमागील सत्य उघड करणे हे पोलिसांसमोरील प्रमुख आव्हान बनले आहे.

लक्ष्मीनगरातील नाल्यात पाच

गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भ्रूण नाल्यात कोणी आणि कोणत्या परिस्थितीत टाकला, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढविली आहे. परिसरातील खासगी व शासकीय रुग्णालयांमधील नोंदी, सोनोग्राफी केंद्रे, वैद्यकीय दुकाने तसेच घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात आहेत.

या प्रकरणामागील नेमकी पार्श्वभूमी आणि जबाबदार व्यक्तींचा शोध घेण्यासाठी विविध तांत्रिक व वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असून, तपास पूर्ण झाल्यानंतरच संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट होणार आहे. दरम्यान, या घटनेमुळे लक्ष्मीनगर परिसरात दिवसभर विविध चर्चांना उधाण आले.

श्याम इंडो फेबच्या गोदामातून

रुपयांची औद्योगिक यंत्रसामग्री चोरी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मंगळवारी सायंकाळी गोदामाच्या पाहणीदरम्यान हा प्रकार समोर आला. या प्रकरणी नांदगावपेठ पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कंपनीचे मुख्य व्यवस्थापक जगदीशकुमार देवराव पारुळकर (वय ४९, रा. रायपूर, छत्तीसगड) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्राथमिक तपासात ही चोरी १६ ते १७ जुलैदरम्यान झाल्याचे समोर आले आहे. मंगळवारी पारुळकर हे कंपनीच्या पाहणीसाठी आले होते. सायंकाळी त्यांनी गोदामाची तपासणी केली असता, तेथे ठेवण्यात आलेली महागडी यंत्रसामग्री गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर गोदामातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली असता चोरीची घटना उघडकीस आली.

चोरट्यांनी गोदामातून सुमारे १० लाख रुपये किमतीच्या नऊ सर्क्युलर फिटिंग मशिन्स, १० लाख रुपयांची एक सेंटेक्स ड्रायर मशीन, पाच लाख रुपयांचा एक लाफेर संगणक संच, पाच लाख रुपयांचा एक बेन्को संगणक संच, पाच लाख रुपयांची एक ईव्हीएए स्ट्रेंगर मशीन तसेच दोन लाख रुपयांची एक ग्रे ओपनिंग मशीन असा एकूण ३७ लाख रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.पंचतारांकित एमआयडीसीतील एका मोठ्या औद्योगिक युनिटमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर चोरी झाल्याने औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात ही चोरी करणाऱ्या व्यक्तींना गोदामाची रचना आणि तेथील यंत्रसामग्रीची संपूर्ण माहिती असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.बुधवारी नांदगावपेठ पोलीस आणि न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) पथकाने घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला आहे. पोलीस अज्ञात आरोपींचा शोध घेत आहेत.

आज तिवसा शहर बंदची हाक

सर्व राजकीय पक्ष, समविचारी संघटना, संस्था यांच्या वतीने करण्यात आले आहे.

नीट पेपर फुटी प्रकरणात शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीच्या जंतर मंतर मैदानात सुरु असलेल्या आंदोलनात देशाच्या कानकोपऱ्यातून लाखोच्या संख्येने विध्यार्थी सहभागी झाले होतें, आंदोलन शांततेत सुरु असतानाच पोलीसांनी अचानक विध्यार्थ्यांवर अश्रूधुर लाठीचार्ज करत विध्यार्थ्यांचे डोके फोडले यामध्ये शेकडो विध्यार्थी जखमी झाले. या आंदोलनाचे पडसाद आता देशासह राज्यात उमटत असून विध्यार्थ्यांच्या समर्थनात बंदचीं हाक देण्यात आली आहे. याच अनुषंगाने तिवसा शहरात देखील बंदची हाक देण्यात आली असून या निषेध आंदोलन व बंदमध्ये सर्व विध्यार्थी, राजकीय पक्ष समविचारी संघटना संस्था यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

महसूल समाधान शिबीर आणि मुख्यमंत्री जनआरोग्य अभियानांतर्गत मेळघाटातील बालकांमधील जन्मजात हृदयरोगावर मोफत उपचारासाठी आयोजित 'प्रोजेक्ट डीईव्हीए' कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीने नागपूरकडे प्रयाण करतील.

पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा;

दीर्घ खंड दिल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी भर पावसाळ्यातही पिके वाचवण्यासाठी कृत्रिम पाण्याची व्यवस्था करून सिंचन सुरू केले होते.

मात्र सोमवारपासून परिसरात समाधानकारक पाऊस सुरू झाल्याने कृत्रिम पाणी देण्याची गरज कमी झाली आहे. झालेला पाऊस कापूस, सोयाबीन आणि तूर या पिकांच्या वाढीसाठी अत्यंत लाभदायक ठरत असून शेतकरी वर्गाच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

दरम्यान, शेतीवरच उदरनिर्वाह करणाऱ्या शेतमजुरांनाही या पावसाचा मोठा फायदा होणार आहे. शेतातील मशागतीची व तणनियंत्रणाची कामे पुन्हा सुरू होणार असल्याने मजुरांच्या हातालाही रोजगार मिळणार असून त्यांच्या चेहऱ्यावरही समाधानाचे चित्र दिसून येत आहे.

खचलेल्या विहिरीची नगराध्यक्षांकडून

कॉलनीच्या मागील नाल्याची, मिलिंद नगर तसेच गुरुकृपा कॉलनी परिसराची पाहणी करून नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन आवश्यक कामे प्राधान्याने व लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना नगराध्यक्ष विश्वकर्मा यांनी मुख्याधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या पाहणीदरम्यान मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे, अभियंता जावळे मॅडम, लिपीक जितू कर्से तसेच नगरसेवक निलेश विश्वकर्मा, हर्षल वाघ, अनिस सौदागर, निलेश भालेराव, सतपाल वरठे, प्रवीण खेरकर, रवी दीक्षित, योगेश आसोले, अतुल शिरभाते आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

शासकीय निधी खासगी

बँकांमध्ये जमा केल्याची बाब त्यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास आणून दिली.

ही बाब समोर येताच पालकमंत्र्यांनी ती गंभीरतेने घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून तत्काळ स्पष्टीकरण मागविले. बैठकीत झालेल्या चर्चेदरम्यान काही अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार निधी खासगी बँकांमध्ये वर्ग केल्याचे सांगितले. यानंतर पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना फटकारत संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले. तसेच नियमांचे उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर व आवश्यकतेनुसार फौजदारी कारवाई करण्याचे निर्देशही दिले.

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही विदर्भातील शेतकऱ्यांची विश्वासार्ह आर्थिक संस्था मानली जाते. मात्र, असे असतानाही अमरावती जिल्हा परिषदेकडील सुमारे १०० ते १२५ कोटी रुपयांच्या शासकीय ठेवी या बँकेतून काढून इतर बँकांकडे वर्ग करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. यामुळे शेतकरीहितासाठी कार्य करणाऱ्या सहकारी बँकेवर आर्थिक दुष्परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

हिवरखेड अपघातात सुनेपाठोपाठ

शेषराव भलावी वय ३२ वर्ष रा. तळणी याला गंभीर अवस्थेत अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय येथून नागपूरला हलविण्यात आले आहे.आज दि.२२ जुलै रोजी मोर्शी उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृतक महिलेच्या पार्थिवावर तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आबाराव ताथोडे यांच्या पार्थिवावर शवविच्छेदन करून मृतकांचे प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.आज बेलोरा (लोणी)येथे सासरे व सुनेच्या पार्थिवावर एकाच वेळी अत्यंत शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार पार पडला.

हिवरखेड लोणी मार्गे असलेल्या बेलोरा येथील शितल रवींद्र ताथोडे,सासरे आबाराव पुंडलिकराव ताथोडे व मुलगा श्लोक रवींद्र ताथोडे हे दोन दिवसांपूर्वी मोर्शी लगत असलेल्या तळणी येथे काही कार्यक्रमानिमित्य गेले होते.काल ते तळणी येथून प्रवासी वाहतूक करणाऱ्या मिनी ऑटो क्रमांक एम एच २७ बी डब्ल्यू ८९५९ ने आपल्या गावी जात असतांना वरुड येथून चालक सालिकखान मतीनखान वय २६ वर्ष रा. अलीमनगर अमरावती हा आपला आयशर ट्रक क्र. एम एच २८ ए बी २७ २० मध्ये साबन तयार करण्याचे गाद ऑइलचे ड्रम घेऊन अमरावती येथे जात असतांना भरधाव वेगाने असलेल्या आयशर ट्रकने ऑटोला धडक दिली व अपघात घडला.ऑटो मधील वयोवृद्ध आबाराव ताथोडे यांना डोक्याला जबर मार बसल्यामुळे रक्तस्त्राव होऊन त्यांचे निधन झाले तर अपघातातील आकाश शेषराव भलावी या मुलाचा पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे त्याला नागपूर येथे हलविण्यात आहे.

अचलपूर शहरात महाराजस्व

करून देण्यात आल्या. प्रमाणपत्रे व दाखले यात प्रलंबित फेरफार मार्गी लावून व सातबारामधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा आणि आठ-अ उतारे, उत्पन्न, रहिवासी, जात आणि नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्रे व विद्यार्थ्यांसाठी विविध शासकीय दाखले देण्यात आले. यावेळी मंचावर अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,मेळघाट मतदार संघाचे आमदार केवळराम काळे ,अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रूपाली माथने, चांदुर बाजार चे नगराध्यक्ष मनिषा नागलिया,माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, तहसीलदार सुदर्शन शहारे, चांदूर बाजार तहसीलदार योगेश गाडे,अचलपूर पंचायत समिती गटविकास अधिकारी कल्पना मॅडम, चांदूर बाजार चे गटविकास अधिकारी निलेश वानखेडे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रभारी उपकार्यकारी अभियंता पी.एच.निर्मल ,अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड,तालुका कृषी अधिकारी अक्षय क्षीरसागर,जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे नितीन झगडे ,दुय्यम निबंधक रामदास पाटील,अचलपूर नगर परिषद नगरसेविका अक्षरा लहाने , अर्पना रोडे ,भाजपा पक्षाचे जिल्हा महामंत्री सुधीर रसे ,शहराध्यक्ष कुंदन यादव,स्वप्नील मडघे,अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अतुल वाठ,जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकड,प्रफुल बर्वे, तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे,रितेश नवले ,नगरसेवक अक्षय पखाले,सुनील चौधरी , शंकर भाषांनी,गौरव रघुवंशी,महेश देशमुख आदी उपस्थितीत होते.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ गुरुवार, २३ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ वाशिममध्ये एकदिवसीय आमरण उपोषण

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पर्यावरणवादी, शिक्षण सुधारक व वैज्ञानिक सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी दि.२० जुलै रोजी वाशिम येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कॉंकरोज जनता पार्टी (एच्ड्), विविध सामाजिक, राजकीय संघटना व संविधानप्रेमी नागरिकांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय आमरण उपोषण करण्यात आले.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या सोनम वांगचुक यांच्या आमरण उपोषणादरम्यान त्यांना दिल्ली पोलिसांनी जबरदस्तीने ताब्यात घेऊन रुग्णालयात दाखल केल्याच्या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. कॉंकरोज जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला तसेच सोनम वांगचुक यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी या एकदिवसीय उपोषणाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनात देशातील शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या त्रुट्या ,विद्यार्थ्यांचे प्रश्न, परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि शिक्षण क्षेत्रातील सर्वांगीण सुधारणांची मागणी करण्यात आली. तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे आंदोलनादरम्यान विद्यार्थी व आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कथित पोलिस कारवाईचा व लाठीमाराचाही निषेध यावेळी करण्यात आला. हे आंदोलन सर्वपक्षीय व सर्वसंघटनांच्या संयुक्त सहभागातून पार पडले.

या साखळी उपोषणात सामाजिक कार्यकर्ते जगदिश मानवतकर,भीम आर्मीचे सुभाष अंभोरे, से.नि.मुख्यकार्यकारी अधिकारी विलास खिल्लारे,आम आदमी पार्टीचे राम पाटील डोरले, गजानन धामणे, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान,बाळासाहेब भगत, दिलीप कुमार, दिलीप अंभोरे, डॉ. संजय पडघान, समाधान अवचार, अरविंद एस.पडघान,दया अंभोरे, ?ड. सेवेन्द्र सोनोने, सिताराम जाधव, माधव शेवाळे, धम्मदास वाकुडे, अक्षय इंगोले, रामदास कालापाड, रवी ठोके, गणेश वानखडे यांच्यासह विविध पक्ष व संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले.तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) , डॉ. सिद्धार्थ देवळे,गजानन पाटील दहात्रे, काँग्रेसचे ॲड. दिलीप सरनाईक, राजूभाऊ चौधरी, गजानन गोटे, उज्ज्वल देशमुख, सुमित खडसे, दत्तराव धांडे, संभाजी ब्रिगेडचे इस्माईल खान पठाण, यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन आंदोलनाला समर्थन दिले.

यावेळी 'भारत माता की जय', 'इन्कलाब जिंदाबाद', 'सोनम वांगचुक तुम आगे बढ़ो, हम तुम्हारे साथ हैं', 'अभिजीत दिपके तुम आगे बढ़ो, हम तुम्हारे साथ हैं' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.नंतर जगदिश मानवतकर व विविध पक्ष, संघटना यांचे वतीने जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

माजी सरपंच व विद्यमान प्रशासकाच्या दारातील रस्ता अनेक वर्षांपासून चिखलात बुडालेला

तीर्थक्षेत्र अमरगड (वाई गौळ) मधील पायाभूत सुविधांचा बोजवारा

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतीपैकी एक असलेल्या तीर्थक्षेत्र अमरगड (वाई गौळ) येथील माजी सरपंच आणि सद्यस्थितीत असलेले ग्रामपंचातीचे प्रशासक यांच्या घरासमोरील रस्ता वर्षानुवर्षे चिखलाने माखलेला असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा महत्त्वाचा रस्ता अंबादास आडे ते बादल राठोड यांच्या घरापर्यंत अत्यंत धोकादायक बनला आहे.पाच वर्षे सरपंच पद भूषविलेले उमेश पांडुरंग राठोड यांच्या अंगणासमोरील रस्त्याचीच दुरवस्था झाल्याने गावातील विकासकामांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

छायाचित्रात दिसत असलेल्या या रस्त्यावरून शाळकरी मुले, दुचाकीस्वार व पादचारी यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यातच नाही तर बाराही महिने या ठिकाणी संपूर्ण रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल व पाणी साचते. शाळेत जाताना विद्यार्थ्यांचे गणवेश खराब होत असून वृद्ध व महिलांना घसरून पडण्याचा धोका आहे. रस्त्यालगतच ऑप्टिकल फायबरचा खांब असूनही रस्ता मात्र विकासापासून कोसो दूर आहे.

प्रशासनाचे दुर्लक्ष

अमरगड हे तीर्थक्षेत्र असून दरवर्षी हजारो भाविक येथे येतात. मात्र गावातील अंतर्गत रस्त्यांचीच अशी दुरवस्था असेल तर बाहेरील भाविकांमध्ये गावाची काय प्रतिमा निर्माण होईल, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाने व पंचायत समितीने तातडीने या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

स्थानिक नागरिक विनोद राठोड सांगतात, 'ज्या लोकप्रतिनिधींनी पाच वर्षे गावाचा कारभार हाती घेतला, त्यांना स्वतःच्या घरासमोरील रस्ताही दुरुस्त करता आला नाही, तर त्यांनी गावाचा काय विकास केला असेल?' सरपंच पद सध्या अत्यंत शक्तिशाली असून १५ वा वित्त आयोग, आमदार-खासदार निधी, जिल्हा परिषद सेस अशा अनेक योजना थेट सरपंचांच्या अखत्यारीत येतात. तरीही मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे. 'केवळ ज्या योजनांमधून आर्थिक लाभ मिळतो, त्यांनाच लोकप्रतिनिधी प्राधान्य देतात. रस्ते, गटारी, पाणी यासारख्या मूलभूत कामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते,' अशी चर्चा गावात रंगली आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रकाश महाराज यांच्यासह अनेक जण याच परिसरात राहत असूनही समस्या 'जैसे थे' आहे.

सरकारी बागीच्यात प्रसाधनगृहाची व्यवस्था करण्याची मागणी

अकोला : कृषी विद्यापीठ संचालित पोलीस हेडक्वार्टर मार्गावरील सरकारी बागीच्यात दररोज शेकडो नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि दिव्यांग व्यक्ती फेरफटका, व्यायाम व आरोग्यासाठी येत असतात.त्यांच्या कडून उद्यान व्यवस्थापन दर आकारीत असते. मात्र या सार्वजनिक उद्यानात प्रसाधन गृहाची योग्य व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांची खूपच गैरसोय होत आहे.विशेष करून महिला वर्गाची ही घोर कुचंबना होत असून या उद्यानात त्वरित प्रसाधन गृहाची सोय उपलब्ध करून देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. मनीष सेठी जैन यांनी केली.

दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावर लाठीचार्ज

राहुल गांधी, प्रियंका गांधी व अखिलेश यादव यांच्या अटकेच्या निषेधार्थ मालेगाव काँग्रेसचे आंदोलन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दिल्ली येथील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या कथित लाठीचार्ज, अश्रुधुराच्या माऱ्याचा तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस खासदार प्रियंका गांधी आणि समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव यांना ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ मालेगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध व्यक्त करण्यात आला.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या २२ दिवसांपासून

विद्यार्थी आपल्या विविध मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करत आहेत. मात्र आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज व अश्रुधुराचा मारा करून त्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पोहोचलेल्या विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खासदार प्रियंका गांधी, समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव व इतर विरोधी पक्षांच्या नेत्यांना ताब्यात घेण्यात आल्याचा निषेध करण्यात आला.

यावेळी बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, लोकशाहीमध्ये शांततापूर्ण आंदोलन करणे, आपले मत व्यक्त करणे आणि न्यायाची मागणी करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्याऐवजी त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणी मालेगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात संबंधित प्रशासनाला निवेदनही सादर करण्यात आले.

या आंदोलनात संदीप घुगे, भरत गुडदे, योगेश बळी, महेश अनसिंगकर, सै. इमरान, प्रमोद नवघरे, विशाल सौभागे, बाळा सावंत, अमर रोकडे, डॉ. निलेश मानधने, अभिषेक देवकते, संघपाल पखाले, गजानन शिंदे, गजानन केळे, प्रविण पाटील, गफार शाह सरदार शाह, अख्तर खाँ पठाण, राजीव राऊत यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकशाही दिन ३ ऑगस्ट रोजी

अकोला : जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिनाचे आयोजन दि. ३ ऑगस्ट, रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांचे बैठक कक्ष तिसरा माळा, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे करण्यात आले आहे. प्रत्येक महिन्याच्या तिस- या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. नागरीकांना तालुका लोकशाही दिनानंतर १ महिन्याने जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्ज करता येतो.

दुःखात नव्हे तर सुखामध्ये भगवंताचे स्मरण करा -तोतारात महाराज

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भगवंताने कृपादृष्टी केल्याने आपणास मानव जन्म प्राप्त झाला आहे ही आपली सर्वात मोठी उपलब्धी व पुण्याचे फळ आहे. व्यक्ती हा जेव्हा संकटात असतो त्यावेळी तो परमेश्वराला आठवण करतो मात्र दुःखामध्ये नव्हे तर सुखामध्ये परमेश्वराचे स्मरण करा अशी आव्हान खाचरोद उज्जैन येथील संत श्री १००८ तोताराम महाराज यांनी केले... स्थानिक वाशीम अर्बन बँक व राठी यांच्या निवासस्थानी बुधवार २२ जुलै रोजी त्यांचे आगमन झाले त्यावेळी त्यांनी प्रवचनातून वरील प्रतिपादन केले. तोताराम महाराज यांच्या सोबत हर्ष राम महाराज, चरणदास महाराज उपस्थित होते. सर्वप्रथम वाशीम अर्बन बँकेत बँकेचे संस्थापक स्वर्गीय रामकृष्ण राठी उर्फ बाबाजी यांच्या पुतळ्याचे पूजन व हार अर्पण महाराजांच्या हस्ते करण्यात आले .बँकेच्या वतीने अध्यक्ष श्रीमती शीलाताई राठी, हरीश राठी,मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख, शाखा संचालक निलेश सोमानी, सरव्यवस्थापक राजेंद्र काळे, शाखा व्यवस्थापक राजेंद्र अग्रवाल, लक्ष्मणराव घोडके यांनी महाराजांचे पुष्पहार टाकून स्वागत केले.. यावेळी बँकेचे समस्त कर्मचारी वृंद उपस्थित होते. राठी परिवाराच्यावतीने निवासस्थानी महाराजांचे हरीश राठी व राठी परिवाराच्या वतीने त्यांचे मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.समाजसेवी हरिष राठी यांच्या पुढाकाराने आगमनानिमित्त. त फुलांची उधळण, ढोल-ताशांचा गजर आणि फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये संतांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. 'साधू संत येती घरा, तोच दिवाळी-दसरा' या उक्तीप्रमाणे संतांच्या आगमनाने परिसरात भक्तिमय व आनंदमय वातावरण निर्माण झाले.हरीश राठी यांच्या निवासस्थानी संतांचे पाद्यपूजन, आरती व पूजन करून त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले. उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना परमपूज्य तोताराम महाराज यांनी पुढे सांगितले की, 'राम, कृष्ण, हरी हे सर्व एकाच परमेश्वराची विविध रूपे आहेत. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनातील काही क्षण ईश्वराच्या नामस्मरणासाठी द्यावेत.

शाळा संपर्क अभियानाचा विद्यासागर गुरुकुलातून शुभारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्याभारती वाशिम जिल्ह्याच्या वतीने शैक्षणिक, सांस्कृतिक व राष्ट्रभक्तीपर उपक्रमांना चालना देणाऱ्या शाळा संपर्क अभियानाचा शुभारंभ सोमवारी (दि. २०) सकाळी विद्यासागर गुरुकुल, वाशीम येथे उत्साहात झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यासागर गुरुकुल संस्थेचे अध्यक्ष विनोदजी गडेकर होते, तर उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वाशिम नगर संघचालक दिपकदादा जहागीरदार यांच्या हस्ते झाले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्याभारती विदर्भ प्रांत सहमंत्री विद्यावाचस्पती प्रा. दिलीप जोशी उपस्थित होते. यावेळी प्रांत उपाध्यक्ष सत्त्यानंद कांबळे, जिल्हाध्यक्ष प्रा. अनिल धूमकेकर, जिल्हामंत्री प्रा. श्रीकांत जोशी तसेच विद्यासागर गुरुकुलच्या प्राचार्या ममता गुप्ता यांची प्रमुख उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना प्रा. दिलीप जोशी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष, विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थानच्या स्थापनेची ७५ वर्षे तसेच विद्या भारती विदर्भच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर शाळा संपर्क अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती दिली. शिक्षणातून चारित्र्यसंपन्न नागरिक घडविणे हे विद्या भारतीचे ध्येय असल्याचे सांगत, भारतीय संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना करून देणाऱ्या संस्कृती ज्ञान परीक्षेत सर्व शाळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाध्यक्ष प्रा. अनिल धूमकेकर यांनी यंदा 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या सार्धशताब्दीनिमित्त २५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता देशभरातील शाळांमध्ये सामूहिक गायनाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देत, सर्वांनी त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. जिल्हामंत्री प्रा. श्रीकांत जोशी यांनी संत रविदास महाराजांच्या ६५० व्या प्रकाश वर्षानिमित्त शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. उद्घाटक दिपकदादा जहागीरदार यांनी विद्या भारतीच्या शैक्षणिक व संस्कारक्षम उपक्रमांचे कौतुक केले.

खामगाव जीन परिसरात नाले सफाई न झाल्याने नागरिकांच्या घरात शिरले पावसाचे पाणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील खामगाव जीन परिसरात नगरपालिकेकडून नाले सफाई न केल्यामुळे झालेल्या पावसात नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याची घटना घडली आहे.येथील नागरिक देशमाने यांच्या घरासमोरील दोन्ही बाजूच्या नाल्या कचऱ्याने पूर्णपणे बंद झाल्या आहेत. त्यामुळे नालीचे सांडपाणी आणि पावसाचे पाणी थेट घरामध्ये शिरत आहे.

नागरिकांनी संताप व्यक्त करताना सांगितले की, नगरपालिकेचे कर्मचारी केवळ 'थातुर-मातुर' काम करतात. स्वच्छता मोहिमेअंतर्गत फक्त मेन चौकातील दुकानांसमोरील कचरा उचलला जातो. मात्र सामान्य नागरिकांच्या घरासमोरील

नाल्यांची कोणतीही सफाई केली जात नाही. त्यामुळे नाल्या कचऱ्याने तुंबल्या आहेत.

पावसाळ्यापूर्वी नाले सफाई करण्याच्या प्रशासनाच्या सूचना असूनही येथे त्याची अंमलबजावणी झालेली नाही. यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून, घरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. नागरिकांनी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन खामगाव जीन परिसरातील सर्व नाल्यांची सफाई करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात २,९९३ दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण

■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महसूल विभाग, तहसील कार्यालय कारंजा (जि. वाशिम) यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर दि. २२ जुलै रोजी सकाळी १०.०० वाजता शेतकरी भवन, कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरूळपीर रोड, कारंजा (लाड) येथे संपन्न झाले.

सदर कार्यक्रम सईताई डहाके,आमदार, कारंजा विधानसभा मतदारसंघ यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी योगेश कुंभेजकर, जिल्हाधिकारी वाशिम तसेच फिरोज शेकूवाले , उपाध्यक्ष नगर परिषद कारंजा, शालिनी प्रशांत ठाकरे भाजपा गटनेता नगर परिषद, कारंजा हे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमास कैलास देवरे, उपविभागीय अधिकारी कारंजा आणि रवि महाले, तहसीलदार कारंजा यांचे मार्गदर्शन लाभले.

शिबिराला राजेंद्र पाटील तहसीलदार मानोरा, पुनम राणे गटविकास अधिकारी कारंजा, श्रीमती अश्विनी भोसले, तालुका कृषी अधिकारी कारंजा, तृप्ती खैरनार अतिरिक्त तहसीलदार, विनोद हरणे, ना.त., अनिल वाडेकर, ना.त., लक्ष्मण बनसोडे, ना.त., स्मिता नायगावकर, निरीक्षण अधिकारी, धंनजय देशपांडे, दुय्यम निबंधक,जाधव साहेब भूमी अभिलेख, राजपूत साहेब, महावितरण अमर चोरे, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन कारंजा तसेच इतर मान्यवर उपस्थित

होते. या महसूल समाधान शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांना विविध दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच कारंजा तालुक्यातील ३० विभागांच्या माध्यमातून विविध शासकीय लाभ नागरिकांना प्रदान करण्यात आहे.

संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत १० प्रमाणपत्रांचे वितरण,श्रावण बाळ योजनेअंतर्गत १५ प्रमाणपत्रांचे वितरण,शिधापत्रिका ६ लाभार्थ्यांना प्रदान,पंचायत विभागाकडून १७३ प्रमाणपत्रांचे वितरण,महसूल विभागामार्फत सातबारा, फेरफार, ८-अ आणि उत्पन्न दाखले असे एकूण ८७४ दाखले वितरित,महिला व बालकल्याण विभागाकडून ५८ लाभ वितरित

आरोग्य विभागामार्फत ४७६ नागरिकांची आरोग्य तपासणी,ल.पा. विभागाकडून १ लाभ प्रदानतसेच अन्य विभागाकडून दाखले तथा लाभ वितरण करण्यात आले. सर्व विभागांचा एकत्रित विचार करता शिबिरात एकूण २,९९३ दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच नागरिकांकडून प्राप्त झालेल्या ३८ तक्रारींची नोंद घेण्यात आली.

शिबिरादरम्यान विशेष विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पुस्तके व गणवेशांचे वाटप करण्यात आले. यासोबतच पानंद रस्ते अडथळेमुक्त करण्यासाठी विशेष सहकार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच जनगणना व विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मंडळ अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष तसेच गावातील नागरिक व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल वरघट, ग्राम महसूल अधिकारी आणि अश्विनी इंगोले, ग्राम महसूल अधिकारी यांनी केले. तर आभार प्रदर्शन राहुल वरघट, ग्राम महसूल अधिकारी यांनी मानले. कार्यक्रमासाठी कारंजा तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिराला नागरिकांची उत्स्फूर्त व मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३६ ■ गुरुवार, २३ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्यांना चांगल्या आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न- पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

वर्धा येथील शिबिरात भर पावसातही नागरिकांची गर्दी

आरोग्य अमृत महोत्सवाचा जिल्हास्तरीय शुभारंभ

वर्धा जनमाध्यम : राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहेत. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य व गरजू नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व आरोग्य विभागाच्या वतीने बच्छराज धर्मशाळा येथे आयोजित आरोग्य अमृत महोत्सवाच्या जिल्हास्तरीय उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महोत्सवांतर्गत जिल्ह्यात चार ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली असून वर्ध्यात २२ ते २४ जुलैदरम्यान होणाऱ्या शिबिराचा शुभारंभ यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाला आ. डॉ. मनिषा कायंदे, आ. रविंद्र चव्हाण, आ. समीर कुणावार, आ. सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार दादाराव केचे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री म्हणाले, आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेतून पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत मिळत आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमुळे अनेक गरजू रुग्णांना वेळेवर आर्थिक मदत मिळाली आहे. गेल्या वर्षी राबविलेल्या मोतीबिंदू विरहित

वर्धा अभियानात ६ हजार ५३१ रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यंदाच्या आरोग्य अमृत महोत्सवाचाही प्रत्येक नागरिकाने लाभ घ्यावा. आशा सेविकांनी गावागावातील गरजू रुग्णांना शिबिरापर्यंत आणण्याचे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार रविंद्र चव्हाण यांनी शासनाच्या आरोग्य योजनांची जनजागृती आवश्यक असल्याचे सांगितले. आमदार समीर कुणावार यांनी मोतीबिंदूमुक्त अभियानाच्या यशाचा उल्लेख करत गरजूंना पुढील उपचार व शस्त्रक्रियांची सुविधाही उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. आमदार डॉ. मनिषा कायंदे यांनी महिलांमधील ?निमियाचे निदान व उपचारावर भर देण्याची गरज व्यक्त केली. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनीही मनोगत व्यक्त केले.

भर पावसातही नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती

शिबिराच्या पहिल्याच दिवशी भर पावसातही नागरिकांनी मोठी गर्दी केली. २२ दालनांमध्ये हृदयरोग, ईसीजी, स्त्रीरोग, दंतरोग, अस्थिरोग, कर्करोग, त्वचारोग, कान-नाक-घसा, नेत्ररोग तसेच संसर्गजन्य रोगांची तपासणी करण्यात आली. रक्त तपासणी, मानसिक आरोग्य समुपदेशन, औषध वितरण, मोफत चष्म्यांचे वाटप तसेच रक्तदान शिबिरालाही चांगला प्रतिसाद मिळाला.

यावेळी पालकमंत्री व मान्यवरांच्या हस्ते दिव्यांग-अव्यंग विवाह झालेल्या जोडप्यांना प्रमाणपत्र, श्रवणयंत्र, ब्रेल किट, अंध काठी, चष्मे, आयुष्मान वय वंदना कार्ड आणि आयुष्मान गोल्डन कार्डचे वितरण करण्यात आले. पालकमंत्र्यांनी विविध तपासणी दालनांची पाहणी करून डॉक्टर व रुग्णांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांवर लाठीमार म्हणजे लोकशाहीवर हल्ला

संसदेत आझादांचा संविधानिक एल्गार

खा.अमर काळेंचा पाठिंबा

नवी दिल्ली / वर्धा जनमाध्यम : जंतर मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जाच्या निषेधार्थ देशातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेला लोकशाही आणि संविधानिक अधिकारांवरील थेट आघात असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, खासदार चंद्रशेखर आझाद यांनी संसद परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत हा घटनात्मक लढा सुरूच राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या आंदोलनाला वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी प्रत्यक्ष भेट देत पाठिंबा जाहीर केला. विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्यात आणि संविधानिक मूल्यांच्या संरक्षणासाठी सर्व लोकशाहीवादी शक्तींनी एकत्र उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

चंद्रशेखर आझाद यांनी जंतर मंतरवरील घटनांवर तीव्र संताप व्यक्त करताना, तेथील दृश्य पाहून जालियनवाला बाग हत्याकांडाची आठवण झाली. शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्यासाठी बळाचा वापर करणे हे लोकशाहीला न शोभणारे आहे, अशी कठोर प्रतिक्रिया दिली.

या घटनेनंतर विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटना आणि विविध राजकीय पक्षांकडून संताप व्यक्त करण्यात येत असून, देशभरात निषेध आंदोलनांची तीव्रता वाढत आहे. विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दाबला जाऊ शकत नाही. न्याय मिळाल्याशिवाय संघर्ष थांबणार नाही, असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला असून, हा प्रश्न आता राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी पोहोचला आहे.

जंतर मंतर लाठीचार्जावर देशभर संताप, न्याय मिळाल्याशिवाय संघर्ष थांबणार नाही

विद्यार्थ्यांवरील कारवाईच्या निषेधार्थ आज वर्धा बंद

बजाज चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

वर्धा जनमाध्यम : दिल्लीतील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवरील कथित कारवाईच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ?ड. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला प्रतिसाद देत आज (२३ जुलै) वर्धा बंद पाळण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता बजाज चौकातून भव्य निषेध मोर्चा काढण्यात येणार असून तो शहरातील प्रमुख मार्गांवरून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.

विविध सामाजिक, आंबेडकरी व राजकीय संघटनांचा पाठिंबा

मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन सादर करून विद्यार्थ्यांवरील कथित अन्यायाचा निषेध, सामाजिक न्याय, समता आणि संविधानिक मूल्यांच्या संरक्षणाची मागणी करण्यात येणार आहे. या आंदोलनाला सोशल निर्माण कोरम, भीम टायगर सेना, भारतीय बौद्ध महासभा, भीम आर्मी संविधान रक्षक दल, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस, आरपीआय (आंबेडकर), एमआयएमसह विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी पाठिंबा जाहीर केला आहे.

जिल्हाध्यक्ष किशोर खैरकार यांनी व्यापारी, व्यावसायिक, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. बंद हा व्यवहार ठप्प करण्यासाठी नव्हे, तर अन्यायाविरोधात लोकशाही मार्गाने एकजूट दाखविण्याचा निर्धार आहे, असे पत्रकात नमूद करण्यात आले असून आंदोलन शांततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अजितदादा पवार यांना अभिवादन

वर्धा जनमाध्यम :

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, जिल्हाधिकारी वान्मथी सी व जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी अजितदादांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.

भर पावसात पेपरफुटी, लाठीहल्ला अन् अटकेच्या निषेधार्थ काँग्रेसचा आक्रमक मोर्चा

राहुल गांधींच्या अटकेचा निषेध, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी; राष्ट्रपतींना निवेदन सादर

वर्धा जनमाध्यम : मुसळधार पावसाची तमा न बाळगता वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीने बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळ्याजवळ केंद्र सरकारविरोधात जोरदार आंदोलन छेडले. NEET पेपरफुटी प्रकरण, शिक्षण व्यवस्थेतील कथित अनागोंदी, विद्यार्थी-युवकांवरील कथित लाठीहल्ला तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अटकेच्या निषेधार्थ काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले.

जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. भर पावसातही आंदोलकांनी ठिय्या आंदोलन करत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. आंदोलनस्थळी केंद्र सरकारविरोधात तीव्र घोषणाबाजी करण्यात आली.

निवेदनात NEET पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच परीक्षेतील कथित अनियमिततेची सर्वोच्च पातळीवर चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि शिक्षण व्यवस्थेतील कथित अपयशावर संसदेत तातडीने चर्चा घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यभर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. या आंदोलनात प्रदेश सचिव अभ्यूदय मेघे, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष अरुणा धोटे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळाभाऊ माउस्कर, सागर सबाने, निलेश तिजारे, रवींद्र भुजाडे, सुनील तळवेकर, चंद्रशेखर घोडे, विलास कोरले, परवेज शेख, रिंकू खान, मेहमूद शेख, सपना शेंडे, मनोज चौधरी, मनीषा मेघे, श्रीकांत बाराहाते यांच्यासह काँग्रेसचे शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोठा अत्याचार प्रकरणात सखोल चौकशीचे आदेश आरोपीला कठोर शिक्षा देण्यासाठी शासन कटिबद्ध

१५ सदस्यीय एसआयटीकडून तपासाचा आढावा, पीडित कुटुंबाला सर्वतोपरी मदतीचे निर्देश

वर्धा जनमाध्यम : रोठा येथील बालिकेवरील अत्याचार व हत्या प्रकरणाची सर्व अंगांनी सखोल चौकशी करून सबळ पुरावे गोळा करावेत आणि दोषी आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळेल, यासाठी तपासात कोणतीही त्रुटी राहू देऊ नये, असे निर्देश पालकमंत्री तथा गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व विशेष तपास पथकाची उच्चस्तरीय बैठक घेतली.

बैठकीत जिल्हाधिकारी वान्मथी सी., पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, एसआयटी प्रमुख तथा पोलिस उपअधीक्षक सुनिल महादीक यांनी तपासाची सविस्तर माहिती दिली.

आरोपीने घरात प्रवेश केल्यापासून बाहेर पडण्यापर्यंतचा घटनाक्रम बारकाईने तपासावा, उपलब्ध होणारे सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तांत्रिक पुरावे गोळा करावेत, तसेच शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी नामवंत विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती करण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. पीडित कुटुंबाला शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. मनोधैर्य योजना, आदिवासी विकास विभागाच्या न्युक्लिअस बजेटमधून आर्थिक मदत, शबरी योजनेतून शेतजमीन उपलब्ध करून देणे, तसेच कुटुंबातील मुलींच्या शिक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले. या प्रकरणाच्या जलद व सखोल तपासासाठी पोलिस उपअधीक्षक सुनिल महादीक यांच्या नेतृत्वाखाली १५ सदस्यीय विशेष तपास पथक (एसआयटी) कार्यरत असून त्यात महिला पोलिस अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. बैठकीनंतर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी रोठा येथे जाऊन पीडित बालिकेच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. 'बालिकेला न्याय मिळवून देण्यासाठी शासन व प्रशासन पूर्णपणे बांधिल आहे,' असा विश्वास त्यांनी कुटुंबीयांना दिला. यावेळी आ. समीर कुणावार, जिल्हाधिकारी वान्मथी सी., पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल उपस्थित होते.

गोवंश तस्करीवर एलसीबीची कारवाई; २१ जनावरे जप्त, एकाला अटक

वर्धा जनमाध्यम : राज्यात गोवंशाच्या कत्तलीवर बंदी असतानाही अवैधरित्या जनावरांची वाहतूक करून त्यांना कत्तलखान्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रकार सुरूच असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. हिंगणघाट तालुक्यातील घाणमोड शिवारात कत्तलीसाठी नेण्याच्या उद्देशाने २१ गोवंशांना चारा-पाण्याविना झाडाला क्रूरपणे बांधून ठेवल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत सर्व जनावरांची सुटका केली. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हिंगणघाट परिसरात नियमित गस्त घालत असताना घाणमोड शिवारातील वाघसावली येथील एका शेताजवळ मोठ्या संख्येने गोवंशांना अमानुष पद्धतीने बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करताच पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तेथे २१ गोवंश अरुंद जागेत दाटीवाटीने बांधलेले असल्याचे दिसून आले. जनावरांसाठी ना चारा होता, ना पाण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्याशी प्राण्यांवरील क्रूरतेचे स्पष्ट चित्र समोर आले.

पोलिसांनी घटनास्थळी उपस्थित असलेल्या हनुमान दादाजी गौरकर (वय ५५, रा. वाघसावली, ता. हिंगणघाट) याला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी ही जनावरे नासीर कुरेशी (रा. हिंगणघाट) याची असून ती कत्तलीसाठी पाठविण्याच्या उद्देशाने तेथे ठेवण्यात आल्याची माहिती पुढे आली. त्यानंतर पोलिसांनी हनुमान गौरकर याला अटक केली, तर मुख्य आरोपी नासीर कुरेशी याचा शोध सुरू आहे.

या कारवाईत सुमारे २ लाख ९५ हजार रुपये किंमतीची २१ गोवंश जनावरे जप्त करण्यात आली. दोन्ही आरोपींविरुद्ध हिंगणघाट पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा तसेच अन्य संबंधित कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक ओमप्रकाश नागापुरे, खुशाल राठोड, मनोज धात्रक, महादेव सानप, आशिष महेशगौरी, दीपक जंगले, रितेश कुन्हाडकर, मंगेश आदे, विनोद कापसे आणि हर्षल सोनटक्के यांनी यशस्वीपणे पार पाडली.

या कारवाईमुळे जिल्ह्यातील गोवंश तस्करीविरोधातील पोलिसांची मोहीम अधिक तीव्र झाल्याचे स्पष्ट झाले असून, अवैध जनावर वाहतूक व कत्तलीच्या साखळीवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे संकेत पोलिस प्रशासनाने दिले आहेत.

घाणमोड शिवारात; क्रूरपणे बांधलेल्या जनावरांची केली मुक्तता

नावात बदल

माझे लिविंग सर्टिफिकेट वरील माझे नाव FARZANA PARWEEN MOHD. SHAFI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील FARZANA SHAFI SHEIKH हे नाव नमूद आहे. वरील नाव पासपोर्ट वर नमूद करावे.

पत्ता:- जाकीर हुसैन कॉलनी, हबीबीया मस्जिद जवळ, वर्धा. ४४२००१

गाय आडवी आल्याने भीषण अपघात; मोटरसायकलस्वाराचा जागीच मृत्यू

कारंजा घाडगे जनमाध्यम :कारंजा तालुक्यातील नारा येथील ३७ वर्षीय युवकाचा राष्ट्रीय महामार्गावरील भीषण अपघातात जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (२२ जुलै) दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास खुर्सापारजवळ घडली. या घटनेमुळे नारा गावावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नारा येथील प्रवीण रामकृष्ण गिऱ्हाडे (वय ३७) हे मोटरसायकलने नागपूरकडे जात होते. दरम्यान, खुर्सापारजवळ राष्ट्रीय महामार्गावर त्यांच्या एमएच ३२ एवाय ६०७७ क्रमांकाच्या मोटरसायकल समोर अचानक गाय आडवी आल्याने त्यांचा भीषण अपघात झाला. धडक इतकी जोरदार होती की, प्रवीण गिऱ्हाडे यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर मृतदेह काटोल येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आला. तेथे शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नारा येथे आणण्यात आला. सायंकाळी शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

प्रवीण गिऱ्हाडे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, नऊ वर्षांची मुलगी आणि पाच वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या अकाली निधनाने गावात हळहळ व्यक्त होत असून नारा परिसरात शोककळा पसरली आहे.

धर्मेंद्र प्रधान यांच्या 'राजीनाम्याचे' फेक पत्र, सोशल मीडियावर धुमाकूळ

वर्धा जनमाध्यम: NEET पेपरफुटी प्रकरणावरून देशभरात विद्यार्थी, पालक आणि विविध संघटनांचा संताप उसळलेला असतानाच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या कथित राजीनाम्याचे बनावट पत्र सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाले आहे. या पत्रामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची कोणतीही अधिकृत घोषणा किंवा केंद्र सरकारकडून पुष्टी झालेली नाही.

सोशल मीडियावरील या कथित पत्रात राजीनामा स्वीकारल्याचा दावा करण्यात आला असला, तरी प्राथमिक पडताळणीत ते बनावट असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी अशा अप्रमाणित संदेशांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, पेपरफुटी प्रकरणावरून देशभरातील आंदोलनाची तीव्रता कायम असून, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी अधिक आक्रमक होत आहे. सत्य आणि अफवा यातील फरक ओळखत अधिकृत माहितीचीच खातरजमा करणे, हीच सध्याच्या परिस्थितीत सर्वांची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त होत आहे.

जाहीर सूचना

माझे पती मदन एकनाथ भोयर याचे दिनांक ०४ मार्च २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे तीनचाकी मालवाहू वाहन क्रमांक MH32AK2195 हा आहेत. (नाते पत्नी) माझे नाव माधुरी मदनराव भोयर वय (४१) वार्ड न १, माळी पुरा नाचनगाव जि. वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र
माधुरी मदनराव भोयर -
वार्ड न १, माळी पुरा नाचनगाव जि. वर्धा -
७०२८९६६८०६

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

डॉक्टरांना मारहाणीचे प्रकरण:

रमेश म्हात्रेला आणखी काही काळ तुरुंगातच राहू द्या!

जामिनावरील स्थगिती कायम ठेवताना उच्च न्यायालयाची टिप्पणी



मुंबई/प्रतिनिधी : डोंबिवलीतील महापालिका रु ग्णालयात एक महिला डाक्टरसह तीन डाक्टरांना मारहाण केल्याप्रकरणी अटकेत असलेले शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी बुधवारी उच्च न्यायालयाकडे वाढते वय आणि मूत्रपिंडाच्या आजाराचा दाखल देउन जामीन देण्याची मागणी केली. मात्र, सीसीटीव्ही कॅमे-यात कैद झालेल्या मारहाणीच्या चित्रिकरणाचा न्यायालयाने दाखला दिला. तसेच, हल्ला करताना म्हात्रे २५ वर्षांच्या तरु णापेक्षाही ऊत्साही दिसत होता, असा टोला हाणून त्याला आणखी काही काळ तुरुंगातच राहू देण्याचे न्यायालयाने सुनावले व त्याच्या जामिनावरील स्थगिती कायम ठेवली.

हल्ल्याची आणि त्यानंतर डाक्टरांनी संप पुकारण्याच्या दिलेल्या इशा-याच्या पार्श्वभूमीवर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची स्वताहून (सुओमोटो) दखल घेतली होती. तसेच, सुट्टीच्या दिवशी (शनिवारी) विशेष सुनावणी घेउन म्हात्रे याला कल्याण दंडाधिका-यांनी मंजूर केलेल्या जामिनाला स्थगिती दिली होती. तसेच, त्याला पोलिसांना शरण येण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर, म्हात्रे पोलिसांना शरण गेला होता. या पार्श्वभूमीवर, बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी म्हात्रे हा ७३ वर्षांचा असून त्याला मूत्रपिंडाच्या आजारासह इतर अनेक आजार आहेत, त्यामुळे त्याला कठोर अटींसह जामीन मंजूर करण्यात यावा, अशी विनंती म्हात्रेच्यावतीने वकील सना रईस खान यांनी न्यायालयाकडे केली. एवढेच नव्हे, तर म्हात्रे याच्या कोठडीची गरज नाही आणि घटनेच्या दिवशी रु ग्णालयातील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण होती आणि रु ग्णाचा मृत्यूही होउ शकला असता. त्यामुळे, म्हात्रे तिथे केवळ मदत करण्याच्या उद्देशाने गेला होता, असेही खान यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, मारहाणीच्या कथित चित्रफितीत म्हात्रे एखाद्या २५ वर्षांच्या तरु णाप्रमाणे वागत असल्याचे दिसते, असा टोला हाणून तुम्हाला ती चित्रफित पाहायची आहे का? अशी विचारणा न्यायालयाने खान यांना केली. तुम्ही सार्वजनिक जीवनात असून तुमचे कर्तव्य नागरिकांना मदत करणे आहे की त्यांना मारहाण करणे ? असा संतप्त प्रश्नही न्यायालयाने म्हात्रे याच्या वकिलांचा युक्तिवाद फेटाळताना केला. म्हात्रे हा ७३ वर्षांचा असल्याचे वकिलाने सांगताच, मग त्याला आणखी काही काळ तुरु ंगात राहू द्या, असेही न्यायालयाने सुनावले व जामिनावरील स्थगिती ऊठवण्यास नकार दिला.न्यायालयाने संबंधित रु ग्णालयाला घटनेच्या दिवसाचे सीसीटीव्ही चित्रिकरण जतन करण्याचे आणि न्यायालयाला ते पाहण्याची इच्छा असल्यास ते जपून ऊलब्ध करून देण्याचे आदेश दिले. तसेच, अटकेनंतर म्हात्रे याला दाखल करण्यात आलेल्या ठाणे शासकीय रु ग्णालयालाही त्याच्या अटकेपासून ते रु ग्णालयातून घरी सोडण्यात येईपर्यंतच्या मुक्कामाचे सीसीटीव्ही चित्रिकरण जतन करण्याचे आदेश दिले.

मारहाण झालेल्या डाक्टरांच्या समर्थनार्थ भारतीय वैद्यक संघटनेने (आयएमए) दाखल केलेला हस्तक्षेप अर्ज मंजूर केला. रु ग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून डाक्टर किंवा रु ग्णालयाच्या कर्मचा-यांवर हल्ला केला जातो, तेव्हा सहा तासांच्या आत संस्थेतर्फे गुन्हा दाखल केला गेला पाहिजे. मात्र, या प्रकरणात रु ग्णालयाने घटनेनंतर लगेचच तक्रार नोंदवली नसल्याचे आयएमएतर्फे वरिष्ठ वकील एस. यू. कामदार यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. न्यायालयाने त्याची दखल घेउन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला नोटीस बजावली. तसेच, लगेचच घटनेची तक्रार न नोंदवण्याची महापालिकेची भूमिका अनाकलनीय असल्याची टिप्पणी केली. पोलिसांच्या निर्णयावरही प्रश्नचिन्हअटकेनंतर म्हात्रे याला दंडाधिका-यासमोर दूरसंवाद प्रणालीमार्फत (व्हीसी) ऊपस्थित करण्याच्या पोलिसांच्या निर्णयावरही न्यायालयाने यावेळी प्रश्न ऊपस्थित केला. तसेच, म्हात्रे याला न्यायालयात अशाप्रकारे हजर करण्याची मागणी करणारा तो पोलीस अधिकारी कोण होता हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे. अटकेनंतर आरोपीला न्यायालयासमोर कसे हजर करावे, म्हात्रे याला हजर करण्यासाठी या अधिका-याने स्वत:चीच कार्यपद्धती तयार केली का, अशी विचारणा करून न्यायालयाने त्याबाबत नाराजी व्यक्त केली.

जन्मदिवस जयंती म्हणून मानताना मन आतून तुटून जातंय

दादांच्या वाढदिवशी सुनेत्रा पवारांची भावुक पोस्ट

मुंबई/प्रतिनिधी : राज्याचे दिवंगत नेते अजित पवार यांची आज जयंती आहे. २८ जानेवारी रोजी विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अकस्मित निधनामुळे अवघा देश हळहळला होता. इतके वर्षे वाढदिवस साजरा करणा-या दादांची आज जयंती साजरी करताना महाराष्ट्रातील दादाप्रेमींच्या भावना दाटून आल्या आहेत. दरम्यान, अजित पवार यांच्या पत्नी आणि त्यांच्या पश्चात त्यांच्या पदाची जबाबदारी सांभाळणा-या राज्याच्या ऊपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अजित पवारांसाठी खास पोस्ट लिहिली आहे. यावेळी त्यांनी अजित पवारांबरोबरचे काही खास क्षणही फोटोद्वारे शेअर केले आहेत. एवढी वर्षे तुमचा जन्मदिवस मी अगदी आनंदाने, ऊत्साहाने आणि अभिमानाने साजरा केला. घर , कुटुंब आनंदात असायचं, शुभेच्छांचा वर्षाव असायचा. पण आज तुमचा हाच दिवस जयंती म्हणून मानताना माझं मन आतून पार तुटून जातंय. हे कटू सत्य स्वीकारायला माझं मन आजही अजिबात तयार होत नाही दादा, अशा शब्दांत सुनेत्रा पवारांनी आपल्या भावना मोकळ्या केल्या.

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुम्ही माझी सर्वात मोठी ताकद बनून सोबत राहिलात. तुमचा तो भक्कम आधार, कठीण प्रसंगात पाठीवर पडणारी तुमची विश्वासू थाप आणि मला दिलेली साथ. आज हे सगळं अचानक हरवून गेलंय, सगळं सगळं पोरकं झालंय यावर विश्वासच बसत नाही. काळाने माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार एवढ्या लवकर हिरावून नेईल, असं स्वप्नातही वाटलं नव्हतं,असं म्हणत सुनेत्रा पवारांनी त्यांचं दु:ख शब्दांत मांडण्याचा प्रयत्न केला. आज तुमचा हा दिवस साजरा करताना काळीज पिळवटून निघतंय, डोळ्यांतील अश्रू थांबायचं नाव घेत नाहीत. दादा, तुम्ही भलेही आज माझ्यासोबत शारीरिकदृष्ट्या नसलात, तरी तुमचे विचार, तुमच्या आठवणी , तुमचा लोकांप्रती सेवाभाव, शिस्त आणि तुम्ही दिलेलं प्रेम माझ्या प्रत्येक श्वासात, कणाकणात कायम जिवंत राहील. माझ्या आयुष्याच्या साथीदाराला, तुमच्या पवित्र आठवणींना भावपूर्ण आणि आदरपूर्वक प्रणाम, असं म्हणत सुनेत्रा पवारांनी अजित पवारांना शब्दरु पी आदरांजली वाहिली.

शरद पवार आणि सुप्रिया सुळेंनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख तथा जेष्ठ नेते खा. शरद पवार आणि खा. सुप्रिया सुळे यांनी बुधवारी सकाळी संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीमागचे कारण अद्याप स्पष्ट नसले तरी, दिल्लीत सुरु असलेल्या कॉक्रोच जनता पक्षाच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ही भेट असल्याचे समजते. नवी दिल्लीच्या जंतर मंतरवर सुरु असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला विरोधी पक्षांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. यानिमित्ताने मंगळवारी शरद पवार यांनी या आंदोलनस्थळी भेट दिली होती. यावेळी त्यांनी कॉक्रोच जनता पक्षाचे प्रमुख अभिजीत दीपके यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर, बुधवारी सकाळी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी अचानक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीला पोहोचले. संसदेतील मोदींच्या कक्षात ही भेट झाली आहे. पंतप्रधान कार्यालयाने मोदी आणि पवार यांच्या भेटीचे फोटो शेअर केले आहेत. यातील एका फोटोमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी शरद पवार यांच्या हाताला धरून आपुलकीने स्वागत करताना दिसतात. यावेळी शरद पवारांनी त्यांना एक निवेदन दिले आहे. मात्र, या भेटीमागचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे

जेनेरिक औषधांवर 200 टक्के टॅरिफ

वाशिंग्टन/नवी दिल्ली/वृत्तसंस्था : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देशांतर्गत औषध निर्मितीला चालना देण्यासाठी आणि परदेशी कंपन्यांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. अमेरिकेत आयात केल्या जाणा-या जेनेरिक औषधांवर टप्प्याटप्प्याने तब्बल २०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क अर्थात टॅरिफ लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. अमेरिकेच्या या निर्णयामुळे जगातील औषध निर्यातदार म्हणून ओळखल्या जाणा-या हिंदुस्थानच्या औषध उद्योगाला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. १ ऑगस्ट २०२६ पासून हे नवीन धोरण लागू केले जाईल. पहिले दोन वर्षे (२०२६-२०२८) अमेरिकेत आयात होणा-या सर्व जेनेरिक औषधांवर शून्य टक्के शुल्क राहील. तिस-या वर्षी (२०२८-२९) जेनेरिक औषधांवरील आयात शुल्क थेट १०० टक्के केले जाईल, तर चौथ्या वर्षी (२०२९ नंतर) हे शुल्क वाढवून २०० टक्के केले जाईल, अशी माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रूथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर एक पोस्ट शेअर करत दिली. अमेरिकेत जेनेरिक औषधांचे ऊत्पादन पुन्हा सुरू व्हावे, हाच या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. ज्या कंपन्या दिलेल्या मुदतीत अमेरिकेत आपले प्रकल्प आणि यंत्रसामग्री ऊभारणार नाहीत, त्यांना हा दंड सहन करावा लागेल. अमेरिकन जनतेच्या हिताचे रक्षण करण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, पेटंट असलेल्या, ब्रँडेड किंवा नवनवीन औषधांवरील सध्याचे यशस्वी धोरण जसे आहे तसेच राहील, असेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले. भारतीय औषध उद्योगासाठी अमेरिका ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राज्यपालांकडून अभिवादन

मुंबई/प्रतिनिधी : दिवंगत माजी ऊपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज लोकभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक निशिकांत देशपांडे; तसेच लोकभवनातील अधिकारी, कर्मचारी आणि तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार ऊपस्थित होते.

विधान भवनात अभिवादन

मुंबई/प्रतिनिधी : दिवंगत ऊपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आज विधान भवन येथे त्यांच्या प्रतिमेस विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे ऊपसभापती सचिन अहिर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी पुष्पहार अर्पण करू न अभिवादन केले. आमदार शिवाजीराव गर्जे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे, सचिव-४ शिवदर्शन साठ्ये, सहसचिव राजेश तारवी, ऊपसचिव विजय कोमटवार, (संचालक, वि.स.पागे), संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचा-यांनी देखील स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करु न अभिवादन केले.

मंत्रालयात अभिवादन, मान्यवरांकडून आदरांजली

मुंबई/प्रतिनिधी : : दिवंगत ऊपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आज मंत्रालयात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करू न अभिवादन केले.

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आमदार जयंत आसगावकर, आमदार शिवाजीराव गर्जे, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव ड?. अतुल पाटणे, ऊपमुख्यमंत्र्यांचे सचिव ड?.राजेश देशमुख आदींसह ऊपमुख्यमंत्री कार्यालयातील अधिकारी-कर्मचा-यांनी दिवंगत पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करू न अभिवादन केले. सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी निलेश हरड, यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यावेळी ऊपस्थित होते.

'अर्बन चॅलेंज फंड' अभियानाद्वारे आधुनिक, स्वावलंबी शहरे घडविणार-एकनाथ शिंदे

■ मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवशीच शासन निर्णय जारी ■ ४४ हजार ८०० कोटी रु पयांचे विकास प्रकल्प आकारला येणार

मुंबई/प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवशीच नगर विकास विभागाने 'अर्बन चॅलेंज फंड' अभियानाची राज्यातील सर्व ४२३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अंमलबजावणी करण्याचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय काढला आहे. राज्यात ४४ हजार ८०० कोटी रु पयांचे विकास प्रकल्प यातून आकाराला येणार असून यामुळे शहरांना आर्थिक स्वावलंबनाची नवी दिशा मिळणार असल्याचे ऊमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या शासन निर्णयाबाबत ऊमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ही मोहीम २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीत राबविण्यात येणार असून आवश्यकतेनुसार तिचा कालावधी आणखी तीन वर्षांनी वाढविण्याची तरतूद करण्यात आली आहे. या अभियानात ब्लेंडेड फायनान्सिंग पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. पात्र प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून कमाल २५ टक्के, किमान ५० टक्के निधी म्युनिसिपल बॉंड, बँक कर्ज किंवा सार्वजनिक-खाजगी भागीदारी याद्वारे ऊभारणे बंधनकारक राहील, तर ऊर्वरित २५ टक्के निधी राज्य शासन किंवा संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून ऊपलब्ध केला जाईल.

राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था या अभियानासाठी पात्र राहतील. विशेष म्हणजे एक लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी कर्ज परतफेड हमी ऊपयोजना लागू करण्यात आली आहे. त्यामुळे लहान शहरांनाही बाजारातून निधी ऊभारू न मोठे विकास प्रकल्प राबविणे सुलभ होणार आहे. या अभियानात पाणी व स्वच्छता, शहरांचा सृजनशील पुनर्विकास आणि शहरांना आर्थिक विकासाची केंद्रे बनविणे या तीन प्रमुख घटकांवर काम

केले जाणार आहे.अभियानांतर्गत डिजिटल गव्हर्नन्स, ट्रंक इन्फ्रास्ट्रक्चर, वाहतूक कोंडी कमी करणारे प्रकल्प, लास्ट माईल कनेक्टिव्हिटी, जुन्या शहरांचे व बाजारपेठांचे पुनरु ज्जीवन, नान-मोटराइज्ड ट्रान्सपोर्ट, ट्रान्झिट हब, ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट (टीओडी), नागरी पूर प्रतिबंधक प्रकल्प, एकात्मिक कचरा प्रक्रिया, ग्रीनफिल्ड व सेमी-ग्रीनफिल्ड विकास, रस्ते व ऊड्डाणपूल, नदीकाठ विकास, विविध योजनांत न समाविष्ट प्रकल्प, लँड बँक व्यवस्था आणि शहरातील दुग्धव्यवसायांचे पुनर्स्थलांतर अशा विविध विकासकामांना निधी ऊपलब्ध होणार आहे. तसेच २० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये कन्व्हेन्शन सेंटर, विरंगुळा केंद्रे, अत्याधुनिक सार्वजनिक ग्रंथालये, क्रीडा सुविधा, वाटर स्पोर्ट्स, मेडिटेशन सेंटर आणि वेलनेस पार्क ऊभारण्यासही प्राधान्य दिले जाणार आहे.प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (पीडीएमसी), प्रकल्प व्यवस्थापन युनिट (पीएमयू), जिल्हास्तरीय सल्लागार व नियंत्रण समिती आणि प्रत्येक शहरात स्वतंत्र अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. आवश्यक त्या ठिकाणी एसपीव्ही मार्फतही प्रकल्प राबविता येतील.'अर्बन चॅलेंज फंड ही केवळ निधी योजना नसून महाराष्ट्रातील शहरांचा विकास करण्यासाठीचा परिवर्तनकारी आराखडा आहे. या अभियानामुळे शहरांमध्ये आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण होतील, नागरी सेवा अधिक सक्षम होतील, गुंतवणुकीला चालना मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील आणि नागरिकांचे जीवनमान ऊंचावेल. भविष्यातील गरजा लक्षात घेउन महाराष्ट्रातील शहरे अधिक सक्षम, स्पर्धात्मक, शाश्वत आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असेही ऊमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संगणक-आधारित परीक्षा पद्धती लागू करण्याचा निर्णय जुलै 2027 पर्यंत स्थगित

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक

प्रणालीवर आधारित पद्धतीने घेण्याचा निर्णय जुलै २०२७ पर्यंत स्थगित केला आहे. याबाबत आयोगाने शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले आहे. आयोगाने २५ जून २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे २०२७ पासून या परीक्षा वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने आयोजित करण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र विविध ऊमेदवारांकडून प्रस्तुत परीक्षा प्रचलित पद्धतीने (ओएमआर) आधारीत घेण्यासंदर्भात प्राप्त झालेली निवेदने विचारात घेउन महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित (सीबीटी) पद्धतीने आयोजित करण्याबाबतचा निर्णय जुलै, २०२७ पर्यंत स्थगित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे 60 टक्के उपचार शासकीय रूग्णालयांतच व्हावेत

मुंबई/प्रतिनिधी :महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत किमान ६० टक्के ऊपचार शासकीय आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातूनच झाले पाहिजेत, असे स्पष्ट निर्देश देत सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले राज्य आरोग्य हमी योजनेचा जास्तीत जास्त निधी शासकीय रु ग्णालयांकडे वळविल्यास शासकीय आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आरोग्य हमी सोसायटीची आढावा बैठक सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाचे आयुक्त डॉ. सुनील भोकरे ऊपस्थित होते. तर राज्यातील सर्व क्षेत्रीय व्यवस्थापक आणि जिल्हा समन्वयक दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.मंत्री आबिटकर म्हणाले, महात्मा फुले जनआरोग्य योजना ही खाजगी रु ग्णालयकेंद्रित नसून जनताकेंद्रित योजना आहे. त्यामुळे नागरिकांना शासकीय आरोग्य संस्थांच्या माध्यमातूनच या योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळाला पाहिजे. शासनाच्या आरोग्य योजनांचा अधिकाधिक निधी शासकीय रु ग्णालयांकडे वळल्यास आरोग्य विभागाची अंतर्गत यंत्रणा अधिक बळकट होईल. यासाठी क्षेत्रीय व्यवस्थापक आणि जिल्हा समन्वयकांनी प्रभावीपणे काम करू न जिल्हा शल्यचिकित्सक व संबंधित अधिका-यांशी सातत्याने समन्वय ठेवावा. तसेच शासकीय रु ग्णालयांतील क्लेम मंजुरीतील अडचणी तातडीने दूर करू न योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी. राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या कामकाजात पारदर्शकता, ऊत्तरदायित्व आणि शासकीय आरोग्य संस्थांचे बळकटीकरण यावर विशेष भर देत प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत गुणवत्तापूर्ण व मोफत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी आणि आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्य यंत्रणेतील सर्वच घटकांनी संवेदनशीलपणे व समन्वयाने काम करावे, असे आवाहनही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

मुसळधार पावसामुळे वैष्णोदेवी, अमरनाथ यात्रा स्थगित

श्रीनगर : जम्मू कश्मिर आणि ऊत्तराखंडमध्ये सध्या मुसळधार पाउस पडत असून त्यामुळे अचानक येणारे पूर, ढगफुटी आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. वैष्णो देवी मंदिर, अमरनाथ यात्रा आणि चारधाम यात्रेवर परिणाम झाला आहे. जम्मूतील वैष्णो देवी यात्रा आणि काश्मीरमधील अमरनाथ यात्रा मुसळधार पाउस, अचानक आलेला पूर आणि ढगफुटीमुळे प्रभावित झाली आहे. त्यामुळेच सलग चौथ्या दिवशी या दोन्ही यात्रा स्थगित झाल्या आहेत. जम्मू आणि कश्मिरमध्ये मुसळधार पावसामुळे सोमवारी वैष्णो देवीचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या अर्धकुमारी भवनकडे जाणा-या नवीन मार्गावर मोठे भूस्खलन झाले. यामुळे, या मार्गावरील यात्रेकरूंची वाहतूक आणि बॅटरी कार सेवा स्थगित करण्यात आली. वैष्णो देवीच्या भाविकांना नेहमीच्या मार्गाने जाण्यास सांगण्यात आले आहे. तेथील शाळाही २६ जुलैपर्यंत बंद आहेत. माता वैष्णो देवी तीर्थक्षेत्र मंडळाचे कर्मचारी आणि मदत पथकांनी ढिगारे हटवण्याचे काम तीव्र केले आहे. गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसामुळे जम्मू आणि कश्मिरच्या बहुतांश भागांमध्ये नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत. पावसामुळे डोडा, पूंछ आणि राजौरी येथे तेवीस जणांचा मृत्यू झाला आहे. जनतेला आणि भाविकांना सतर्क राहण्याचा आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईवरून तृणमूल काँग्रेस आक्रमक

नवी दिल्ली : दिल्लीत शांततापूर्ण आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या कारवाईचे पडसाद संसदेत ऊमटले आहेत. या गंभीर मुद्यावर तृणमूल काँग्रेसने मंगळवार, २२ जुलै रोजी राज्यसभेत नियम २६७ अंतर्गत नोटीस बजावून संसदेचे नियमित कामकाज थांबवून या विषयावर तातडीने चर्चा करण्याची मागणी केली आहे. शांततापूर्ण आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांना दिलेली वागणूक लोकशाही मूल्यांच्या पूर्णपणे विरोधात असल्याचे पक्षाने म्हटले आहे. तृणमूल काँग्रेसने आपल्या नोटीसमध्ये नमूद केले आहे की, २० जुलै रोजी सीजेपीच्या आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी कथितरित्या बळाचा वापर केला. ही घटना केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नसून विद्यार्थ्यांच्या मूलभूत लोकशाही हक्कांशी संबंधित आहे. नियम २६७ अंतर्गत नोटीस देण्याचा मुख्य उद्देश सभागृहाचे सामान्य कामकाज बाजूला ठेवून एका महत्त्वाच्या आणि तातडीच्या विषयावर चर्चा घडवून आणणे हा असून सरकारने यावर संसदेत सविस्तर ऊत्तर द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

राजकारणापलीकडे...

मंदिराच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल, अशी कोणतीही परिस्थिती निर्माण होऊ नये, याची चिंता संघालाही असणे स्वाभाविक आहे. संघाने सार्वजनिक जीवनात नैतिकता, शिस्त आणि पारदर्शकतेवर सातत्याने भर दिला आहे. त्यामुळे या प्रकरणात संघाने पारदर्शकतेच्या बाजूने भूमिका घेतली, तर त्याकडे केवळ राजकीय दबाव म्हणून पाहता येणार नाही. उलट, राम मंदिराविषयी समाजात असलेला विश्वास टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेले संस्थात्मक उत्तरदायित्व म्हणून त्याचा विचार करावा लागेल. देशात अनेक धार्मिक संस्थांकडे दर वर्षी हजारो कोटी रुपयांच्या देणग्या जमा होतात. या सर्व संस्थांमध्ये लेखापरीक्षण, सार्वजनिक आर्थिक अहवाल आणि डिजिटल व्यवस्थापनाची पद्धत अधिक मजबूत करण्याची गरज वारंवार व्यक्त केली जाते. राम मंदिरावरील वादामुळे हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राजकीयदृष्ट्या पाहिले तर हा मुद्दा आगामी उत्तरप्रदेश स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्येही प्रभाव टाकू शकतो. ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका आणि महापालिका निवडणुका या राज्यातील राजकीय वातावरणाचा अंदाज घेण्यासाठी महत्त्वाच्या मानल्या जातात. या निवडणुकांमध्ये स्थानिक प्रश्न महत्त्वाचे असले, तरी धार्मिक आणि भावनिक मुद्द्यांचाही प्रभाव असतो. विरोधी पक्ष या वादाचा वापर सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमेला धक्का देण्यासाठी करतील, तर भाजप राम मंदिराच्या उभारणीचा ऐतिहासिक संदर्भ आणि विकासकामांचा मुद्दा पुढे करेल. त्यामुळे स्थानिक निवडणुकांमध्येही हा विषय चर्चेचा केंद्रबिंदू राहू शकतो. भारतातील मतदार आता केवळ भावनिक घोषणांवर निर्णय घेत नाहीत. धार्मिक श्रद्धा कायम असली तरी सार्वजनिक संस्थांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा वाढली आहे. डिजिटल युगात प्रत्येक आर्थिक व्यवहारावर प्रश्न विचारले जातात. माहितीच्या अधिकारामुळे आणि सामाजिक माध्यमांमुळे कोणताही मुद्दा लपवणे कठीण झाले आहे. त्यामुळे धार्मिक संस्थांनाही आधुनिक आर्थिक व्यवस्थापन स्वीकारावे लागणार आहे. मात्र या संपूर्ण प्रकरणात एक गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आरोप झाले म्हणजे ते सिद्ध झाले, असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. त्याचप्रमाणे श्रद्धेच्या नावाखाली कोणत्याही चौकशीची गरज नाही, असे म्हणणेही लोकशाहीच्या तत्त्वांना धरून नाही. निष्पक्ष चौकशी, स्वतंत्र लेखापरीक्षण आणि तथ्यांवर आधारित निष्कर्ष हीच योग्य दिशा ठरू शकते. सर्वोच्च न्यायालयाने राम मंदिराचा मार्ग संविधानाच्या चौकटीतून मोकळा करून दिला. त्याच संविधानिक मूल्यांनुसार मंदिराच्या व्यवस्थापनातही पारदर्शकता अपेक्षित असणे स्वाभाविक आहे. निवडणुकीत जातीय समीकरणे, बेरोजगारी, महागाई, कायदा-सुव्यवस्था आणि कल्याणकारी योजना हेही महत्त्वाचे मुद्दे असतील. तरीही राम मंदिराशी संबंधित कोणतीही घटना भावनिकदृष्ट्या प्रभावी असल्याने तिचा निवडणुकीवर काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. राम मंदिराविषयी कोट्यवधी भारतीयांच्या मनात अपार श्रद्धा आहे. त्या श्रद्धेला कोणताही धक्का लागू नये, यासाठी मंदिराच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पूर्ण पारदर्शकता, नियमित लेखापरीक्षण आणि सार्वजनिक उत्तरदायित्व असणे आवश्यक आहे. सरकारची सुधारात्मक पावले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका आणि विरोधकांची टीका या सर्वांचा अंतिम उद्देश राजकीय लाभ नसून, सार्वजनिक विश्वास अबाधित ठेवणे असायला हवा. राम मंदिर केवळ एका पक्षाचा किंवा संस्थेचा विषय नाही. ते संपूर्ण भारतीय समाजाच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग आहे. निवडणुकीत हा मुद्दा निश्चितच चर्चेत राहील. मात्र अंतिम निर्णय मतदारच घेतील. त्यासाठी आवश्यक आहे ती वस्तुनिष्ठ माहिती, निष्पक्ष चौकशी आणि राजकारणापलीकडे जाऊन सार्वजनिक विश्वास जपण्याची प्रामाणिक इच्छा.

झुरळ आंदोलनाने मोदींचा मार्ग प्रशस्त !

झुरळांचे आंदोलन झुराळांचेच राहिले असते तर त्यांच्या मागण्याबाबत काही झालेही असते. पण झुरळांच्या खांद्यावर इंडी आघाडीने बंदुका ठेवल्या आणि झुरळांचे आंदोलन केंव्हा इंडी आघाडीचे झाले हे झुराळांनाही कळले नाही. त्यामुळे झुरळांच्या आंदोलनामुळे मोदींचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे मा.न्यायमूर्ती सूर्यांकांत एका टिपणीत कांही बेरोजगार युवकांसाठी 'झुरळ कधीच मरत नसतात' अशा आशयाचे वक्तव्य केले आणि झुरळ आंदोलनाला अंकुर फुटला.अमेरिकेतून अभिजीत दिपके नावाच्या एका युवकाने 'झुरळ जनता पार्टीची'संकल्पना मांडली.पेपर फुटीवरून युवकांना आंदोलनाचे आवाहन केले.अभिजीत दिपके भारतात आला.त्याने आंदोलन सुरू केले.देशभरात त्याच्या आवाहनाला हळू हळू प्रतिसाद मिळत होता.सुरुवातीला हा प्रतिसाद कमीच होता.त्यामुळे राजकारणात तितकी प्रगल्भता आणि पक्वता नसल्यामुळे तूर्तास मिळालेले अपयश झुराळांना पचवता आले नाही.ते कदाचित घाबरले असतील.लोकमनात झुरळांविषयी बरी भावना होती.शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा या साठी जनभावना सुप्त असली तरी बऱ्यापैकी होती.पेपरफुटीवरून जनतेत रोष होताच.त्यामुळे झुरळ आंदोलकानी जरा दम धरायला हवा होता.

त्यात झुरळांनी पुकारलेले आंदोलनात नियोजनाचा अभाव,दिशेचा अभाव,परिपक्वतेचा अभाव असल्यामुळे संयम आणि विवेकाची कमतरता.सुरुवातीच्या कमी प्रतिसादामुळे ते अस्वस्थ झाले.आंदोलन फसते की काय?हा संभ्रम त्यांच्यात निर्माण झाला.या परिस्थितीचा फायदा घेत या आंदोलनात सोनम वांगचुक यांचा प्रवेश झाला.त्यांनी आमरण उपोषण सुरू केले.त्यांना वाटले सरकार उपोषणाने एक दोन दिवसात झुकेल.पण तसे होताना दिसले नाही.मुद्दा चिघळत गेला.मोदी विरोधकांना आयते कोलीत मिळाले.सुरुवातीला त्यांनी अभिजित दिपके यांना दूर संपर्क म्हणजे भ्रमणध्वनीवरून चौकशी,विचारपूस करायला सुरुवात केली.इथेच घात झाला.एव्हढि मोठी नेते मंडळी विचारपुस करताहेत म्हणजे मी कोणीतरी मोठा ही हवा दिपकेच्या डोक्यात घुसली.म्हणजे अण्णा हजारे बाबत 'म्हाताऱ्यांनी आराम करावा'असा त्यानी दिलेला उन्मत्त सल्ला लोकांनी ऐकला.थोडक्यात मीच देशाचा युवानेता हा मिथ्यासमज त्याच्या मनात फोफावला.'ग' ची बाधा झाली.

याचाच फायदा घेऊन सरकार विरोधी पक्षातील एकेकाचा चंचूप्रवेश सुरू झाला.त्यामुळे आंदोलनात मोदी विरोधी

तत्व घुसले.केजरीवाल,डिंपल यादव,उद्धव ठाकरे,सुप्रिया सुळे असे एकेक घुसू लागले.त्यांच्या घुसण्याने पेपरफुटी,शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागे पडला आणि राजकारण सुरू झाले.काही फुटीरतावादी लोक मंचाचा फायदा घेत अनर्गल गोष्टी विनाकारण बोलू लागले.कुणाल कामरा,स्वरा भास्कर ,शबाना आझमी अशा व्यक्ती ज्यांच्याबद्दल भारतातील बहुतांश लोकात प्रचंड राग आहे त्यांनी मंचावरून वाचाळवीरता सुरू केली.

कोणी अल्लाहचे नाव,कुणी सिता के पती,कुणी हिंदू धर्मावर अभद्र टिप्पण्या तर कुणी संघावर बरळणी सुरू केली.इथे आंदोलनाची दिशाच बदलली. आंदोलन आता झुरळांचे राहिले नाही तर ते इंडी आघाडीचे झाले.या देशात इंडी आघाडी बद्दल जनमत काय आहे हे सर्वांना ज्ञात आहे.मनामनातले आणि घराघरातले आंदोलन झुरळांच्या अपरिपक्वतेमुळे संकुचित झाले.लोकभावना आहत झाल्या. लोकांचे आंदोलन मोदी विरोधकांच्या आंदोलनात रूपांतरित झाले. झुरळांविषयी सद्भावना असलेले लोक आता झुराळांना शिव्या देवू लागले.

सोनम वांगचुक यांचे उपोषण सरकारने सफाईने मोडीत काढले.ही घटना पाहून झुरळांचे नेते बिथरले आणि त्यांचा संयम सुटला.त्यात इंडी आघाडीच्या लोकांनी देशभरातून दिल्ली गाठली.चिथावण्या दिल्या गेल्या.आंदोलन हिंसक झाले.त्यात सर्वात शेवटी विरोधी पक्ष नेते राहुल गांधींचा प्रवेश झाला आणि मोदींचा मार्ग प्रशस्त झाला.

✍विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी

झुराळांना अनुभव नसल्यामुळे ते वाहावत गेले.जे लोक देशातील जनतेला अजिबात आवडत नाहीत, ज्यांना लोक देशविरोधी समजतात, ज्यांच्याविषयी देशात प्रचंड राग आहे अशा सर्व माणसांनी झुरळांचा मंच ताब्यात घेतला.निट परीक्षा पेपरफुटी,शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा हे विषय गौण ठरवून योजनापूर्वक पेपरफुटीचा विषय मागे पाडला आणि जो तो आपापले विषय रेटु लागला.देशातील जनता झुरळ विरोधी झाली.मला त्यांना मिळणारा पैसा,रोजचे जेवण,व्यवस्थापन याबाबत बोलायचे नाही कारण आंदोलन म्हटले की,या व्यवस्था येणारच.त्यासाठी कुणीतरी मदत करणारच. आंदोलनासाठी विदेशातून पैसा आला नसेल ही विधायक अपेक्षा.असो.

थोडक्यात आंदोलन पेपरफुटीचे होते ते मोदी विरोधकांनी व्यापून टाकले, मुद्दा भरकटत गेला.आंदोलन इंडी आघाडीच्या हातात गेले.आता इंडी आघाडी देशभर आंदोलन करीत आहे.लोक आता समजून गेले की हे आंदोलन भरकटले.

आंदोलन करण्यासाठी एक दोन महिन्यापूर्वी नियोजन पाहिजे, कागदावरचे नियोजन जमिनीवर उतरले पाहिजे,आंदोलनाची दिशा ठरली पाहिजे ,त्यासाठी उपयोजन,प्रत्यक्ष कृती याबाबत निश्चितता पाहिजे. अभिजीत दिपके यांनी यातील कोणतीही बाब केली नाही.ते आंदोलनाच्या दिवशीच भारतात आले.आंदोलन सुरू केले.आंदोलनजिवींनी आंदोलन भरकटवले आणि सर्वात शेवटी इंडी आघाडीने ताबा घेतला.भारताचा नेपाळ करू,मोदींचे सरकार पाडू,मोदींनी राजीनामा द्यावा.त्यामुळे हे आंदोलन मोदी विरोधक विरुद्ध मोदी समर्थक असे बनले.

या देशात मोदी विरोधकांपेक्षा मोदी समर्थक खूप अधिक आहेत.त्यामुळे हे आंदोलन फार काळ टिकेल असे वाटत नाही.याशिवाय संसदेवर मोर्चा, मोदींच्या घराला घेराव,तुकडे गैंगचे नारे,पोलिसांना मारहाण, भारताचा नेपाळ करू हे सर्व भारतीयांना पचत नाही.मोदींनी राजीनामा द्यावा तर मग काय राहुल गांधींना प्रधानमंत्री करायचे?झुरळांनी उगाच उंटाच्या पार्श्वभागाचे चुंबन घेण्याचा प्रयत्न सुरू केला.भारतातील जनता प्रगल्भ आहे.झुरळांचे आंदोलन झुराळांचेच राहिले असते तर त्यांच्या मागण्याबाबत काही झालेही असते.पण झुरळांच्या खांद्यावर इंडी आघाडीने बंदुका ठेवल्या आणि झुरळांचे आंदोलन केंव्हा इंडी आघाडीचे झाले हे झुराळांनाही कळले नाही.त्यामुळे झुरळांच्या आंदोलनामुळे मोदींचा मार्ग प्रशस्त झाला असे माझे मत आहे.

वाशिम
मो.९८२२२६२७३५

दुहेरी चक्रव्यूहात छोटे उद्योग

यंदाच्या राष्ट्रीय एमएसएमई दिनानिमित्त देशभरात सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांचा रोजगारनिर्मिती, औद्योगिक उत्पादन आणि निर्यात क्षेत्रातील कणा म्हणून गौरव करण्यात आला. त्यानंतर अवघ्या तीन दिवसांनी जीएसटी अंमलबजावणीला नऊ वर्षे पूर्ण झाल्याचा उत्सवही साजरा करण्यात आला; मात्र या दोन्ही घटनांच्या पार्श्वभूमीवर एक कटू वास्तव समोर येते. भारतातील छोट्या उद्योजकांना आजही औपचारिक अर्थव्यवस्थेचा भाग बनण्यासाठी सहज आणि व्यवहार्य मार्ग उपलब्ध झालेला नाही. धोरणांच्या अशा चक्रव्यूहात ते अडकले आहेत की, एका बाजूला मोठ्या कंपन्या त्यांची देयके महिनोन महिने अडकवून ठेवतात, तर दुसऱ्या बाजूला कर व्यवस्था त्यांना प्रत्यक्षात हातात न आलेल्या उत्पन्नावरही तत्काळ कर भरण्यास भाग पाडते.

भारतातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) अर्थव्यवस्थेचा कणा म्हटले जाते. रोजगारनिर्मिती, उत्पादन, निर्यात आणि प्रादेशिक आर्थिक विकासात या क्षेत्राचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, तरीही वस्तुस्थिती अशी आहे की, लाखो लहान उद्योजकांना औपचारिक अर्थव्यवस्थेत प्रवेश करण्याचा व्यवहार्य मार्ग आजही दिसत नाही. एका बाजूला मोठ्या कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडून होणारा देयकांचा विलंब, तर दुसऱ्या बाजूला वस्तू व सेवा कर (जीएसटी) व्यवस्थेतील कठोर करभरणा नियम, या दुहेरी कात्रीत एमएसएमई उद्योग अडकले आहेत. परिणामी, अनेक उद्योग केवळ भांडवलाच्या टंचाईमुळे अडचणीत येत आहेत.

एमएसएमई विकास कायदा, २००६ मधील कलम १५ नुसार, लिखित करार असल्यास खरेदीदाराने पुरवठादाराचे देयक ४५ दिवसांच्या आत अदा करणे बंधनकारक आहे. करार नसल्यास ही मुदत १५ दिवसांची आहे. या कालमर्यादेचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक व्याज आकारण्याचीही तरतूद आहे; मात्र प्रत्यक्षात हे नियम केवळ कागदावरच दिसतात. अनेक मोठ्या खासगी कंपन्या तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम ९०,१२० किंवा अगदी १८० दिवसांनंतरही देयके अदा करतात. त्यामुळे लहान उद्योग प्रत्यक्षात मोठ्या कंपन्यांना व्याजमुक्त कर्जपुरवठाच करीत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

देयकांचा विलंब कमी करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या देखरेखीखाली ट्रेड रिसिव्हेबल्स डिस्काऊंटिंग सिस्टीम (टीआरईडीएस) ही डिजिटल व्यवस्था सुरू करण्यात आली. या व्यासपीठावर एमएसएमई उद्योगांना आपली बिले बँकांकडे सवलतीच्या दराने डिस्काऊंट करून तातडीने निधी मिळविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली; मात्र या योजनेला अपेक्षित यश मिळाले नाही. कारण, मोठ्या कंपन्या आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम टीआरईडीएसवर नोंदणी करण्यास किंवा बिलांना मंजुरी देण्यास टाळाटाळ करतात.

या प्रणालीत बिल मंजूर झाल्यानंतर परिपक्वतेच्या दिवशी रक्कम आपोआप वजा होते आणि विलंब झाल्यास त्याची नोंद पतमापन संस्थांकडे जाते. त्यामुळे स्वतःची पत अबाधित ठेवण्यासाठी अनेक मोठ्या कंपन्या या प्रणालीपासूनच दूर राहतात. परिणामी, लहान पुरवठादार पुन्हा निधीअभावी अडचणीत सापडतात.

याचवेळी जीएसटीची विद्यमान रचना या संकटात अधिक भर घालते. जीएसटी हा प्रत्यक्ष रक्कम मिळाल्यानंतर नव्हे, तर चलन जारी झाल्यानंतर देय ठरतो. म्हणजेच उद्योगाने ग्राहकाला चलन दिल्यानंतर पुढील महिन्याच्या २० तारखेपर्यंत कर भरणे बंधनकारक असते. मग, त्या बदल्यातील रक्कम प्रत्यक्ष मिळाली असो वा नसो. उदाहरणार्थ, १८ टक्के जीएसटी असलेले चलन दिल्यानंतर उद्योगाला स्वतःच्या खिशातून कर भरावा लागतो; परंतु खरेदीदाराला ४५ दिवसांची कायदेशीर मुदतही पाळण्याची सक्ती प्रत्यक्षात होत नाही. त्यामुळे उद्योगाच्या रोख प्रवाहावर गंभीर परिणाम होतो. याचा थेट परिणाम कामगारांचे वेतन, कच्चा माल खरेदी

✍डॉ. अजित रानडे

आणि दैनंदिन व्यवसायावर होतो. अनेक उद्योगांना बाजारातून जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागते किंवा उत्पादनच कमी करावे लागते. ग्रामीण आणि निमशहरी औद्योगिक भागांमध्ये इंटरनेट सुविधेचा अभाव, डिजिटल साक्षरतेची कमतरता आणि कर पोर्टलची गुंतागुंत या समस्या वेगळ्याच आहेत.

त्यामुळे औपचारिक व्यवस्थेत सहभागी होण्याचा खर्च आणि जोखीम दोन्ही वाढतात.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाच्या असंघटित क्षेत्रातील उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणानुसार देशात सुमारे ७७ दशलक्ष बिगर कृषी आणि बिगर बांधकाम असंघटित उद्योग अस्तित्वात आहेत; परंतु त्यापैकी अवघे सुमारे १ दशलक्ष सूक्ष्म उद्योग जीएसटीअंतर्गत नोंदणीकृत आहेत. जीएसटी नेटवर्कच्या आकडेवारीनुसार १ कोटी रुपयांपेक्षा कमी वार्षिक उलाढाल असलेले सुमारे ७ दशलक्ष करदाते आहेत; मात्र प्रत्यक्ष सर्वेक्षणात जीएसटी नोंदणी केलेल्या अशा उद्योगांची संख्या १.२ दशलक्षपेक्षाही कमी आढळते. ही तफावत कर चुकवेगिरीचे नव्हे, तर औपचारिक व्यवस्थेबाबत असलेल्या भीतीचे आणि आर्थिक अडचणींचे द्योतक आहे.

या परिस्थितीमुळे लहान उद्योगांसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. जीएसटी नोंदणी टाळल्यास मोठ्या कंपन्यांच्या पुरवठा साखळीत प्रवेश मिळत नाही. कारण, मोठ्या उद्योगांना इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ मिळविण्यासाठी जीएसटी नोंदणीकृत पुरवठादारांचीच आवश्यकता असते. दुसरीकडे नोंदणी केल्यास कर भरण्याचा ताण, देयकांचा विलंब आणि रोख प्रवाहातील अडचणी यांचा सामना करावा लागतो. सरकारने एमएसएमई समाधान पोर्टलद्वारे विलंबित देयकांविरोधात तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. प्रत्यक्षात त्याचा वापर मर्यादित आहे. अनेक लघुउद्योगांचा ८० ते १०० टक्के व्यवसाय एकाच मोठ्या ग्राहकावर अवलंबून असतो. अशा स्थितीत त्या ग्राहकाविरुद्ध तक्रार दाखल करणे म्हणजे स्वतःच व्यवसाय धोक्यात घालण्यासारखे ठरते. तक्रार केल्यानंतर संबंधित उद्योगाला शांतपणे पुरवठादारांच्या यादीतून वगळले जाण्याचा धोका असतो.

जीएसटीतील १८० दिवसांच्या इनपुट टॅक्स क्रेडिट परताव्याचा नियमही यातील विसंगती अधोरेखित करतो. खरेदीदाराने १८० दिवसांपर्यंत देयक न दिल्यास त्याला घेतलेला कर सवलतीचा लाभ व्याजासह सरकारकडे परत करावा लागतो. सरकारला त्याचा महसूल मिळतो; परंतु ज्याचा पैसा अडकला आहे त्या एमएसएमई उद्योगाला कोणताही कर परतावा किंवा आर्थिक दिलासा मिळत नाही. परिणामी, उद्योगाकडे थकीत देणी आणि रोख टंचाई एवढेच उरते. ही परिस्थिती बदलण्यासाठी धोरणात्मक सुधारणांची गरज आहे. सर्वप्रथम ठरावीक उलाढालीपर्यंतच्या सूक्ष्म उद्योगांसाठी रोख प्राप्तीवर आधारित जीएसटी प्रणाली लागू करण्याचा विचार करणे आवश्यक आहे. उद्योगाच्या बँक खात्यात प्रत्यक्ष रक्कम जमा झाल्यानंतरच जीएसटी भरण्याची मुभा दिल्यास रोख प्रवाहावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल.

दुसरे म्हणजे, कमी इंटरनेट क्षमतेवर चालणारे, अत्यंत सोपे आणि वापरकर्ता अनुकूल जीएसटी पोर्टल विकसित करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागांतील उद्योगांसाठी मासिक अनुपालन प्रक्रिया शक्य तितकी सुलभ करणे आवश्यक आहे. तिसरे म्हणजे, जीएसटी नेटवर्क आणि टीआरईडीएस यांच्यात थेट डिजिटल समन्वय निर्माण करणे गरजेचे आहे. २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या कंपन्यांना जारी केलेले ई-चलन तयार होताच त्याची टीआरईडीएसवर स्वयंचलित नोंद व्हावी आणि त्या आधारे बँकांनी तातडीने वित्तपुरवठा करावा. मोठ्या कंपन्यांना बिल मंजुरी रोखून ठेवण्याचा अधिकार राहू नये.

एमएसएमई क्षेत्राला अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून गौरविणे पुरेसे नाही. या क्षेत्राला औपचारिक अर्थव्यवस्थेत टिकून राहण्यासाठी व्यवहार्य, न्याय्य आणि वास्तवाशी सुसंगत धोरणात्मक चौकट उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे.

देयकांची शिस्त, कर प्रणालीतील लवचिकता आणि तंत्रज्ञानाधारित वित्तपुरवठा या तीन बाबींमध्ये मूलभूत सुधारणा झाल्याशिवाय एमएसएमई क्षेत्राची खरी क्षमता देशाच्या आर्थिक विकासासाठी पूर्णपणे उपयोगात येणार नाही.

वीज बिल माफी योजनेची तालुकानिहाय रक्कम जाहीर करा

माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई

विषय: महाराष्ट्रातील शेतक-यांची ४८००० कोटी रुपयांची वीज बिल माफी योजनेची तालुका निहाय रक्कम जाहीर करण्यात यावी.

सस्नेह नमस्कार,

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.महाराष्ट्रातील शेतक-यांच्या कर्जमाफीनंतर (ती अजून मिळालेली नाही) आपण ४८००० कोटी रुपयाची विजबिल माफी योजना जाहीर केली आहे. या घोषणांमुळे, 'शेतकरी कर्जातच जन्मतो, कर्जातच वाढतो व कर्जातच मरतो' या स्थितीत काही बदल होणार नाही, तरी आजचे मरण उद्यावर ढकलले जात आहे म्हणून आपले आभार व्यक्त करतो.

सरकारच्या सर्वच कल्याणकारी योजनांनमध्ये कोरडवाहू शेतकऱ्यांवर सतत उपेक्षा व अन्याय होत आला आहे. कर्जमाफी योजनेत जमिनीची मर्यादा न ठेवता रक्कमेची मर्यादा ठरवून हा अन्याय काही प्रमाणात दूर करण्याचा प्रयत्न आहे.

पुर्व प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंगजी यांनी २००८ साली जारी केलेली राष्ट्रीय कर्जमाफी योजनेत ५ एकराच्या शेतक-यांची पूर्ण कर्ज माफी व ५ एकराच्या वरच्या शेतक-यांची २५टक्केच कर्जमाफी, या अन्यायावर आम्ही ओरडलो व मग ५ एकराच्या वरच्या शेतक-यांची कमीतकमी २० हजार व २५ टक्के जे जास्त असेल ते माफ करण्याचा निर्णय झाला. तरी एकूण कर्जमाफीच्या रक्कमेतील ५० टक्के पश्चिम महाराष्ट्र २० टक्के मराठवाडा, व १८ टक्के विदर्भ (जाधव समितीचा अहवाल) असे वाटप होत.

आज आपण जी ४८हजार कोटी रूपयाची विजबील माफी योजना जाहीर केली आहे, त्यात सुद्धा असाच प्रकार होणार अशी आम्हाला शंका आहे. विदर्भाचा कोरडवाहू प्रदेशाचे मुख्यमंत्री असताना असा अन्याय होवू नये ही अपेक्षा चूक म्हणता येणार नाही.

तालुकानिहाय रक्कम जाहीर व आमची शंका चूक ठरली तर आम्हाला आनंद होईल. नाहीतर आमची आपणांस विनंती आहे की,महाराष्ट्रातील (मराठवाडा-विदर्भ) कोरडवाहू शेतक-यांना एकरी १० हजार(दहा हजार)रुपयाचे अनुदान जाहीर करून त्यांना वातावरण बदल व अनिश्चीत बाज़ार याचा सामना करण्यासाठी मदत करावी.महाराष्ट्राच्या निर्मिती पासून एक समज आहे,'मुख्यमंत्री विदर्भाचा पण तिजोरी पश्चिम महाराष्ट्राचीच,' यात बदल व्हावा हीच इच्छा व्यक्त करतो.धन्यवाद.

आपला
विजय जावंधिया
शेतकरी संघटना पाईक
मो.९४२१७२७९९८

गुरूवार, दि. २३ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

कौशल्य विकासाच्या नावाखाली कोट्यवधींचा निधी खर्च..!

बंजारा आर्ट फाउंडेशनची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, पालकमंत्री यांच्याकडून चौकशीचे आदेश..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २२ : जिल्ह्यात डीपीसी अंतर्गत राबविण्यात आलेल्या किमान कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम (सन २०२४-२५) मध्ये निधी वितरण, प्रशिक्षण मंजुरी आणि अंमलबजावणी प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप पुन्हा एकदा समोर आला आहे. यावेळी बंजारा आर्ट फाउंडेशन, यवतमाळ यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर करत, आपल्या संस्थेशी कोणताही कायदेशीर सामंजस्य करार (MoU) न करता इतर प्रशिक्षण केंद्रांना कार्यादेश देण्यात आल्याचा गंभीर आरोप केला आहे.

तक्रारीनुसार, बंजारा आर्ट फाउंडेशन हे कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी शासनाकडे नोंदणीकृत प्रशिक्षण प्रदाता (TP) असून संस्थेचा TP ID २१६२६२ आहे. संस्थेच्या नावावर प्रशिक्षणास मंजुरी (Approval) मिळालेली असतानाही प्रत्यक्ष प्रशिक्षण इतर केंद्रांना देण्यात आले. तसेच या प्रक्रियेत संस्थेला कोणतीही पूर्वसूचना किंवा अधिकृत माहिती देण्यात आली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारीत पुढे असा आरोप करण्यात आला आहे की, संबंधित प्रशिक्षण केंद्रांकडून तत्कालीन अधिकाऱ्यांच्या संगनमताने निधीची बिले काढण्यात आली असावीत. त्यामुळे संपूर्ण प्रकरणात आर्थिक अनियमितता आणि प्रशासकीय गैरव्यवहार झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारदारांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट नमूद केले आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित योजनेअंतर्गत कोणताही निधी वितरित करू नये. तसेच दोषी अधिकारी आणि संबंधित प्रशिक्षण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. यापूर्वीही डीपीसी अंतर्गत किमान कौशल्य विकास कार्यक्रमातील निधी वितरणा संदर्भात गंभीर तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना सविस्तर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली होती. मात्र त्या चौकशीचे अंतिम निष्कर्ष आणि पुढील कारवाई अद्याप स्पष्ट न झाल्याने विविध प्रश्न उपस्थित होत आहेत. विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, बंजारा आर्ट फाउंडेशनच्या नावावरही प्रत्यक्ष प्रशिक्षण न होता मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याच्या आरोपांची चौकशी होण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील कागदपत्रे, कार्यादेश, निधी वितरण, प्रशिक्षणार्थींच्या नोंदी आणि संबंधित आर्थिक व्यवहारांची पडताळणी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.जर शासनाचा निधी खर्च होऊनही युवकांना अपेक्षित प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाल्या नसतील, तर हा विषय केवळ आर्थिक अनियमिततेपुरता मर्यादित राहत नाही, तर तो जिल्ह्यातील बेरोजगार युवकांच्या भवितव्याशी निगडित गंभीर प्रश्न ठरतो. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणातील सत्य जनतेसमोर आणून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावर लाठीमार..!

राळेगावातून तीव्र निषेध, राज्यपालांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

राळेगाव, दि. २२ : दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीटसह विविध स्पर्धा परीक्षांच्या कथित पेपरफुटी प्रकरणी सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला राळेगावातील युवक व नागरिकांनी जाहीर पाठिंबा देत राज्यपालांच्या नावे तहसीलदार मार्फत निवेदन सादर केले.

विद्यार्थ्यांवरील पोलिसांच्या लाठीमाराचा निषेध करत या घटनेची निष्पक्ष चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, सीजेपीचे अभिजित दिपके यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले असून, त्यास सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनीही उपोषणा द्वारे पाठिंबा दिला आहे. आंदोलन कर्त्यांशी संवाद साधण्या ऐवजी २० जुलै रोजी संसदे कडे निघालेल्या विद्यार्थी, पालक व समर्थकांवर करण्यात आलेला कथित लाठीमार हा लोकशाही मूल्यांना काळिमा फासणारा प्रकार असल्याचा आरोप करण्यात आला. सरकारने विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर तातडीने चर्चा करून परीक्षा पद्धतीतील त्रुटी दूर कराव्यात, तसेच पेपरफुटी प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी हमीद पठाण, फिरोज लाखाणी, खुशाल रोहणकर, सुधाकर लोहवे, दिलीप लांभाडे, हनुमान पोटफोडे, गजानन बोभाटे, शेख रऊप, समीर लाखाणी, दिनेश झाडे, अमोल पंडित, अंकित बोटरे यांच्यासह मोठ्या संख्येने युवक व नागरिक उपस्थित होते.

प्रदीप झाडे मित्रपरिवार व माऊली ग्रुपच्या भव्य रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद..!

१७५ रक्तदात्यांचे रक्तदान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

नेर, दि. २२ : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सार्वजनिक जीवनातील उल्लेखनीय कार्याला अभिवादन म्हणून बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी स्वागत मंगल कार्यालय, कारंजा रोड, नेर येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सामाजिक बांधिलकी जपत तब्बल १७५ रक्तदात्यानी रक्तदान करून मानवतेच्या सेवेसाठी मोलाचे योगदान दिले.

प्रदीप झाडे मित्रपरिवार व माऊली ग्रुप, नेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या समाजोपयोगी उपक्रमात युवकासह विविध स्तरांतील नागरिकांनी महिलांनी सर्व समाजाच्या व्यक्तींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" या संदेशाला प्रतिसाद देत अनेकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. शिबिरा दरम्यान रक्तदात्यांचा भेटवस्तू व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होऊन त्यांचे प्राण वाचावेत, या उदात्त हेतूने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या यशस्वी रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी ज्ञानेश्वर मांडूळकर, शशांक चुंभळे, अमोल तंबाखे, घनश्याम वैरागडे, मयूर काळे, अशोक वयले, विक्रम झाडे,निलेश वंजारी आणि प्रशांत भेंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.या शिबिरा मुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास निश्चितच मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

जि.प. पतसंस्थेकडून ६० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव..!

कुस्तीपटू देवयानी मानेच्या सन्मानातून सामाजिक बांधिलकीचा आदर्श

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २२ : यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था (र. नं. १०९) यांच्या वतीने सहकार भवन येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यात इयत्ता १० वी, १२ वी, जेईई, नीट, यूपीएससी तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या सभासदांच्या एकूण ६० गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक बांधिलकी जपत दारव्हा तालुक्यातील जवळा येथील जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थिनी व विभागीय कुस्ती स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती कु. देवयानी वासुदेव माने हिचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे होते. उद्घाटक म्हणून उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रदीप गोडे, तर प्रमुख अतिथी म्हणून डायटचे अधिव्याख्याता पुनीत मातकर आणि संस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. गावंडे यांनी पतसंस्थेचे आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक उत्तरदायित्व जपणारे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. प्रदीप गोडे यांनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि गुणवत्तेच्या बळावर विद्यार्थी जीवनात मोठे यश मिळवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. पुनीत मातकर यांनी गुणपत्रिकेपेक्षा चांगला माणूस घडणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगत, पतसंस्थेच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. या सोहळ्यात १० वीचे ३९, १२ वी, जेईई व नीटमधील १७ तसेच यूपीएससी व क्रीडा क्षेत्रातील ४ अशा एकूण ६० विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव संजय विहाडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रशांत उमरतकर यांनी, तर आभार प्रदर्शन संचालक नदीम पटेल यांनी केले. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, संचालक, पालक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

सायखेडा मध्यम प्रकल्प ९४.४० टक्के भरला..!

नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

पांढरकवडा : केळापूर तालुक्यातील सायखेडा मध्यम प्रकल्प तब्बल ९४.४० टक्के भरल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. जलसंपदा विभागाच्या पाटबंधारे उपविभाग क्र. ५, पांढरकवडा यांनी २२ जुलै २०२६ रोजी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, केळापूर यांना पत्र पाठवून धरणाच्या सद्यस्थितीची माहिती दिली असून, पाणलोट क्षेत्रात आणखी मुसळधार पाऊस झाल्यास धरण लवकरच १०० टक्के भरून अतिरिक्त पाण्याचा विसर्ग करावा लागू शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. जलसंपदा विभागाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, सायखेडा मध्यम प्रकल्प २२ जुलै रोजी सकाळी ६.३० वाजेपर्यंत ९४.४० टक्के भरला होता. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम राहिल्यास प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरून अतिरिक्त पाणी नदीपात्रात सोडावे लागेल. त्यामुळे नदीच्या पाणीपातळीत अचानक वाढ होऊन पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर सायखेडा, लिंगी, मोरवा, पिंपरी, आकोली, पांढरकवडा, केळापूर, तातापूर, झुंजारपूर, डोंकी, सावरखा, बल्लारपूर, वाघा, कवठा, पाटणबोरी आदी नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याबाबतची माहिती कार्यकारी अभियंता, तहसीलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी (नगर परिषद) तसेच संबंधित विभागांना देण्यात आली असून, आवश्यक ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच धरण १०० टक्के भरल्यानंतर होणाऱ्या पाण्याच्या विसर्गाबाबत वेळोवेळी प्रशासनाकडून माहिती दिली जाणार असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

ऐतिहासिक पायी वारी पालखी सोहळ्याची जय्यत तयारी..!

केळापूर तालुका विठ्ठलमय, हजारो वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पांढरकवडा : शनिवार, २५ जुलै रोजी महादेव घाट, पांढरकवडा ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, केळापूर दरम्यान आयोजित ऐतिहासिक पायी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण केळापूर तालुका भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला आहे. वारकरी संप्रदाय व विविध सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून शहरासह ग्रामीण भागात घरोघरी पत्रकांचे वितरण, जनसंपर्क, भजन-दिंडी, संवाद सभा आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात आली. त्यामुळे हजारो वारकरी व भाविकांनी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी उत्साहाने तयारी सुरू केली आहे.पहापळ येथे आयोजित संवाद कार्यक्रमात पालखी सोहळ्याचे धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर गावातून हरिनामाच्या गजरात भव्य दिंडी काढून नागरिकांना सहभागाचे आवाहन करण्यात आले.

या अभियानात वारकरी संप्रदायाचे तालुकाध्यक्ष विष्णू रामगिरवार, मदन जिद्देवार, शंकर बडे, अंकित नैताम, संजय झोटिंग, विलास गोडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात स्वच्छता, सजावट, विद्युत रोषणाई आणि भाविकांसाठी आवश्यक सुविधांची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. आयोजकांनी २५ जुलै रोजी सकाळी ८ वाजता महादेव घाट येथून निघणाऱ्या पालखी सोहळ्यात वारकरी, महिला, युवक, शेतकरी, व्यापारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे.

चार दिवसांतच पुलाला भगदाड..! दिग्रस नगरपरिषदेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह

निकृष्ट दर्जाच्या कामाचा आरोप नागरिकांच्या सुरक्षेशी खेळ, चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ अशोक जाधव

दिग्रस, दि. २२ : दिग्रस नगरपरिषदेच्या विकासकामांच्या गुणवत्तेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शहरातील जुना आयटीआयसमोरील पुलाचे काम अवघ्या चार दिवसांपूर्वी पूर्ण झाल्याचा दावा असतानाच त्या पुलाला मोठे भगदाड पडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

निकृष्ट दर्जाचे काम करून शासकीय निधीची उधळपट्टी होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. घटनास्थळी पुलाच्या मधोमध मोठा खड्डा पडलेला असून सिमेंटचे तुकडे रस्त्यावर विखुरलेले दिसून येत आहेत. पुलाखालील गटार उघडे पडल्याने कचरा व सांडपाणी साचून दुर्गंधी पसरली आहे. परिसरात दुकाने, शाळा आणि मोठी वर्दळ असल्याने विद्यार्थी, पादचारी व दुचाकी स्वारांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.दरम्यान, शहराच्या विकासापेक्षा श्रेयवाद आणि अंतर्गत राजकारणात लोकप्रतिनिधी गुंतल्याची टीका नागरिक करत आहेत. दुसरीकडे अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कामांच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होत असल्याने रस्ते, गटारे आणि इतर मूलभूत सुविधांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असल्याचेही बोलले जात आहे. "चार दिवसांतच पुलाला भगदाड पडत असेल, तर अशा कामांच्या गुणवत्तेची जबाबदारी कोण घेणार?" असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच पुलाची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

पुसद तालुक्यात अवैध धंद्यांचा महापूर

यवतमाळ, दि. २२ : पुसद तालुक्यात मटका, अवैध हातभट्टी आणि विनापरवाना देशी दारूची विक्री मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या अवैध धंद्यांमुळे परिसरातील कोवळी तरुणाई व्यसनाच्या विळख्यात अडकली असून अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. पुसदजवळील सेलू येथील एका बारमधून रोज सकाळी ते उशिरा रात्रीपर्यंत राजरोसपणे बेकायदेशीर दारूविक्री सुरू आहे. या प्रकाराकडे उत्पादन शुल्क विभाग दुर्लक्ष करत असल्याने अधिकाऱ्यांच्या मूक संमतीबाबत नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या वाढत्या अवैध धंद्यांवर तात्काळ कठोर कारवाई न केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

अखेर त्या परिचर पदभरतीला ब्रेक?

(ग्राम पंचायत प्रशासक व सदस्यांनी केली होती अल्प शिक्षित महिलेची निवड)

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. २२ : अल्प शिक्षित महिलेची परिचर पदावर निवड करण्यात आल्याने उपसरपंच व ग्रा. प.सदस्य यांनी ती भरती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केल्याने आरोग्य विभागाने अद्याप अशी कोणतीच भरती प्रक्रिया करण्यात येणार नसल्याचे पत्रक तक्रारदारांना दिल्याने या भरती प्रक्रियेला तूर्तास ब्रेक लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महागाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या हिवरा उपकेंद्रामध्ये अंश कालीन स्त्री परिचर पदाची भरती प्रक्रिया घेण्याचे आदेश जिल्हा आरोग्य विभागाने जारी केले होते.त्यानुसार हिवरा येथील पाच महिलांनी याकरिता अर्ज सादर केले परंतु प्रशासक,ग्रामसेवक व काही सदस्यांनी आपल्या हित संबंध जपत आरोग्य सारख्या गंभीर विषयात अल्प शिक्षीत महिलेची निवड केली. त्यामुळे उपसरपंच शरद कदम व ग्राम पंचायत सदस्य यांनी या भरती प्रक्रियेवर संशय व्यक्त करून ही भरती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे करून दोषींवर कारवाईची मागणी केली होती. त्यांच्या निवेदनाची दखल घेत जिल्हा आरोग्य विभागाने अद्याप पर्यंत अशी कोणतीही परिचर भरती प्रक्रिया करण्यात आली नसल्याचे पत्रक काढल्याने हिवरा येथील स्त्री परिचर भरतीला तुर्तास ब्रेक लागण्याची शक्यता निर्माण झाली असुन जिल्हा प्रशासन यावर काय निर्णय घेणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वर्ध्यातील आदिवासी चिमुरडीच्या हत्येने संताप..!

दोषींना फाशीची शिक्षा द्या – बिरसा ब्रिगेडची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २२ : वर्धा जिल्ह्यातील रोठा येथे १२ वर्षीय आदिवासी अल्पवयीन मुलीवरील कथित लैंगिक अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेचा तीव्र निषेध करत बिरसा ब्रिगेडच्या वतीने मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले.

या प्रकरणाचा निष्पक्ष, पारदर्शक व जलद तपास करून दोषींना कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी, तसेच पीडित कुटुंबाला तातडीची मदत व संरक्षण देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, या घटनेमुळे राज्यातील आदिवासी समाजात भीती, संताप आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे तपासावर कोणताही राजकीय किंवा अन्य प्रकारचा दबाव येऊ न देता वेळबद्ध चौकशी पूर्ण करून न्यायालयात भक्कम दोषारोपपत्र दाखल करावे. तसेच हा खटला जलदगती न्यायालयात चालवून पीडितेला लवकरात लवकर न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय पीडित कुटुंबाला आर्थिक मदत, कायदेशीर सहाय्य, पुनर्वसन व सुरक्षा उपलब्ध करून देण्याबरोबरच राज्यातील आदिवासी आश्रमशाळा, वसतिगृहे आणि दुर्गम भागातील मुलींच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षा आराखडा राबविण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. आदिवासी महिला व मुलींवरील गुन्हे रोखण्यासाठी स्वतंत्र राज्यस्तरीय विशेष यंत्रणा स्थापन करून व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचीही मागणी करण्यात आली. हे निवेदन बिरसा ब्रिगेडच्या वतीने सादर करण्यात आले असून त्यावर पांडुरंग व्यवहारे, ॲड. निलेश राठोड, सुरेश धनवे, नत्थू आढाव, नरेंद्र जाधव, परसराम डवरे, दत्ता खंदारे, बेगाजी भुरके, विठ्ठल बरगे, कांतिलाल राठोड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दिल्लीतील पेपरफुटी विरोधात झरी-जामणीचा आंदोलनाला पाठिंबा..

पारदर्शक परीक्षा व्यवस्था व दोषींवर कठोर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. २२ : देशभर गाजत असलेल्या पेपर फुटीच्या घटना विरोधात आणि शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या दिल्लीतील आंदोलनाला झरी-जामणी तालुक्यातून ठाम पाठिंबा देण्यात .

तालुका पत्रकार संघ, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, महापुरुष जयंती उत्सव कृती समिती तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने राष्ट्रपतींच्या नावे तहसीलदारा मार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात देशातील विविध स्पर्धा व प्रवेश परीक्षा मधील पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होणारे गंभीर परिणाम याबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. प्रामाणिकपणे मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सी करणाऱ्यांना कोणतीही सवलत न देता त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, सुरक्षित आणि तंत्रज्ञानाधारित करण्याबरोबरच पेपरफुटीच्या सर्व प्रकरणांची वेळबद्ध व निष्पक्ष चौकशी करावी, विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन व मानसिक आरोग्य सहाय्य व्यवस्था उभारावी आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा करण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करून प्रभावी धोरण आखावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न हा देशाच्या भविष्याशी निगडित असल्याने शासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन सोनम वांगचुक यांच्या आंदोलनातील मुद्द्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/७९२/२०२६
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक: १७/०७/२०२६

जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार रियाजखॉ मंगलखॉ पठाण रा. उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की. त्यांची मुलगी नामे आशमेरा परविन रियाजखॉ पठान जन्म दि-०२/०२/२०२१ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे

बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ३०.०७.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी, उमरखेड

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

विद्यार्थ्यांवरील लाठीमारीचा माजी आ.विरेंद्र जगताप यांचे नेतृत्वात निषेध

चांदूर रेल्वे येथे काँग्रेसचे धरणे आंदोलन

चांदूर रेल्वे/वार्ताहर

दिल्ली येथे विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस लाठीमारीच्या निषेधार्थ हे आंदोलन आयोजित करण्यात आले. आंदोलनादरम्यान नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांना न्याय द्यावा आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार संपवावा, अशी मागणी करण्यात आली.भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने आज चांदूर रेल्वे येथील उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयासमोर माजी आमदार वीरेंद्र भाऊ जगताप यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले.

काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी जंतर-मंतर येथे उपोषण करत होते. त्यांच्या आंदोलनावर पोलिसांनी कारवाई केल्याचा तसेच त्यांना बळजबरीने हटविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर कथितपणे करण्यात आलेल्या लाठीमाराचा काँग्रेसने तीव्र निषेध व्यक्त केला.आंदोलनकर्त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, तसेच विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस कारवाईबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांनीही जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी केली.

आंदोलनाला चांदूर रेल्वे तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.यावेळी माजी आमदार वीरेंद्र जगताप, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर वाघ, जगदीश आरेकर, राजा राजनेकर, बाळासाहेब ठाकरे, अशोक चौधरी, श्रीनिवास सूर्यवंशी, श्याम पंपालिया, सुनील गावंडे, पंकज शिंदे, नितीन कोपरकार, शिट्टू सूर्यवंशी, प्रफुल कोकाटे, रुपेश पुळके, बाळासाहेब देशमुख, अनिस सौदागर, राजू लांजेवार, कल्पना लाजेवार,कीर्ती इमले, नीलिमा शर्मा, कशिश शर्मा, स्वप्निल मानकर वैभव मालवार, दीपक सोळंके सागर गरुड, भीमराव पवार,प्रतीक भैसे, अनिल वर्गैरे,सुरेश भाऊ जाधव, रशीद भाई,सुनील अग्रवाल प्रदीप मेश्राम,मुन्ना शर्मा,आशिष कडू,वेदांत श्रीखंडे,पंकज मेश्राम, सागर बोंडे,शरद घासले इत्यादी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

संक्षिप्त

'ऑपरेशन कवच' अंतर्गत जनजागृती

नांदगाव खंडेश्वर-अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने नशामुक्त समाज घडवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन कवच' मोहिमेअंतर्गत नांदगाव खंडेश्वर पोलीस स्टेशनच्या वतीने नुकतीच एक भव्य जनजागृती प्रभात फेरी आयोजित करण्यात आली होती. या मोहिमेत शालेय विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून नशामुक्तीचा संदेश दिला.ही प्रभात फेरी स्थानिक बस स्टॅन्डपासून सुरू होऊन पोलीस स्टेशन येथे समारोप झाला. या उपक्रमाला पोलीस अधीक्षक,अमरावती ग्रामीण यांची विशेष उपस्थिती होती त्यामुळे उपस्थितांचे मनोबल वाढवले. या प्रसंगी नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीच्या नगराध्यक्षा प्राप्ती विलास मारोटकर यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक, शांतता समितीचे सदस्य, पोलीस पाटील आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.रॅलीमध्ये शिवाजी विद्यालय आणि विनायक विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता. प्रभात फेरीच्या समारोपानंतर 'एकलव्य गुरुकुल' येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.या मोहिमेमुळे नांदगाव खंडेश्वर परिसरात नशामुक्तीबाबत मोठी जागरूकता निर्माण झाली असून, पोलिसांच्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

प्रविण पेटकर यांची निवड

अमरावती-सामाजिक क्षेत्रात गौरावास्पद काम कार्य करणारे प्रविण दिगंबरराव पेटकर यांची अखिल भारतीय माळी महासंघाच्या विदर्भ प्रदेश प्रमुख पदी नुकतीच निवड करण्यात आली. नाशिक येथे अखिल भारतीय माळी महासंघाच्या २५ वा वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष विलास पाटील, राष्ट्रीय कार्याध्यक्ष शिवदास महाजन, राष्ट्रीय उपाध्यक्ष राजाभाऊ रायकर, विश्वस्त राजाभाऊ काठे, प्रा. रामचंद्र झगडे, राष्ट्रीय अध्यक्ष महिला आघाडी तारका विवरेकर, प्रदेश अध्यक्ष सुभाष सातव, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रतिमा माळी, राष्ट्रीय सचिव राजेंद्र बोराटे, राष्ट्रीय प्रवक्ता कैलाशचंद्र वाघेला, प्रदेश सरचिटणीस राजेंद्र मांदाडे, विदर्भ प्रवक्ते रामभाऊ भेंडारे, प्रदेश कार्याध्यक्ष अमोल गुरनुले, विदर्भ उपाध्यक्ष विठ्ठलराव नागतोडे आदी विचारपीठावर आवर्जून उपस्थित होते.

शैक्षणिक साहित्याचे वाटप

अचलपूर- परतवाडा येथील ट्वीन सिटी हॉस्पिटलचे संचालक सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉक्टर अश्लेष तिवारी यांनी नुकतेच जि.प. उच्च प्राथमिक शाळा, अंबापाटी येथे आदिवासी क्षेत्रातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले.यावेळी मुख्याध्यापक प्रभाकर झोड प्रामुख्याने उपस्थितीत होते.यावेळी डॉ. अश्लेष तिवारी यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की,मेळघाटातील विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी मी स्वतः या क्षेत्रात वैद्यकीय अधिकारी असताना मला माहिती आहे आणि माझे कर्तव्य आहे की समाजातील गरजू मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी तत्पर राहणे हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी सांगितले.तब्बल १६० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करीत असताना भविष्यातही आपण विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे त्यांनी आश्वस्त केले.याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य, गावातील नागरिक व शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय शुक्ल यांनी केले तसेच आभार प्रदर्शन रविकांत पवार यांनी केले

श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात

विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक सुरक्षिततेची जनजागृती

प्रादेशिक परिवहन कार्यालय व शहर वाहतूक पोलिसांचा संयुक्त उपक्रम

अमरावती/का.प्र.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती तथा शहर वाहतूक शाखा पोलिस स्टेशन, गाडगे नगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे 'रस्ता सुरक्षा – जीव सुरक्षा' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करणे, सुरक्षित प्रवासाचे महत्त्व पटवून देणे तसेच भविष्यात जबाबदार नागरिक म्हणून वाहतुकीचे नियम पाळण्याची सवय लावणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रसाद देशमुख होते. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. अशा जनजागृतीपर उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची जाणीव अधिक दृढ होऊन त्याचा सकारात्मक परिणाम समाजावरही होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या प्रतिनिधी ऐश्वर्या बलखंडे यांनी विद्यार्थ्यांना रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्याचे नियम, झेब्रा क्रॉसिंगचा योग्य वापर, वाहतूक सिग्नलचे महत्त्व, रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी, सायकलस्वारांनी पाळावयाचे नियम तसेच वाहतुकीदरम्यान मोबाईलचा वापर टाळण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक विनोदराव धोटे व अनंत लोखंडे यांनी वाहतुकीचे नियम मोडल्यास होणारे दुष्परिणाम, हेल्मेट व सीटबेल्टचा अनिवार्य वापर, वाहन परवाना व आवश्यक कागदपत्रांचे महत्त्व, अल्पवयीनांनी वाहन चालविण्याचे धोके तसेच अपघात घडल्यास नागरिकांनी कोणती जबाबदारी पार पाडावी याबाबत अत्यंत सोप्या भाषेत आणि प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. संपूर्ण मार्गदर्शन सत्र विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व उपयुक्त ठरले असून उपस्थित विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

समारोपप्रसंगी मुख्याध्यापक प्रसाद देशमुख यांनी विद्यार्थ्यांकडून वाहतूक नियमांचे प्रामाणिकपणे पालन करण्याची तसेच स्वतः सुरक्षित राहून इतरांनाही सुरक्षिततेचा संदेश देण्याची प्रतिज्ञा करून घेतली. मान्यवरांचे स्वागत किशोर सोनकुसरे सर व ज्येष्ठ शिक्षिका चौखंडे तर संचालन शारीरिक शिक्षक विस्मय ठाकरे यांनी केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीची जबाबदारी पार पाडणाऱ्या शालेय वाहन चालक संघटनेचे रंगारी, कय्युम खान, नंदू खताळे, धनंजय ढोके, बागल,गौरव लिंघोट, मयूर काळे, चौरसिया,हिवराळे,स्वप्नील धर्माळे, अतुल वाकोडे, काळबांडे व दाभाडे यांचीही विशेष उपस्थिती लाभली. तसेच विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

पियुष गोयल यांच्या राजीनाम्याकरीता महाराष्ट्र राज्य किसान सभेतर्फे आंदोलन

अमरावती/का.प्र.

केंद्रीय वाणिज्य मंत्री नामदार पियुष गोयल यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, या प्रमुख मागणीसाठी संयुक्त किसान मोर्चाचे आवाहनावरून महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी इशारा आंदोलन करण्यात आले.

भारत अमेरिका व्यापार करार हा भारतीय शेतकऱ्यांकरिता कायम नुकसानकारक आहे. अमेरिकन शेतीमालावर आयात शुल्क शून्य करून भारतीय बाजारामध्ये आणल्यास, भारतातील शेतीमाल बाजार कोलमडेल.अमेरिकन कंपनी शेतमालाचा उत्पादन खर्च व कुटुंब निर्वाह करणाऱ्या भारतीय शेतकऱ्याचे शेतीमालाचा उत्पादन खर्च यात मोठी तफावत आहे. भारतीय शेतमालाचा उत्पादन खर्च जास्त आहे आणि म्हणून भारतीय शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून बाजारात भाव पडेल तसेच भारतीय शेतमाल अमेरिकेच्या बाजारात गेला तर त्यांचेवर ५०% पर्यंत आयात शुल्क लागेल. मग अमेरिकेच्या बाजारात भारतीय शेतमाल जाईलच कशाला? तो टिकेल का?असे प्रश्न भारतीय शेतकऱ्याला पडले आहेत. यांचा विरोध देशभर होत असताना,कराराचे संदर्भात पुढे पुढे पावले टाकणे जनमताचा आदर न करणारे आहे. या केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल जबाबदार आहेत.त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा.

भारतीय शेतकऱ्याला अहितकारक ठरलेला भारत अमेरिका व्यापार करार विना विलंब रद्द करावा. सदर करार एकतर्फी असून अमेरिकेसमोर भाजपा सरकार का लोटांगण घालते आहे? हा प्रश्न समग्र जनतेला पडला आहे. सभागृहात, संसदेत,चर्चा न करताच हे सर्व परस्पर चालले आहे, हे वागणे लोकशाही, संविधान तथा संसद विरोधी आहे.दिल्लीच्या सीमांवर तब्बल ३८६ दिवस चाललेल्या शेतकरी आंदोलनाला तीन काळे कृषी कायदे मागे घेण्याची हमी सरकारने दिली होती. सरकारने मागच्या दाराने ते सर्व लागू केले आहेत शेतकऱ्यांची नेमकी मागणी शेतमालाचे आधार भावाचे कायद्याची आहे आणि म्हणून शेतमालाचे आधार भावाचा कायदा सरकारने करावा,आदी मागण्यांचा समावेश होता.

सदर आंदोलनाचे निवेदन प्रधानमंत्री जिल्हाधिकारी अमरावती मार्फत देण्यात आले. प्रतिनिधी मंडळामध्ये अशोक सोनारकर सरचिटणीस महाराष्ट्र राज्य किसान सभा, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे जिल्हा सचिव, अशोक राऊत, किशोर काळे, उमेश बनसोड, संतोष सुरजसे, शेखर बद्रे पवन भाकरे यांचा समावेश होता.

शेतकऱ्यांच्या हितासाठी इथेनॉल धोरणावर तथ्याधारित चर्चा व्हावी-किशोर तिवारी

अमरावती-भाराताच्या इथेनॉल मिश्रण (E-20) कार्यक्रमाविरोधात गेल्या काही दिवसांत सुरू असलेल्या दिशाभूल करणाऱ्या प्रचारामुळे देशातील शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेच्या हिताला धक्का पोहोचत आहे, अशी तीव्र चिंता शेतकरी नेते व कृषी धोरण अभ्यासक किशोर तिवारी यांनी व्यक्त केली.

आपल्या इथेनॉल या विषयावर माध्यमांना दिलेल्या निवेदनात किशोर तिवारी म्हणाले की, इथेनॉलबाबतचा वाद व्यक्ती, उद्योगसमूह किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोपांभोवती फिरू नये. या विषयाचा केंद्रबिंदू शेतकऱ्यांचे उत्पन्न, ग्रामीण रोजगार, अन्नसुरक्षा, पर्यावरण संरक्षण आणि भारताची ऊर्जा स्वावलंबनाची वाटचाल हा असला पाहिजे.भारतात इथेनॉल निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाचे प्रमाण देशाच्या एकूण कृषी उत्पादनाच्या तुलनेत अत्यल्प आहे. त्यामुळे देशातील सर्व कृषी समस्यांचे खापर इथेनॉल कार्यक्रमावर फोडणे हे वस्तुस्थितीला धरून नाही.

जगातील अमेरिका, ब्राझील, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युरोपमधील अनेक देश, पॅराग्वे, बोलिव्हिया आणि झिम्बाब्वेसह अनेक राष्ट्रांनी इथेनॉल मिश्रण स्वीकारले आहे. भारतानेही शेतकरी आणि राष्ट्रहित लक्षात घेऊन या धोरणाला अधिक वैज्ञानिक आणि शाश्वत स्वरूप द्यावे,किशोर तिवारी म्हणाले.किशोर तिवारी यांनी स्पष्ट केले की अन्नसुरक्षा ही कोणत्याही परिस्थितीत सर्वोच्च प्राधान्य राहिली पाहिजे. सार्वजनिक वितरण व्यवस्था, गरिबांसाठीच्या योजना, राखीव साठे आणि राष्ट्रीय गरजा पूर्ण झाल्यानंतरच अतिरिक्त उपलब्ध संसाधनांचा इथेनॉलसाठी वापर व्हावा.

प्राथमिक शिक्षक समिती धामणगाव रेल्वे मध्ये २५शिक्षकांचा जाहीर प्रवेश

अमरावती/का.प्र.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या नेतृत्वावार व कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून धामणगाव रेल्वे तालुक्यातील २५ शिक्षक बंधू भगिनींनी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती मध्ये जाहीर प्रवेश केला.शिक्षक नेते गोकुलदास राऊत,जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार,जिल्हा मार्गदर्शक संभाजी रेवाळे,जिल्हा सरचिटणीस शैलेंद्र स. दहातोंडे, योगीराज मोहोड,तालुकाध्यक्ष, धामणगाव रेल्वे यांच्या उपस्थिती मध्ये जाहीर प्रवेश झाला.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा धामणगाव रेल्वे च्या वतीने सहविचार सभेचे आयोजन तुळजा भवानी माता संस्थांन धामणगाव रेल्वे येथे आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी गोकुलदास राऊत (शिक्षक नेते) तर प्रमुख पाहुणे म्हणून अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष), सदानंद रेवाळे (मार्गदर्शक),शैलेंद्र स. दहातोंडे,(जिल्हा सरचिटणीस) व तुळजाभवानी संस्थेचे अध्यक्ष मानकर उपस्थित होते.या सहविचार सभेमध्ये महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या कार्यपद्धतीवर प्रभावीत होऊन व गोकुलदास राऊत,अजयानंद पवार व योगीराज मोहोड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून धामणगाव रेल्वे तालुक्यामध्ये कार्यरत २५ शिक्षक बंधू भगिनी यांनी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती मध्ये जाहीर प्रवेश घेतला.प्रवेश घेणाऱ्या शिक्षकांमध्ये ज्ञानेश्वर राठोड,नामदेव जाधव,सुनील राठोड,विलास राठोड,सेवादास राठोड,गोपाल राठोड, सचिन चव्हाण,विष्णू राठोड,विजय आडे,निरंजन आडे,शेषराव चव्हाण,विनोद राठोड,सुनील चव्हाण,शक्ती राठोड,विनोद राठोड,नामदेव पवार,देविदास राठोड,सतीश राठोड,अजय जाधव,पांडुरंग राठोड,नामदेव राठोड,नारायण राठोड,गोपाल राठोड,वसंत राठोड,विष्णू जाधवयांचा समावेश आहे.

या सहविचार सभेमध्ये ज्ञानेश्वर राठोड यांची तालुका शाखा धामणगाव रेल्वेच्या तालुका कोषाध्यक्ष पदी तर नामदेव जाधव यांची धामणगाव शाखेच्या उपाध्यक्षपदी तर केशव पोटे यांची जिल्हा प्रतिनिधी पदी एकमताने निवड करण्यात आली. तसेच तुळजा भवानी संस्थांनाचे अध्यक्ष गोविंद मानकर यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छदेवून उत्कृष्ट संस्थान म्हणून सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक योगीराज मोहोड,संचालन विक्रांत टेकाडे व आभार प्रदर्शन तेजस राठोड यांनी केले.यावेळी रामेश्वर गावंडे व ओमप्रकाश धनसकर हे आवुर्जन उपस्थित होते.

अवघ्या दोन वर्षाच्या अविरा मानकरची आंतरराष्ट्रीय झेप

'सुपर टॅलेंटेड किड'किताबाने गौरव:असामान्य बौद्धिक क्षमतेची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

अमरावती/का.प्र.

अमरावतीतील अवघ्या २ वर्षे २ महिन्यांच्या अविरा स्वप्नील मानकर हिने आपल्या विलक्षण बुद्धिमत्ता, उत्कृष्ट स्मरणशक्ती आणि प्रभावी सादरीकरण कौशल्याच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स या प्रतिष्ठित संस्थेने तिच्या उल्लेखनीय गुणवत्तेची दखल घेत 'सुपर टॅलेंटेड कीड' हा मानाचा किताब बहाल केला असून, तिला 'वन इन अ मिलियन' म्हणूनही गौरविण्यात आले आहे. या अभिमानास्पद यशामुळे अमरावतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अविराने आपल्या लहानशा वयात इंग्रजी वर्णमाला, गायत्री मंत्र, शरीराचे विविध अवयव, अनेक प्राण्यांची नावे, १ ते २० पर्यंतची मोजणी, नर्सरी राइम्स, वर्षातील बारा महिने तसेच आठवड्याचे सातही दिवस मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये आत्मविश्वासाने सादर केले. एवढेच नव्हे, तर तिने १० Action Words चेही अचूक आणि प्रभावी सादरीकरण करून परीक्षकांना प्रभावित केले. तिच्या या असामान्य कौशल्याची दखल घेत १९ मे, २०२६ रोजी तिला 'सुपर टॅलेंटेड किड' हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. या यशामागे अविराची आई पूजा मानकर यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, अथक परिश्रम आणि मुलीच्या सर्वांगीण विकासासाठीची निष्ठा हे महत्त्वाचे कारण ठरले आहे. वडील डॉ. स्वप्नील मानकर यांनी मुलांच्या कलागुणांना ओळखून त्यांना तसे घडविण्याचे आवाहन केले आहे. लहान वयापासूनच खेळातून शिक्षण, नियमित सराव, सकारात्मक वातावरण आणि योग्य पद्धतीने ज्ञान देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे अविरामध्ये असलेली उपजत प्रतिभा अधिक उजळून निघाली. अविराच्या या यशामुळे मानकर कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे कौतुक केले जात आहे. इतक्या लहान वयात मिळालेला हा आंतरराष्ट्रीय सन्मान केवळ कुटुंबासाठीच नव्हे, तर अमरावती जिल्ह्यासाठीही अभिमानाची बाब मानली जात आहे. अविरा भविष्यातही आपल्या बुद्धिमत्ता, जिज्ञासा आणि मेहनतीच्या बळावर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अशीच उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्र आणि देशाचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

सुकळी कंपोस्ट डेपो व श्वान दहन केंद्राची आयुक्तांकडून पाहणी

स्वच्छता,कचरा व्यवस्थापन व पर्यावरण संवर्धनावर भर

अमरावती/का.प्र

महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सुकळी येथील कंपोस्ट डेपो तसेच श्वान दहन केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करून तेथील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शिस्तबद्ध व पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने ही पाहणी करण्यात आली.

पाहणीदरम्यान आयुक्तांनी कंपोस्ट डेपोमध्ये दररोज संकलित होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याच्या वर्गीकरणाची प्रक्रिया, सेंद्रिय खत निर्मितीची कार्यपद्धती, कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट, डेपोतील स्वच्छता, यंत्रसामग्रीची स्थिती तसेच मनुष्यबळाच्या कार्यपद्धतीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतली. कंपोस्ट निर्मितीची प्रक्रिया अधिक परिणामकारक होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी बायोमायनिंग तसेच सॅनिटरी लँडफिलसाईट डेव्हलपमेन्ट बाबत माहिती जाणून घेतली. घनकचऱ्यापासून निर्माण होणाऱ्या बायो प्रोडक्ट जसे आरडीएफ खत व इतर वस्तू त्याचे विल्हेवाट लावण्याबाबत चर्चा करण्यात आली.नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घनकचरा व्यवस्थापन ही अत्यंत महत्त्वाची बाब असल्याने कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा होऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले. यानंतर आयुक्तांनी सुकळी येथील श्वान दहन केंद्राची पाहणी करून तेथील सुविधा, स्वच्छता, दहन प्रक्रिया आणि उपलब्ध यंत्रणेची माहिती घेतली. भटक्या व मृत श्वानांची विल्हेवाट वैज्ञानिक आणि पर्यावरणपूरक पद्धतीने लावली जात आहे का,याची त्यांनी खात्री केली. दहन केंद्राचे कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित व नियमानुसार राहावे, यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.यावेळी आयुक्तांनी संपूर्ण परिसराची स्वच्छता, सुरक्षितता आणि देखभाल यावर विशेष भर देत नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित सर्व बाबींमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे सांगितले.

आयुक्तांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी चर्चा करून विविध कामांचा आढावा घेतला आणि प्रलंबित बाबी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, पशुशल्य चिकीत्सक डॉ.तुषार पोहनकर, अभियंता विवेक देशमुख, राजेश आगरकर, अभियंते, कंत्राटदार प्रतिनिधी, श्वान दहन केंद्राशी संबंधित कर्मचारी, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

दिल्लीत जे घडले, ते पाहून मन सुन्न आणि अस्वस्थ झाले. कोण बरोबर आणि कोण चूक, आंदोलन का आणि कोणी घडवून आणले, त्यामागे कोणाचा राजकीय हात आहे की, लाखोंच्या संख्येने तरुणाई स्वतः रस्त्यावर उतरली... यापेक्षा एक मोठा प्रश्न मनात निर्माण झाला आहे; या देशात विद्यार्थ्यांचा आवाज ऐकला जातो की दाबला जातो?

लाठीने गर्दी पांगवता येते; पण विचारांना कधीच हरवता येत नाही!

लोकशाही केवळ निवडणुकांसाठी नसते. ती मतभेद ऐकून घेण्याच्या संस्कृतीवर उभी राहते. विरोध सहन करण्याच्या ताकदीवर उभी राहते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आपल्या तरुण पिढीशी राज्यकर्ते कसे वागतात, यावर तिची खरी परीक्षा होते. विद्यार्थी रस्त्यावर उतरतात, तेव्हा तो केवळ आंदोलनाचा विषय नसतो. तो समाजाच्या मनातील अस्वस्थतेचा आरसा असतो. प्रत्येक विद्यार्थी योग्यच असेल असे नाही; प्रत्येक आंदोलन निरपेक्ष असेल असेही नाही. पण त्यांच्याशी संवाद करण्याऐवजी जर पहिला पर्याय लाठी, अश्रुधूर किंवा दडपशाहीचा असेल, तर तो कोणत्याही लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा आहे. आज दुर्दैवाने आपण अशा काळातून जात आहोत, जिथे प्रत्येक प्रश्नाला राजकीय चष्म्यातून पाहिले जाते. एखादा विद्यार्थी आंदोलन करतो, तर त्याला लगेच कोणत्या पक्षाचा समर्थक ठरवले जाते. एखादा प्रश्न विचारला, तर देशभक्तीची प्रमाणपत्रे मागितली जातात. या वातावरणात सर्वांत मोठे नुकसान कोणाचे होते? देशाच्या भवितव्याचे.

सत्ताधारी असोत किंवा विरोधक; देशाप्रती दोघांचीही जबाबदारी समान आहे. देशातील नागरिकांना अधिक चांगले शिक्षण, सुलभ आरोग्यसेवा, रोजगाराच्या संधी आणि सुरक्षित भविष्य देणे, ही त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. पण आमच्या विवेकावर राजकारण इतके हावी झाले आहे की, देशाचे प्रश्न मागे पडले. आज आपण मतभेदांना संवादातून सोडवण्याऐवजी संघर्षातून सोडवण्याची सवय लावत आहोत. ही कोणत्याही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. अशाने देश विकासाच्या नव्हे; तर विनाशाच्या वाटेवर जाण्याचाच धोका अधिक आहे.

आज संघर्षाची नाही, तर संवादाची गरज आहे. आंदोलन दडपण्याची नाही, तर आंदोलनामागची तरुणाईची वेदना समजून घेण्याची गरज आहे. जय-पराजयाच्या राजकारणाची नाही, तर विश्वासाच्या राजकारणाची गरज आहे.

विद्यार्थी हे कोणत्याही पक्षाचे किंवा कॅडरचे नाही तर; ते भारताचे नागरिक आहेत. त्यांच्या हातात उद्याचा भारत आहे. त्या हातात पुस्तक असावे की लाठीचा अनुभव? त्यांच्या मनात भविष्याची स्वप्ने असावीत की उद्याची भीती? ते निडर, आश्वस्त आणि विचार मांडणारे नागरिक म्हणून घडावेत की, प्रश्न विचारण्याआधीच घाबरणारी पिढी म्हणून ओळखले जावेत? हा निर्णय राज्यकर्त्यांना आणि समाजालाही घ्यावा लागेल. यावर आपल्यालाच सामंजस्याने उपाय शोधावा लागणार आहे. कारण राजकारणात, समाजकारणात किंवा कुटुंबात अहंकार वाढला की अधोगतीची प्रक्रिया सुरू होते. इतिहास साक्षी आहे की, लोकांच्या प्रचंड पाठिंब्यावर उभ्या राहिलेल्या अनेक सत्ताही संवादाचा मार्ग सोडून दडपशाहीचा मार्ग स्वीकारल्यानंतर टिकू शकल्या नाहीत. म्हणूनच इतिहासाकडून शिकण्याची ही वेळ आहे; त्याची पुनरावृत्ती करण्याची नाही.

जगात सर्वाधिक युवक लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर नियमित संवाद यंत्रणा उभी राहिली पाहिजे. शिक्षणाशी संबंधित धोरणांवर विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि तज्ज्ञ यांचा सहभाग अनिवार्य केला पाहिजे. शांततापूर्ण आंदोलनांवर बळाचा वापर हा शेवटचा पर्याय असावा; पहिला पर्याय नेहमी संवाद असला पाहिजे. विद्यापीठांना राजकीय संघर्षाचे रणांगण न बनवता, विचारस्वातंत्र्य आणि चर्चेची केंद्रे म्हणून बळकट केले पाहिजे. शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार आणि मानसिक आरोग्य या प्रश्नांना राजकीय घोषणांपलीकडे नेऊन राष्ट्रीय प्राधान्य दिले पाहिजे. हे केवळ माझे मत नाही; देशातील असंख्य पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचीही हीच अपेक्षा आहे. प्रश्न एवढाच आहे; धोरणकर्ते हा आवाज कधी ऐकतील?

लोकशाहीची खरी ताकद विरोधकांना कायम नामोहरम करण्यात नसते. तशीच ती चोवीस बाय सेवन राजकारण करण्यात आणि प्रत्येक दिवशी इलेक्शन मोडमध्येही नसते. तर ही ताकद असहमतीलाही सन्मानाने ऐकून घेण्यात असते. तरुणांना हा देश, हे सरकार तुमच्या सोबत आहे, हा विश्वास देण्यात असते, हे राज्यकर्त्यांना वेळीच कळणे गरजेचे आहे. आज दिल्लीत घडलेले आंदोलन उद्या विसरले जाईल. परवा आणखी एखादे आंदोलन उभे राहील. पण जर प्रत्येक वेळी आपण संवादाऐवजी दडपशाही, संवेदनशीलतेऐवजी अहंकार आणि लोकशाहीऐवजी राजकीय मार्ग निवडत राहिलो, तर इतिहास आपल्या विकासाची नव्हे, तर आपल्यातील माणुसकी, संवेदनशीलता आणि विवेक हरवल्याची नोंद घेईल. उद्या, सत्ताधारी बदलतील, विरोधक बदलतील; पण देशाचे भविष्य बदलू नये, याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. कारण, लाठीने गर्दी पांगवता येते; पण विचारांना कधीच हरवता येत नाही!

नितीन पखाले

दडपशाही की, हुकुमशाही?

केंद्रात आणि अनेक राज्यांत एकपक्षीय आणि त्यांच्या साथी सहकारी पक्षांची सरकारे निवडून देण्यामागे सर्वच राज्यांतील नागरिक आणि त्यांच्या संघटना, त्यांच्या विद्यार्थी संघटना पालक संघटना यांचा उस्फूर्त सहभाग होता. या सर्व जनतेने विद्यमान सरकार हे आपले सरकार म्हणून निवडून दिले होते. त्यामुळे बहुमतातील सरकार आपल्या सुखसो यींसाठी दिलेल्या वचनां नुसार स्वतःच्या काम गिरीला सुरुवात करील अशा अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या, परंतु सत्ता हाती आल्यावर सत्ताधाऱ्यांनी देशातील नागरिकांविरोधात फारच शीघ्र गतीने त्या सर्वच नागरिकांविरोधात जाचक कारवाया किंवा आपल्या सत्तेचा गैरफायदा घेण्यास सुरुवात केली आहे. ती सारी नागरिकांविरोधात दडपशाही करणारी व जाचक आहेत हे पटल्याने नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी सरकारच्या निर्णयाविरोधात निषेध करण्यास मोर्चे काढले. राजधानी दिल्लीतील आक्रोश, आंदोलने हे त्याचेच पडसाद आहेत.

विद्यार्थी संघटना आणि विद्यार्थी यांच्या मागण्या अशा आहेत.नीट परीक्षेतील घोटाळा, पेपर लीक प्रकरण, इतर स्पर्धा परीक्षांतील गैरप्रकारांची चौकशी निश्चित करून जबाबदारी निश्चित केली जावी.परीक्षांतील गैरप्रकारांमुळे मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. देशातील वाढती बेरोजगारी, सरकारी भरती परीक्षांच्या निकालांना होणारा विलंब असा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी चाललेला खेळ यावर उत्तर द्यावे या प्रमुख मागण्या विद्यार्थी आणि त्यांचे नेते करीत आहेत. कदाचित विद्यार्थी संघटना आणि विद्यार्थी यांच्या मागण्या सरकारला मंजूर नसाव्यात आणि त्या मागण्यांची अंमलबजावणी केली जाईल यांचा विचार केला जाईल यांसंबंधी निर्णय बहुदा विद्यार्थी आणि त्यांच्या संघटनांच्या विरोधात असाव्यात. देशभरातील अनेक नेते, विद्यार्थी, त्यांच्या संघटना यांच्या मागण्या काय आहेत यावर त्यांच्या नेत्यांशी चर्चा करण्याच्या निमित्ताने जाणून घ्याव्यात कारण ते सारे भारतीय नागरिक आहेत त्यांना मते व्यक्त करण्याचा जसा अधिकार आहे तसाच त्या मतांवर देशाच्या कारभाऱ्यांकडून सुयोग्य निर्णय घेतला जावा अशा अपेक्षा असतात. त्यांवर आपले मत व्यक्त करावे हा सर्वमान्य तोडगा होता, परंतु त्याबाबतही निर्णय घेतला गेला नाही याला जनमानसाने दडपशाहीचा प्रकार आहे असे

एनर्जी ड्रिंक्स खरेच एनर्जी देतात?

एनर्जी ड्रिंक्स तात्पुरती सतर्कता वाढवत असली तरी त्यांतील कॅफीन, साखर आणि इतर घटकांचा अतिरेक हृदय, मेंदू, झोप आणि एकूण आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकतो.



रात्रीचे दोन वाजले आहेत. परीक्षा अवघ्या काही तासांवर आली आहे. जागे राहण्यासाठी एक विद्यार्थी एनर्जी ड्रिंकचा कॅन उघडतो. जिममध्ये जाणारा तरुण व्यायामापूर्वी ते पितो, तर दिवसभराचे काम पूर्ण करण्यासाठी एखादा व्यावसायिक क्विक-कॉमर्स ॲपवरून एनर्जी ड्रिंक मागवतो. हल्ली थकवा घालवण्याचा हा एक झटपट उपाय बनला आहे. २०२६ मध्ये भारतातील एनर्जी ड्रिंकचा बाजार सुमारे ८२ कोटी अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे. यावरून तरुणांमध्ये या पेयांचे वाढते आकर्षण दिसून येते.

एनर्जी ड्रिंक्सची सुरुवात लाइफस्टाइल उत्पादन म्हणून झाली नव्हती. १९६२ मध्ये जपानमध्ये थकवा कमी करण्यासाठी अशा प्रकारचे पेय प्रथम तयार करण्यात आले. आज मात्र खेळ, गेमिंग, अभ्यास, रात्रीच्या पाळ्या आणि व्यग्र जीवनशैलीशी त्यांची सांगड घातली जाते. या पेयांचा संदेश स्पष्ट असतो, एक कॅन प्यायल्यावर तुम्ही अधिक ताजेतवाने आणि सक्रिय वाटू शकता. मात्र काही वेळ ताजेतवाने वाटणे म्हणजे शरीराला खरी ऊर्जा मिळणे नव्हे.

बहुतेक एनर्जी ड्रिंक्समध्ये कॅफीन, साखर, टॉरीन आणि ग्वाराना हे घटक असतात. यामधील कॅफीन हा मुख्य उत्तेजक घटक असून तो काही काळासाठी झोप किंवा थकव्याची भावना कमी करून सतर्कता वाढवतो. साखरेमुळे झटपट ऊर्जा मिळाल्यासारखे वाटते, पण ती लवकरच कमी होते. टॉरीन हा शरीरात नैसर्गिकरीत्या आढळणारा घटक असला तरी तो काही ऊर्जा वाढवणारा जादुई पदार्थ नाही. ग्वारानामध्येही कॅफीन असते, त्यामुळे एकूण कॅफीनचे प्रमाण लोकांच्या अपेक्षेपेक्षा जास्त असू शकते.

पूर्वी भारतात एनर्जी ड्रिंक्सचा वापर मुख्यतः ट्रकचालक, खेळाडू आणि जिममध्ये जाणारे लोक करत असत. आता मात्र त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. किशोरवयीन मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी, गेमर्स, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, नोकरदार आणि पार्टीला जाणारे लोकही नियमितपणे हे पेय घेतात. कमी किंमत, घरपोच सेवा, सोशल मीडियावरील प्रचार आणि आकर्षक जाहिराती यामुळे त्यांचा वापर शहरांबरोबरच लहान शहरांमध्येही वाढला आहे.

एकच एनर्जी ड्रिंक पिणे ही नेहमीच मोठी समस्या नसते. खरा धोका असतो दिवसभरात वेगवेगळ्या स्रोतांतून कॅफीनचे जास्त प्रमाणात शरीरात जाण्यात. एखादी व्यक्ती सकाळी चहा घेते, नंतर ऑफिसमध्ये कॉफी पिते, व्यायामापूर्वी प्री-वर्कआउट सप्लीमेंट घेते आणि रात्री एनर्जी ड्रिंकही पिते. बहुतांश लोक दिवसभरात किती कॅफीन घेतले याचा हिशोब ठेवत नाहीत, पण शरीरावर चहा, कॉफी, सप्लिमेंट्स किंवा एनर्जी ड्रिंक – कॅफीनचा स्रोत कोणताही असला तरी त्याचा एकत्रित परिणाम होतो.

एनर्जी ड्रिंक्समध्ये मद्य मिसळून पिण्याची सवयही अतिशय धोकादायक आहे. कॅफीनमुळे मद्यपानानंतर येणारी झोप काही प्रमाणात कमी वाटू शकते; पण त्यामुळे रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण कमी होत नाही. त्यामुळे व्यक्तीला आपण पूर्णपणे शुद्धीत आहोत असे वाटू शकते; परंतु निर्णयक्षमता, शरीराचा तोल आणि प्रतिक्रिया देण्याची क्षमता यावर मद्याचा परिणाम कायम राहतो. परिणामी अधिक मद्यपान, धोकादायक वर्तन, शरीरातील पाण्याची कमतरता, रक्तदाब वाढणे आणि हृदयाचे ठोके अनियमित होण्याचा धोका वाढतो. सध्या भारतात 'एनर्जी ड्रिंक'साठी स्वतंत्र नियामक मानक नाही. कॅफीनयुक्त पेयांसाठी काही मर्यादा असल्या तरी लेबलिंग आणि जाहिरातींबाबत अजूनही चिंता आहे. 'ऊर्जा वाढवते' अशा दाव्यांवरही नियामकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. अशा दाव्यांमुळे लोकांना हे पेय अशक्तपणा किंवा थकवा दूर करणारे उपाय वाटू शकतात. प्रत्यक्षात थकवा हा झोपेचा अभाव, शरीरातील पाण्याची कमतरता, ताण, रक्ताल्पता किंवा इतर आजारांमुळेही असू शकतो.

अधिक प्रमाणातील कॅफीनचा हृदय आणि मेंदूवर विपरीत परिणाम होऊ शकतो. हृदयाचे ठोके वेगाने पडणे किंवा अनियमित होणे, छातीत अस्वस्थता, हात थरथरणे, घाम येणे, मळमळ, चक्कर येणे किंवा रक्तदाब वाढणे अशी लक्षणे दिसू शकतात. वेळेत उपचार न मिळाल्यास ही लक्षणे गंभीर होऊ शकतात आणि काही वेळा जीवघेणीही ठरू शकतात.

कॅफीनमुळे झोपेचा दर्जाही खालावतो. झोप कमी आणि नीट न झाल्याने दुसऱ्या दिवशी अधिक थकवा जाणवतो आणि पुन्हा एनर्जी ड्रिंक घेण्याची इच्छा होते. अशा प्रकारे एक दुष्टचक्र सुरू होते. झोपेच्या कमतरतेमुळे आलेला थकवा काही काळासाठी कॅफीन कमी करते, पण नंतर पुन्हा थकवा जाणवतो. हळूहळू शरीराला नेहमीसारखे काम करण्यासाठीही कॅफीनची गरज भासू लागते. नेहमीचे पेय मिळाले नाही तर डोकेदुखी, चिडचिड आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण जाणवू शकते. फार मोठ्या प्रमाणात कॅफीन घेतल्यास क्वचित प्रसंगी फिट्स येणे किंवा हृदयाच्या ठोक्यांमध्ये गंभीर बिघाड होऊ शकतो.

लहान मुले आणि किशोरवयीन मुलांनी एनर्जी ड्रिंक्स टाळावीत. आधीच कमी झोप घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ही पेये समस्या अधिक वाढवू शकतात. उच्च रक्तदाब, चिंता, हृदयविकार, हृदयाचे अनियमित ठोके किंवा कुटुंबात अचानक हृदयविकाराचा इतिहास असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या महिलांनीही यांचा नियमित वापर टाळावा.निरोगी प्रौढांमध्ये अधूनमधून एनर्जी ड्रिंक घेणे रोजच्या सवयीइतके धोकादायक नसले तरी दिवसभरातील सर्व कॅफीनचा विचार करणे आवश्यक आहे. चहा, कॉफी, कोला, चॉकलेट, सप्लिमेंट्स आणि एनर्जी ड्रिंक्समधून मिळणारे कॅफीन एकत्र मोजले पाहिजे. कमी प्रमाणातील सर्व्हिंग निवडणे, लेबल वाचणे आणि एका दिवसात अनेक कॅफीनयुक्त पदार्थ टाळणे हे सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे आहे. एनर्जी ड्रिंक्स हे पाणी, अन्न किंवा झोपेचा पर्याय कधीच ठरू शकत नाहीत आणि त्यांचे मद्यासोबत सेवनही करू नये.

छातीत दुखणे, बेशुद्ध पडणे, हृदयाची तीव्र धडधड, गोंधळल्यासारखे वाटणे किंवा फिट्स येणे अशी लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत. ऊर्जा मिळवण्यासाठी घरगुती आणि अधिक आरोग्यदायी पर्याय उपलब्ध आहेत. लिंबूपाणी आणि नारळपाणी शरीराला पुरेसे पाणी व क्षार देतात. ताक हलके असून पचनासाठीही चांगले असते. आलं, लिंबू आणि मध घातलेला चहा सौम्य स्वरूपात ताजेतवाने वाटण्यास मदत करतो. बीटरूट-आवळ्याचा रस, खजूर आणि सुका मेवा यांमुळे अधिक टिकणारी ऊर्जा मिळू शकते.

खरी ऊर्जा ही पुरेशी झोप, संतुलित आहार, पुरेसे पाणी आणि नियमित हालचाल यांमधून मिळते. एनर्जी ड्रिंक काही काळासाठी थकवा दडपून टाकू शकते, पण शरीराला आवश्यक असलेली विश्रांती त्याने भरून निघत नाही. त्यामुळे थकवा का जाणवतो, हे समजून घेणे आणि त्यावर झोप, योग्य आहार व पुरेसे पाणी या माध्यमातून उपाय करणे हेच दीर्घकालीन आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे.

डॉ. प्रीतम गायकवाड

सांठविला हरि, जिने हृदयमंदिरी..

पांडुरंगाच्या चरणाशी येणाऱ्या भक्तांची धूळ आपल्या अंगाला लावावी म्हणून, पंढरपुराच्या महाद्वारी 'पायरीचा दगड' होण्याची इच्छा व्यक्त करणारे, संतश्रेष्ठ नामदेव महाराज हे वारकरी संत परंपरेतील महान संत होय.वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वरांनी रचला, तर त्याचा विस्तार नामदेवांनी केला. आजच्या काळात जिथे आपण प्रांत, सीमा आणि भाषा संघर्षात अडकलो आहोत, तिथे सातशे वर्षांपूर्वी संत नामदेवांनी महाराष्ट्र आणि पंजाबला एकाच भक्तीसूत्रात बांधले. ज्ञानेश्वरांनी दिलेला अद्वैत तत्वज्ञानाचा प्रसार कीर्तनाच्या माध्यमातून, सर्वसामान्यांपर्यंत आणि संपूर्ण भारतभर पसरविण्याचे करण्याचे श्रेय नामदेवांना जाते. संत नामदेवांच्या तत्वज्ञानाचा गाभा 'सर्वाभूती दया' होता. नामदेवांच्या कुटुंबात एकंदरीत चौदा जणांचे होते. या कुटुंबात नामायाची दासी म्हणून घेणारी मोठी विठ्ठलभक्त होऊन गेली. ती म्हणजे जनाबाई होय. नामदेवाच्या सहवासात जनाबाईंनी विठ्ठल भक्तीचा ध्यास घेतला. जनाबाईंनी आपले गुरु नामदेवांना मानले. ज्या नामदेवांनी भक्तीची पताका खांद्यावर घेऊन, संपूर्ण देश पादाक्रांत केला. त्याच,नामदेवांच्या पावलावर पाऊल ठेवून जनाबाई आपल्या गुरुची सावली बनून राहिली .संपूर्ण आयुष्यभर पंढरपुरात नामदेवांच्या घरी दासी म्हणून राहिली. तिथे नामदेवाच्या घरी काबाडकष्ट केले. या कामात प्रत्यक्ष पांडुरंग परमात्म्याने मदत केली. दळण, कांडण, गोवऱ्या थापणे, पाणी भरणे, धुणी- भांडी करणे. आदी कामे जनाबाई मोठ्या निष्ठेने करायची. हे सर्व करताना तिला विठ्ठल नामाचा व्यासंग जडला होता.

संत नामदेवांच्या भले मोठे कुटुंब त्या कुटुंबातील सर्व लोकांची सेवा करायची. नामदेवांच्या घरचे दळण दळताना जात्यातून जसे पीठ पडते. तसे विठ्ठलाच्या नामस्मरणात, भक्तीतून ओव्या ओसांडून वाहत असत.त्यांनी रचलेल्या जात्यावरील ओव्या संत साहित्यात अजरामर आहेत.

'सुंदर माझे जाते गे फिरे बहुतिकें।
ओव्या गाऊ कौतुके
तू ये रे बा विठ्ठला।।
जीव शिव दोन्ही खुंटे
हे प्रपंचाचे नेटे गो।।
लावूनी पाची बोटे
गे तू येरे बा विठला।। '

प्रस्तुत ओवीतील गोडवा व भावार्थ मोठा भावनिक आहे. माझे जाते फिरते आहे. पाची बोटे लावून म्हणजे पूर्णपणे तू मदत करायला ये! असे त्या म्हणतात. जात्याला जसे दोन खुंटे आहेत आणि प्रपंचातील नेटाने ते फिरते आहे. जसे दळण दळताना गृहिणी त्याकाळी ओव्या म्हणायच्या.तशा ओव्या जनाबाईंनी दळण्यासारख्या दैनंदिन काम करतानी म्हटल्या. भगवंताचे नामस्मरण करण्यासाठी वेगळा वेळ काढावा लागत नाही हे जनाबाईच्या आचरणातून कळते. समर्पित विठ्ठलाप्रति प्रेमभाव व नामस्मरणाच्या बळावर तिच्या आयुष्याचे सोने झाले.तिच्या कामात प्रत्यक्ष पांडुरंग परमात्म्याने सहाय्य करतो.

जनाबाई ची भक्ती एवढी श्रेष्ठत्वाला पोचली की, ती अधिकाराने विठ्ठलाशी भांडण सुद्धा करते. तर कधी जाब सुद्धा विचारते.

'धरीला पंढरीचा चोर।
गळा बांधुनिया दोर।।
हृदय बंदीखाना केला।
आत विठ्ठल कोंडीला।।
शब्द केले जडाजुडी।
विठ्ठलपायी घातली बेडी।।
सोहम शब्दाचा मारा केला।
विठ्ठल काकुलती आला।।
जनी म्हणे बा विठ्ठला।
जीवे न सोडी मी तुला।।

जनाबाई ची भक्ती ही वात्सल्य व हक्काची आहे. प्रस्तुत अभंगातून, तिने विठ्ठलाला चोर म्हणून भक्तीच्या दोराने बांधून ठेवले आहे.हे सुंदर व कौतुकास्पद रूपक वापरले आहे .विठ्ठल हा भक्ताची मने चोरतो. त्याला 'मी' माझ्या भक्तीच्या दोराने गळ्यात घट्ट पकडून बांधून ठेवले आहे आणि तावडीतून सुटू नये म्हणून, हृदयाच्या कप्प्यात कोंडून ठेवले आहे.आता 'तो' माझ्या मनातून कुठेही जाऊ शकत नाही.कारण त्याच्या पायात शब्दांची बेडी घातली आहे. एवढे असूनही, विठ्ठल सुटण्याचा प्रयत्न करू लागले तेव्हा, सोहम (मीच ब्रह्म आहे नव्हे, तर 'तू' आणि 'मी' एकच आहे.या अद्वैत विचारांचा मारा केला आहे. अशा आत्मज्ञानाच्या माऱ्यामुळे विठ्ठल गयावया करू लागला आणि शरण गेला.

शेवटी जनाबाई हक्काने विठ्ठलाला बजावून सांगते. हे बा विठ्ठला, तू माझ्यात पूर्णपणे अडकलेला आहे. माझ्या जीवाची तुला शपथ कधीच माझ्या हृदयातून तुला सोडून देणार नाही. स्वतःचे हृदय भगवंताला अर्पण करून त्याला कायमस्वरूपी आपल्याजवळ ठेवण्याची ओढ जनाबाईच्या भक्तीत दिसून येते. एवढा अधिकार पंढरीचे सावळे परब्रम्ह भक्तांना देतात.

शशिकांत तोटे दारव्हा,
जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

■ गुरुवार, २३ जुलै २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

दोन महिन्यांतच उखडला चान्नी–सुकळी फाटा मार्ग; डागडुजीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

मे महिन्यात लाखो रुपये खर्चून दुरुस्ती; पावसाळ्याच्या सुरुवातीलाच पुन्हा खड्ड्यांचे साम्राज्य

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चान्नी–सुकळी फाटा या महत्त्वाच्या मार्गावर मे महिन्यात करण्यात आलेली डागडुजी अवघ्या दोन महिन्यांतच उखडल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने रस्ता पुन्हा पूर्ववत खराब अवस्थेत पोहोचला असून, डागडुजीसाठी करण्यात आलेला लाखो रुपयांचा खर्च वाया गेल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

चान्नी, सुकळी, खेट्रीसह परिसरातील अनेक गावांना जोडणारा हा प्रमुख दळणवळणाचा मार्ग आहे. दररोज शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच दुचाकी व चारचाकी वाहनधारक मोठ्या संख्येने या मार्गाचा वापर करतात. मात्र सध्या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही. परिणामी वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच अपघाताची शक्यता वाढली आहे. स्थानिक नागरिकांनी रस्त्याच्या डागडुजीच्या गुणवत्तेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे अथवा कामात निष्काळजीपणा झाल्यामुळेच रस्ता एवढ्या कमी कालावधीत उखडल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. संबंधित विभागाने या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि दर्जेदार पद्धतीने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

अधिकाऱ्यांच्या देखरेखीवरही प्रश्न

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, डागडुजीचे काम सुरू असताना संबंधित अभियंता किंवा विभागीय अधिकारी प्रत्यक्ष ठिकाणी फारसे फिरकले नाहीत. त्यामुळे ठेकेदाराने केवळ सुपरवायझरच्या देखरेखीखाली थातूरमातूर काम केल्याचा आरोप होत आहे. अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमतामुळे कामाच्या दर्जाकडे दुर्लक्ष झाल्याची चर्चा असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

रोजगार मेळाव्यातुन निवड झालेल्या ६६ उमेदवारांना ऑफर लेटरचे वितरण

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समिती मार्फत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अकोला यांच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना ऑफर लेटर वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

अकोला जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समितीमार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त

महिला व बाल विकास भवन, अकोला येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य रोजगार मेळावा समन्वय

समितीचे अध्यक्ष डॉ. रणजित पाटील होते. कार्यक्रमाचे उद्घाटक अनंत केदारे, अकोला जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समिती यांच्या हस्ते झाले. यावेळी समिती सदस्य महेन्द्र कवीश्वर, सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके, नागेश देशपांडे, कौशल्य विकास अधिकारी, श्रीमती पूनम रजाने, कौशल्य विकास अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल्ल शेळके सहाय्यक आयुक्त, संचालन श्रीमती सोनाली भोगे तर आभार प्रदर्शन श्री.प्रविण बांबोळे कनिष्ठ कौशल्य विकास अधिकारी,यांनी केले. या प्रसंगी विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झालेल्या ६६ उमेदवारांना ऑफर लेटरचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी युवक-युवतींना रोजगाराच्या संधींचा लाभ घेऊन कौशल्य विकासाच्या माध्यमातून स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, रोजगार मेळावा समन्वय समितीचे पदाधिकारी, उमेदवार व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मत्स्यव्यवसायासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

मच्छीमार आणि मत्स्यशेतकऱ्यांना खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड (खण) सुविधा सुरू करण्यात आली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी तात्काळ अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, अकोला यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत मत्स्यशेती, कोळंबीशेती आणि मासेमारीसाठी अल्प मुदतीचे कर्ज उपलब्ध होणार आहे.

भूजल मत्स्यव्यवसाय करणारे मच्छीमार, मत्स्यशेतकरी (वैयक्तिक, गट/भागीदारी, शेअरक्रॉपिंग, टेनंट फार्मर्स), स्वयंसहायता गट, संयुक्त दायित्व गट व महिला गट पात्र आहेत.

गजर विठूचा सोहळा आषाढीचा' संगितमय नाम संकीर्तन सोहळा

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रत्येक वारकऱ्याचे,विठ्ठल भक्तांचे ध्येय असते की, आषाढीला पंढरपूरलाच असावे; परंतु प्रापंचिक अडचणीमुळे प्रत्येकजन पंढरीमध्ये पोहचू शकत नाही तरी या सर्वांसाठी आनंदाची बातमी म्हणजे या वर्षी पासून विठ्ठल परिवार अकोला व्दारे आषाढी एकादशीचा खास उत्सव सोहळा साजरा केला जाणार आहे तो म्हणजे ''गजर विठूचा सोहळा आषाढीचा'' या

श्री विठ्ठल नामजप नामसंकीर्तन उत्सवाचे आयोजन केले गेले आहे, सर्वांनी अवश्य सम्मीलीत व्हावे प्रत्येक विठ्ठल भक्ताने सहभागी व्हावे ईतका भावपूर्ण हा सोहळा असतो. या प्रसंगी नाम महात्म्य, विठ्ठल प्रागट्य (झांकी सह) आणि श्री विठ्ठल नामाचा संगीतमय नामजप होईल तर चला. श्री विठ्ठल परिवाराचे अखंड नाम साधक, सदस्य व अकोला येथील सर्व समस्त विठ्ठल भक्तांसमवेत आषाढीच्या संध्याकाळी विठ्ठल नामामध्ये रंगुन जाऊ. हा नामसंकीर्तन सोहळा हभप संतोष महाराज पिसे यांच्या पावन वाणीतून श्रवणाचा लाभ मिळणार आहे.

जाहीर नोटीस

वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११२५/२०२६ प्रोसेस नं.९११३१/२०२६
चौ.ता. २५/०८/२०२६ दिनांक : १८/०७/२०२६

अर्जदार : १. श्रीमती विमल त्र्यंबकराव जोध २. सिमा अरविंद जोध ३. समर्थ अरविंद जोध सर्व रा. मुकुंद नगर, सुधिक कॉलनी, गजानन महाराज मंदिरा जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : अरविंद त्र्यंबकराव जोध
पत्ता :- रा. मुकुंद नगर, सुधिक कॉलनी, गजानन महाराज मंदिरा जवळ,अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरविंद त्र्यंबकराव जोध यांचे दि. १५/०५/२०२६ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

ऊर्जा क्षेत्रातील योगदानाबद्दल महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांचा विशेष गौरव

■ प्रतिनिधी | अकोला ■

नवीकरणीय ऊर्जेचा स्वीकार, ऊर्जा कार्यक्षमता आणि दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी वीज वितरण क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्वाबद्दल मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा बुधवारी (दि. २२) विशेष गौरव करण्यात आला.

नवी दिल्ली येथे आयोजित 'टाइम्स नेटवर्क सस्टेनेबिलिटी कॉन्क्लेव्ह' (Times Network Sustainability Conclave) 'भारत २०३५: एक आत्मनिर्भर राष्ट्र' या संकल्पनेवर आधारित या कॉन्क्लेव्हमध्ये २०३५ पर्यंत भारत हरित बांधिलकी आणि शाश्वत ऊर्जेच्या बळावर आत्मनिर्भर कसा बनू शकतो यावर विचारमंथन करण्यात आले. या परिषेदत ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांची विशेष मुलाखत घेण्यात आली.

महाराष्ट्राला स्वच्छ आणि हरित ऊर्जेकडे नेण्यासाठी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस

यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजना व प्रकल्प राबवले जात आहेत. हरित ऊर्जा परिवर्तनातून सर्वांना स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासह वीज क्षेत्रातील आमुलाग्र सुधारणांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी वेग दिला आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी ऊर्जा परिवर्तनासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. तर या आराखड्याच्या अंमलबजावणीला मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सक्रीय वेग दिला आहे.महाराष्ट्राच्या वीज नियोजनात २०३० पर्यंत आणखी ४५ हजार मेगावॉट विजेची क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ३८ हजार मेगावॉट वीज ही हरित स्रोतांकडून मिळवून एकूण ऊर्जेतील नवीकरणीय ऊर्जेचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे ध्येय आहे. त्यास अनुसरून महावितरणने स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासाठी अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य देत आतापर्यंत केलेल्या एकूण वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के हरित ऊर्जेचा समावेश केला आहे. यासोबतच सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांतून १६ हजार मेगावॉट क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सध्या ५ हजार ५०० मेगावॉटपेक्षा अधिक क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्याद्वारे राज्यातील १५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सध्या दिवसा वीज पुरवठा मिळत आहे. तसेच 'मागेल त्याला सौर कृषिपंप योजने'तून १० लाखांपेक्षा अधिक 'ऑफ-ग्रिड' सौर कृषी पंप कार्यान्वित करण्यात आले आहे.

कालवाडीत मोफत नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

७६ रुग्णांची तपासणी; २२ जणांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड

■ प्रतिनिधी | अकोट ■

श्री संत वासुदेव महाराज तथा श्री संत हरिराम बाप्पा यांच्या जयंतीनिमित्त श्री हरिराम बाप्पा सत्संग सेवा समितीच्या वतीने अकोट तालुक्यातील कालवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात ७६ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी २२ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली आहे.

निवड झालेल्या रुग्णांवर शासकीय जिल्हा रुग्णालय, अकोला येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिबिरात नेत्रतज्ज्ञ डॉ. सचिन राठोड, डॉ. निखिल दराडे आणि डॉ. वरद नंदनवार यांनी रुग्णांची सखोल तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. यापूर्वीही श्री हरिराम बाप्पा सत्संग सेवा समितीच्या माध्यमातून १२१ नेत्ररुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच अकोल्याचे हरिष शहा (लेबन कंपनी) यांनी शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना मोफत औषधांचा पुरवठा केल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी सेवा समितीचे अध्यक्ष सुरेशभाई शेदानी यांनी मार्गदर्शन करताना डोळ्यांचे आरोग्य जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. 'दृष्टी असेल तरच सुंदर सृष्टीचा आनंद घेता येतो. त्यामुळे प्रत्येकाने वेळोवेळी नेत्र तपासणी करून डोळ्यांची योग्य काळजी घ्यावी,' असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकिशोर हिंगणकर यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत प्रा. गजानन हिंगणकर, प्रमोद हिंगणकर, भीमराव नेव्हरकर, गणेशराव हिंगणकर, वसंत मोहोड आणि गोपाळ श्रीकृष्ण हिंगणकर यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सेवा समितीचे सचिव बाबाभाई शेजपाल, किर्ती ठक्कर पहेलवान तसेच युवक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११२२/२०२६ प्रोसेस नं.९२५३/२०२६
चौ.ता. २५/०८/२०२६ दिनांक : २१/०७/२०२६

अर्जदार : १. जहान अरा बेगम ताज मोहम्मद रा. हाजी नगर, रझा मस्जिद जवळ, अकोट फैल, अकोला, ता. जि. अकोला. २. सय्यद जावेद अहमद ताज मोहम्मद रा. रझा मस्जिद जवळ, हाजी नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. साइमा फिरदोस ताज मोहम्मद रा. हाजी नगर, रझा मस्जिद जवळ, अकोट फैल, अकोला, ता. जि. अकोला. ४. सय्यद नावेद अहमद ताज मोहम्मद रा. हाजी नगर, रझा मस्जिद जवळ, अकोट फैल, अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : ताज मोहम्मद जान मोहम्मद
पत्ता :- रा. हाजी नगर, रझा मस्जिद जवळ, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ताज मोहम्मद जान मोहम्मद यांचे दि. २४/०५/२०२६ रोजी केअर हॉस्पिटल, केडिया प्लॉट, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर प्रसिद्धी

अकोला जिल्ह्यामध्ये जाहीर प्रसिद्धी देण्याच्या दृष्टीकोनातून दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी देण्यात येते.अकोला तालुक्यामध्ये मजूरांना रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्त्वावर मजूर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असून नियोजित संस्थेचे सभासद होवू इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करणारी व्यक्ती तसेच अल्पभूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरिता शारीरिक श्रमाची कामे करतात अशा व्यक्तींनी अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी नियोजित समर्थ मजूर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय सिद्धार्थ लालाजी शिरसाट यांचे निवासस्थान मौजे उगवा, ता. जिल्हा अकोला येथे दि.३०/०७/२०२६ गुरुवार रोजी सकाळी ९:३० वाजता सभा आयोजित केली आहे.तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे ही विनंती.

मुख्य प्रवर्तक
श्री. सिद्धार्थ लालाजी शिरसाट
(नियोजित समर्थ मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित उगवा, जिल्हा अकोला)

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

Civil Judge Sr.Dn. Akola
IN THE COURT OF Shri V.R. Assudani
10th Jt. Civil Judge Sr.Dn., Akola, Akola, Akola.

SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES — Small Cause Suit/23/2025
Sai Construction And Developers LLP Thr. Shanky Rajendrakumar Jaiswal Vs Gokuldas Khemji Patel And 2
NEXT DATE: 29-08-2026

(O. 5, R. 1, 5.)

To,
Gokuldas Khemji Patel And 2
R/o. 1710, Kalal Ki Chawl, Akola, Tq. Dist. Akola, AKOLA, MAHARASHTRA

Whereas **Sai Construction And Developers LLP Thr. Shanky Rajendrakumar Jaiswal** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **29-08-2026 at 11:00 o'clock in the forenoon,** to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement. Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence. Given under my hand and the seal of the Court, this 18-07-2026

10th Jt. Civil Judge Sr.Dn., Akola

जाहीर नोटीस

वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ९४८/२०२६ प्रोसेस नं.९१११९/२०२६
चौ.ता. २७/०८/२०२६ दिनांक : १८/०७/२०२६

अर्जदार : १. मनोहर देविदासगिर गिरी रा. प्रिया टॉवरच्या मागे, वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. मो. क. ९८८१८५४५८५ २. ललिता सुरेश गिरी रा. पाथरवट पुरा, मु. पो. चिखलगाव, ता. जि. अकोला. ३. सुमनबाई राम पुरी रा. व्दारा विजय भारती, विवेकानंद आश्रम, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ४. दिनकर देविदास गिरी रा. मु. पो. चिखलगाव, ता. जि. अकोला. ५. विजया संतोष पुरी रा. साई मंदिर जवळ, हिवरखेड रोड, तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. लिलाबाई देविदास गिरी २. देविदास विठ्ठलगिर गिरी
पत्ता :- रा. मु. पो. चिखलगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लिलाबाई देविदास गिरी यांचे दि. २५/०१/२०१२ रोजी व मयत देविदास विठ्ठलगिर गिरी यांचे दि. २२/०५/२०२३ रोजी चिखलगाव ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८१५/२०२६ प्रोसेस नं.९११२६/२०२६
चौ.ता. २५/०८/२०२६ दिनांक : १८/०७/२०२६

अर्जदार : १. श्रीमती वंदना संजय पाटेखेडे २. रूपेश संजय पाटेखेडे दोघेही रा. महादेव मंदिर जवळ, खडकी बु, खडकी, ता. जि. अकोला. ३. सौ. रेणुका सचिन लाहुडकर रा. उंद्री वार्ड नं. २, शिवाजी चौक, उंद्री, ता. चिखली, जि. बुलढाणा.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : संजय शामराव पाटेखेडे
पत्ता :- रा. महादेव मंदिर जवळ, खडकी बु, खडकी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संजय शामराव पाटेखेडे यांचे दि. ०६/०९/२००८ रोजी सर्वोपचार रूग्णालय, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११६३/२०२६ प्रोसेस नं.९३०१/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ दिनांक : २२/०७/२०२६

अर्जदार : १. तबस्सुम परवीन आसिफ अली २. आफरीन सदाफ आसिफ अली ३. अदनान अली आसिफ अली सर्व रा. खोकेवाली चाळ, खदान, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : आसिफ अली खुर्शिद अली
पत्ता :- रा. व्दारा आरिफ कॉन्स्टेबल, रा. खोकेवाली चाळ, खदान, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आसिफ अली खुर्शिद अली यांचे दि. ०८/०५/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबंब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११३५/२०२६ प्रोसेस नं.८९०५/२०२६
चौ.ता. ०४/०८/२०२६ दिनांक : १७/०७/२०२६

अर्जदार : १. लिला यशवंत सैतवाल रा. प्लॉट नं. ५९, गुरूकिपा बंगलो, नागेश्वर सोसायटी, नांदीवली रोड, डीएनसी शाळेच्या मागे, डोंबिवली ईस्ट, टिळकनगर, ठाणे. जि. ठाणे. ४२१२०१ २. मधुकर शांताराम भाकरे रा. बाळापूर नाका, भारती प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ३. मंदाबाई कमलाकर सोनटक्के रा. कालंका माता मंदिर जवळ, विशाल किराणा, नवीन आरिया, कांचन नगर, व्हीटसी जळगाव, पो. जळगाव, उपजिल्हा जळगाव, जि. जळगाव ४२५००१ ४. संजय शांताराम भाकरे रा. भारती प्लॉट, बाळापूर रोड, बिजवे किराणा दुकानाजवळ, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ७७९८०९८३४५

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. शांताराम भागवत भाकरे २. शांताबाई शांताराम भाकरे
पत्ता :- रा. बाळापूर नाका, भारती प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शांताराम भागवत भाकरे यांचे दि. ३१/०३/२०१२ रोजी व मयत शांताबाई शांताराम भाकरे यांचे दि. १९/०७/२०१४ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८५३/२०२६ प्रोसेस नं.९१२५/२०२६
चौ.ता. २५/०८/२०२६ दिनांक : १८/०७/२०२६

अर्जदार : १. अशोक शालिग्राम प्रधान २. प्रकाश शालिग्राम प्रधान अर्जदार क. १ व २ रा. पळसो बढे, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : शालिग्राम गणुजी प्रधान
पत्ता :- रा. पळसो बढे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्र

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

युवकांच्या आंदोलनाला विरोधकांची साथ

केंद्र सरकारवर खा.अमर काळे यांची जोरदार टीका

नवी दिल्ली/वर्धा/जनमाध्यम

शिक्षण व्यवस्थेतील प्रश्न आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला विरोधी पक्षांच्या नेत्यांनी भेट देत पाठिंबा दर्शविला. वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खा.अमर काळे यांनी आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतल्यानंतर केंद्र सरकारवर कठोर शब्दांत टीका केली.

ना. शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर अमर काळे म्हणाले की, देशातील शिक्षण व्यवस्थेचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला असून या विषयावर संसदेत चर्चा होणे आवश्यक आहे. मात्र, संसदेत कामकाज ठप्प असतानाही सरकार या विषयावर चर्चा करण्यास तयार नसल्याचा आरोप त्यांनी केला.

आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करणे, लाठीमार करणे आणि कठोर कलमांखाली कारवाई करणे ही लोकशाहीसाठी योग्य बाब नसल्याचे ते म्हणाले. १९३२ मध्ये महात्मा गांधी यांच्या येरवडा तुरुंगातील उपोषणाचा संदर्भ देत त्यांनी, त्या काळात ब्रिटीश सरकारने चर्चेचा मार्ग स्वीकारला होता, मात्र सध्याचे सरकार अधिक कठोर भूमिका घेत असल्याचा आरोप केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. २०१४ मध्ये भाजपला सत्तेवर आणणारी युवा शक्तीच आगामी काळात सरकारला धडा शिकवेल, असा दावा त्यांनी केला.

जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला देशभरातून पाठिंबा मिळत असून शिक्षणाच्या प्रश्नावर युवकांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे विरोधी पक्षांकडून सांगण्यात येत आहे.

दिव्यांगजन सशक्तीकरण राष्ट्रीय पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

वर्धा- केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयांतर्गत दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींसाठी राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतो. सन २०२६ साठी देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी ३० जुलै पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुकांनी आपले अर्ज www.awards.gov.in या संकेतस्थळावर सादर करावे. संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विशिष्ट नमुन्यातील अर्जामधील सर्व मुद्यांची माहिती उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्याचा सविस्तर वर्णनासह भरावी. श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बाल, बालिका यांच्यासाठी युडीआयडी कार्ड, दिव्यांगत्व प्रमाणपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे. प्रत्यक्ष किंवा इतर कोणत्याही माध्यमातून सादर केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही. पुरस्कारासंबंधी पात्रता, निकष, इतर सविस्तर तपशिल www.depwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर यांनी कळविले आहे.

नव्या पिढीची स्वप्ने जिवंत ठेवणे हीच साहित्याची खरी जबाबदारी

डॉ.राजेंद्र मुंढे यांचा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगावर परखड भाष्य

हिंगणघाट/जनमाध्यम

माहितीच्या विस्फोटाच्या आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वेगवान युगात माणसामाणसांतील संवाद कमी होत असताना नव्या पिढीच्या स्वप्नांची धडधड अखंड प्रवाही ठेवत त्यांना अधिक मानवी बनविणे हीच साहित्यिकांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. राजेंद्र मुंढे यांनी केले. हिंगणघाट येथील माता मंदिर सभागृहात आयोजित तिसऱ्या वर्धा जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी हा विचार मांडला.

प्रा. रवींद्र ठाकरे स्मृती विचारपीठावर झालेल्या उद्घाटन सोहळ्यात उद्घाटक प्रदीप दाते, स्वागताध्यक्ष तथा नगराध्यक्ष डॉ. नयना तुळसकर, कवी इरफान शेख,ॲड. सुधीरबाबू कोठारी, अतुलभाऊ वांदिले आणि डॉ. लीना नरड यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. मुंढे म्हणाले, विज्ञानाने जगाला वेग दिला असला तरी मानवी मूल्यांचे जतन करण्याचे कार्य साहित्यालाच करावे लागेल. बाजारपेठेच्या प्रभावामुळे संवेदनशीलता कमी होत असताना करुणा, विवेक आणि सर्जनशीलता जपणे ही काळाची गरज आहे. उद्घाटक प्रदीप दाते यांनी वर्ध्याची समृद्ध साहित्यपरंपरा जपण्याचे आवाहन केले, तर डॉ. नयना तुळसकर यांनी विदर्भभरातून आलेल्या साहित्यिकांचे स्वागत केले. प्रास्ताविक डॉ. गिरीधर काचोळे यांनी केले. संचालन अभय दांडेकर यांनी, तर आभार रंगनाथ तालवटकर यांनी मानले. विविध साहित्यिकांच्या उपस्थितीने संमेलनाला वैचारिक उंची लाभली.

नीट पेपर लीकप्रकरणी हिंगणघाटात एल्गार

आंबेडकर चौकात धरणे आंदोलन; केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

हिंगणघाट/जनमाध्यम

दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देत हिंगणघाटमध्ये विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी आंबेडकर चौकात धरणे आंदोलन करून नीट पेपर लीकप्रकरणी तीव्र निषेध व्यक्त केला. आंदोलनानंतर शहरातून मोर्चा काढत उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला निवेदन पाठविण्यात आले.

निवेदनात नीट परीक्षेतील कथित पेपर लीकप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला नैतिक पाठिंबा जाहीर करत, विद्यार्थ्यांचा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचवू,असा निर्धार व्यक्त केला. विविध वक्त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारावर टीका करत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले.यावेळी शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता वाढविणे,स्पर्धा परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालणे आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलन शांततेत पार पडले असून या वेळी विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

रोठा'तील चिमुकलीला न्याय द्या;आरोपीला फाशीची शिक्षा द्या

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे निवेदन

हिंगणघाट/जनमाध्यम

रोठा येथील १२ वर्षीय निष्पाप चिमुकलीवरील अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेने समाजमन हेलावून गेले असून, आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी,अशी ठाम मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे करण्यात आली. उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकारी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले.

निवेदनात या प्रकरणाचा फास्ट ट्रॅक न्यायालयात जलदगतीने खटला चालवून लवकर निकाल द्यावा,आरोपीविरुद्ध शासनाने प्रभावी बाजू मांडून कठोर शिक्षा मिळवून द्यावी, तसेच पीडित कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत व आवश्यक संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली. महिलांच्या व बालिकांच्या सुरक्षेसाठी संवेदनशील भागात पोलीस गस्त वाढविणे, संशयितांवर विशेष लक्ष ठेवणे आणि जनजागृती मोहीम राबविण्याचीही मागणी करण्यात आली. शहराध्यक्ष ऋषिकेश मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष विशाल हजारे, महिला जिल्हाध्यक्ष कविता मुगले, शहराध्यक्ष दीपाली रंगारी, सुजाता जभुळकर, सुजाता जिवणकर, अमित रंगारी, माजी नगरसेवक अनिल भोगाडे आदी उपस्थित होते. चिमुकलीला न्याय मिळालाच पाहिजे, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

हिंगणघाटात २६ जुलैला राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

हिंगणघाट/जनमाध्यम

सहयोग कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था, नागपूरद्वारे संचालित बुद्धिस्ट मंगल परिणय ग्रुप, नागपूर यांच्या वतीने हिंगणघाट येथे राज्यस्तरीय भव्य वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा २६ जुलै रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत न्यू यशवंत नगर, मास्टर कॉलनी येथील रिठे भवन येथे होणार आहे.

समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा तसेच पालकांना एकाच ठिकाणी परस्पर परिचयाची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मेळाव्यामुळे समाजात सुसंवाद, सामाजिक ऐक्य आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाला नगरसेवक विक्रांत भगत, सामाजिक कार्यकर्ते ईश्वरदास कुंभारे, प्रशांत मून, पत्रकार दिनेश घरडे तसेच संयोजक नरेश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. प्रमोद सोमकुंवर व उमाकांत सोमकुंवर यांच्या मार्गदर्शनाखाली हा मेळावा आयोजित करण्यात आला असून, विवाह इच्छुक युवक-युवती, त्यांचे पालक आणि समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रमोद सोमकुंवर (मो. ९३७३६ १७११४) यांच्याशी संपर्क साधावा.

शेतकऱ्यांनी किटकनाशके फवारणी करतांना काळजी घ्यावी

वर्धा/जनमाध्यम

शेतकऱ्यांनी पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करतांना स्वत:ची सुरक्षितता राखणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य काळजी घेतल्यास विषबाधा टाळता येऊ शकतो आणि पिकांचेही रक्षण होते. यासाठी शेतकऱ्यांनी पिकावर किटकनाशके फवारणी करतांना काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. कीटकनाशके नेहमी परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावीत. कृषी अधिकाऱ्यांच्या किंवा कृषी दर्शनी पुस्तिकेतील शिफारशीनुसारच औषधे निवडावीत. औषधांची पाकिटे किंवा बाटल्या खरेदी करताना त्यावर उत्पादनाची व अंतिम तारीख नक्की तपासावी. कीटकनाशकाचे तांत्रिक नाव आणि त्याचे प्रमाण पॅकेटवर नमूद केलेले आहे का, याची खात्री करावे. फवारणी करतांना संपूर्ण शरीर झाकणारे कपडे (उदा. पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि पॅन्ट), हातमोजे, मास्क, डोक्याला टोपी, गॉगल आणि बूट यांचा वापर करावा. फवारणी करतांना वाऱ्याच्या दिशेने फवारणी करावी, जेणेकरून औषधाचे तुषार अंगावर उडणार नाहीत. फवारणी सुरू असताना खाणे, पिणे, किंवा तंबाखू, धूम्रपान करणे टाळावे. पंपाचे नोझल बंद झाल्यास ते तोंडाने अजिबात साफ करू नये, त्यासाठी तारेचा वापर करावा. एकाच गटातील कीटकनाशकाचा वारंवार वापर करू नका, अन्यथा किडींमध्ये औषधांविषयी प्रतिकार क्षमता वाढू शकते. फवारणी पूर्ण झाल्यावर साबणाने हात पाय आणि संपूर्ण शरीर स्वच्छ धुवावे. फवारणीसाठी वापरलेले कपडे इतर कपड्यांपासून वेगळे धुवावेत. कीटकनाशकांचे रिकामे डबे किंवा बाटल्या शेतात फेकून देऊ नका किंवा इतर कामांसाठी वापरू नका. त्या बाटल्या विहिरी किंवा नदीपासून दूर जमिनीत खोल खड्डा करून नष्ट कराव्यात. विषबाधा झाल्यास बाधित व्यक्तीला ताबडतोब फवारणीच्या जागेपासून दूर, मोकळ्या व सावलीच्या ठिकाणी नेऊन प्रथमोपचार द्यावेत. विषबाधेची लक्षणे दिसल्यास अजिबात वेळ न घालवता डॉक्टरांशी संपर्क साधावा, असे हिंगणघाट येथील उपविभागीय कृषी अधिकारी स्वप्नील तोरणे यांनी कळविले आहे.

शरीराची योग्य ओळखच सुरक्षित आयुष्याचा पाया

किशोरवयीन मुलींमध्ये शरीर साक्षरतेचा संदेश-डॉ. माधुरी झाडे

वर्धा/जनमाध्यम

किशोरवयात होणाऱ्या शारीरिक, मानसिक व भावनिक बदलांची शास्त्रशुद्ध माहिती प्रत्येक मुला-मुलीपर्यंत पोहोचणे आवश्यक असून, शरीर साक्षरता ही काळाची गरज आहे,असे प्रतिपादन प्रशिक्षक डॉ. माधुरी झाडे यांनी केले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धा शहर व जिल्हा शाखेच्या वतीने वयात येताना स्वतःला जाणूया या विषयावर प्रशिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या लैंगिकता सप्ताहाच्या निमित्ताने हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रशिक्षणात वयात येताना होणारे शारीरिक व मानसिक बदल,मासिक पाळीची प्रक्रिया, मासिक पाळी व्यवस्थापन, शरीराविषयी सकारात्मक दृष्टिकोन तसेच लैंगिक शोषणाच्या प्रसंगी नकार देण्याची कला याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शाळांमध्ये जाऊन विद्यार्थिनींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी प्रशिक्षक तयार करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.डॉ. झाडे म्हणाल्या, अज्ञानामुळे अनेकदा शारीरिक, मानसिक व भावनिक हानी होते. त्यामुळे स्वतःच्या शरीराकडे वैज्ञानिक आणि सकारात्मक दृष्टीने पाहण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंदा धाबर्डे होत्या. त्यांनी आजच्या सामाजिक परिस्थितीत अशा प्रकारचे मार्गदर्शन मुलींसह मुलांनाही देण्याची गरज असल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून वर्धा जिल्ह्याच्या महिला सहकार्यवाह कविता लहोट उपस्थित होत्या. प्रास्ताविक कविता राठोड यांनी केले. गायत्री बेहेरे यांनी सूत्रसंचालन, अदिती धोपटे यांनी गीत सादर केले, तर मंजुषा देशमुख यांनी आभार मानले. या प्रशिक्षणात १६ प्रशिक्षणार्थींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

स्वप्नांना यशाची सुवर्णभरारी

चन्नावार ई-विद्या मंदिरात गुणवंतांचा गौरव

वर्धा/जनमाध्यम

यशाला मेहनतीची जोड आणि स्वप्नांना जिद्दीची साथ मिळाली तर उत्कृष्टतेचे नवे शिखर गाठता येते, याची प्रचिती चन्नावार ई-विद्या मंदिर, येळाकेळी येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात आली. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील गुणवंत विद्यार्थी, ऑलिम्पियाड विजेते आणि शिक्षकांचा उत्साहपूर्ण वातावरणात गौरव करण्यात आला.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्थेचे अध्यक्ष चन्नावार, संचालिका चन्नावार, प्राचार्या अपूर्वा पांडे,उपप्राचार्या पूजा कपूर यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. CBSE दहावीच्या परीक्षेत ९८.२ टक्के गुणांसह मराठीत शंभर पैकी शंभर गुण मिळविणाऱ्या तनुश्री नाखले हिचा विशेष सत्कार करण्यात आला. श्रावणी देशमुख (९६.६%), पार्थ देशमुख (९६.२%), सगुन वंजारी (९६ टक्के व कृत्रिम बुद्धिमत्ता विषयात १०० गुण), निष्का गोयंका (९४ टक्के व इंग्रजीत १०० गुण) यांच्यासह ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालकांसह गौरव करण्यात आला.

SOF ऑलिम्पियाडमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पदके, प्रमाणपत्रे आणि रोख पारितोषिक देण्यात आले. तसेच IIT कानपूरमध्ये प्रवेश मिळवलेले पार्थ साहू, IIT धनबादची अक्षरा वंजारी आणि BITS पिलानीमध्ये निवड झालेली अर्था सराफ यांचा विशेष सन्मान करण्यात आला.विद्यार्थ्यांच्या यशामागे मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांचाही गौरव करण्यात आला. इंग्रजी विषयात शंभर टक्के गुण मिळवून देणाऱ्या पूजा कपूर, कृत्रिम बुद्धिमत्ता विषयाचे अविनाश झुंजुरकर आणि मराठी विषयाच्या वसुधा हिवरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आणि उत्कृष्टतेचा गौरव करणारा हा सोहळा शाळेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय ठरला.

अनुसूचित जाती, नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांसाठी स्टँड अप इंडिया योजना

वर्धा/जनमाध्यम

केंद्र शासनाच्यावतीने स्टँडअप योजनेंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती, जमातीचे १ लाख २५ नवउद्योजक व तितक्याच महिला उद्योजिका निर्माण करण्यासाठी मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या योजनेचा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील उद्योजकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष साजरे करण्यात येत आहे. जयंती वर्षानिमित्त केंद्र शासनाने स्टँडअप इंडीया ही योजना घोषित केली आहे. या योजनेंतर्गत १ लाख २५ हजार अनुसूचित जाती, जमातीचे उद्योजक आणि १ लाख २५ हजार महिला उद्योजिका निर्माण करण्याचे उदिष्ट केंद्र शासनाने ठरविले आहे. यासाठी केंद्र शासनाने १० हजार कोटीची तरतुद केली आहे.

योजनेंतर्गत संबंधित लाभार्थ्यांना त्यांचा स्वहिस्सा म्हणुन एकुण प्रकल्प किंमतीच्या २५ टक्के रक्कम द्यावयाची आहे. योजनेंतर्गत अनुसूचित जातीसाठीच्या सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजक लाभार्थ्यांची मार्जीन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक लाभार्थ्यांना एकुन प्रकल्प किमतीच्या लाभार्थी हिस्यातील २५ टक्के मधील जास्तीत जास्त १५ टक्के मार्जीन मनी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजक यांना १० टक्के हिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टँडअप इंडीया या योजनेंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजुर केल्यानंतर उर्वरीत १५ टक्के सबसिडी राज्य शासनामार्फत देण्यात येणार आहे.लाभार्थ्यांनी आयुक्त, समाज कल्याण पुणे यांच्या नावे अनुदानासाठी मागणी विहीत केलेल्या विवरण पत्रात तीन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तावासोबत उद्योग आधार नोंदणी पत्र आणि जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

अस्थी नदीत नाही तर मातीत, डेहनकर कुटुंबाचा समाजापुढे नवा आदर्श

पर्यावरण रक्षणासाठी शेतातच अस्थी विसर्जन

आर्वी/जनमाध्यम

परंपरेचा आदर राखत पर्यावरण संरक्षणाचा नवा संदेश देणारा स्तुत्य उपक्रम डेहनकर कुटुंबाने राबविला आहे. स्वर्गीय वामनराव राजेरामजी डेहनकर यांच्या निधनानंतर अस्थींचे नदीत विसर्जन करण्याऐवजी स्वतःच्या शेतात विसर्जन करून कुटुंबाने समाजापुढे पर्यावरणपूरक विचारांचा आदर्श ठेवला आहे.

हिंदू धर्मपरंपरेनुसार अस्थी विसर्जनासाठी नदीची निवड केली जाते. मात्र, वाढते नदी प्रदूषण आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेऊन डेहनकर कुटुंबाने रूढ परंपरेला सकारात्मक दिशा दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांवर श्रद्धा ठेवत त्यांनी

आयुष्यभर ज्या मातीत कष्ट केले, ज्या भूमीने उदरनिर्वाह दिला, त्याच मातीत स्वर्गीय वामनराव डेहनकर यांच्या अस्थींचे विसर्जन केले.

निसर्गाचे रक्षण हीच खरी ईश्वरसेवा हा संदेश या कृतीतून अधोरेखित झाला.धार्मिक श्रद्धा अबाधित ठेवत नदी प्रदूषण रोखण्यासाठी प्रत्येकाने पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याची गरज असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले आहे.डेहनकर कुटुंबाच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, श्रद्धा,संस्कार आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे. बदलत्या काळात पर्यावरण संवर्धनासाठी समाजानेही अशा विधायक उपक्रमांचा स्वीकार करावा, असा प्रभावी संदेश या कृतीतून देण्यात आला आहे. नदी संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाच्या दिशेने हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, परंपरेला आधुनिक सामाजिक जाणीवेची जोड देणारा हा आदर्श अनेकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २३६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

प्रहार चे जिल्हाधिकारी कार्यालयावर लोटांगण

-जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा निषेध

अमरावती/प्रतिनिधीः- दिल्ली मध्ये जंतर-मंतर वर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठी चार्जच्या निषेधार्थ प्रहार सामाजिक संघटनेच्या वतीने आज बुधवार २२ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भर पावसात लोटांगण आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईचा निषेध करत केंद्र सरकार व दिल्ली पोलीस प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सरकारच्या विरोधात रोष व्यक्त केला. पाऊस सुरू असताना कार्यकर्त्यांनी रस्त्यावर लोटांगण घालून आगळ्या पद्धतीने निषेध नोंदवला.

दिल्लीतील जंतर मंतरवर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्या साठी जमलेल्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सरकारला संवेदनशीलपणे हाताळता आले असते. पण तसे झाले नाही. पोलिसांनी लाठीमार केला. केवळ एका मंत्र्याला वाचविण्यासाठी सुरू असणारी कसरत निषेधार्ह आहे. यातून लोकशाहीचे खच्चीकरण होत असल्याचे दिसून येत आहे.याचा निषेध नोंदविण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. आंदोलन करणाऱ्यांमध्ये छोटू महाराज वसू,बंटी रामटेके,जितू दुधाने, गोलू पाटील, गणेश मारोडकर, शेख अकबर भाई, श्याम इंगळे, प्रशांत देशमुख, दिनेश कुरेकर, नितेश पानसे, विक्रम शेगोकार, प्रशांत शिरभाते, इमरान भाई, विक्रम जाधव, शेषराव धुळे, अजय तायडे, आकाश गजभिये, समर्थ डवरे, त्रृषिकेश ठवकरसह पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता.

जिल्हा बार असोसिएशनने केला तीव्र निषेध

स्पर्धा परीक्षा आणि नीट सारख्या महत्त्वाच्या परीक्षांमध्ये सातत्याने होणाऱ्या पेपरफुटीच्या तसेच जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जचा अमरावती जिल्हा बार असोसिएशनने तीव्र निषेध केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी बार असो सिएशनचे अध्यक्ष एड. प्रशांत देशमुख, सचिव एड. गिरीश धर्माळे यांच्या सह एड. हरीश निंबाळकर, एड. सुनील गजभिये, एड. उज्ज्वल सोनोने, एड. अक्षय खराटे,एड श्रीधर आकोलकर, एड.मनीष सिरसाट, एड.रुपेश सवाई,एड. श्रेयस काळीवकर, एड. संदेश आहेर, एड. संकेत इंगळे, एड. स्वप्नील तेलमोरे,एड. गजानन जाभोळकर,एड.इंद्रायणी शेळके,एड.गौरव मोहड, एड. विराज नळकांडे, एड.सुनिल थोरात,एड.सुदर्शन वानखडे, एड.प्रथमेश थोरात, एड. वैभव तायडे,एड. किशोर चव्हाण यांच्यासह बार असोसिएशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बडनेऱ्यात बनावट अल्ट्राटेक सिमेंट निर्मितीचा पर्दाफाश

३.४३ लाखांचा मुद्देमाल जप्त, कुक्कुटपालन शेडवर पोलिसांची धाड

अमरावती/प्रतिनिधीः- बडनेरा पोलिसांनी अंजनगावबारी–माजरी मसला मार्गावरील एका कुक्कुटपालन शेडवर छापा टाकून बनावट अल्ट्राटेक सिमेंट तयार करण्याचा प्रकार उघडकीस आणला. या कारवाईत बनावट सिमेंटच्या बॅगा, रिकामे पोते आणि उत्पादनासाठी वापरण्यात येणारे साहित्य असा ३ लाख ४३ हजार २२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी शेख युसुफ शेख बब्बू (रा. गवळीपुरा, नवी वस्ती, बडनेरा) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच कॉपीराइट कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टॉर्क डिटेक्टिव्ह कंपनीचे प्रतिनिधी नितीन नारायण ठाकरे यांना अल्ट्राटेक सिमेंट कंपनीकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी कंपनीच्या नावाचा व लोगोचा गैरवापर करून निकृष्ट दर्जाचे बनावट सिमेंट तयार करून विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत छापा टाकला.

या कारवाईत अल्ट्राटेक सिमेंटच्या बॅगा, १४५ सुपर अल्ट्राटेक बॅगा, २५ 'नॉट फॉर रिसेल' बॅगा, रिकामे पोते तसेच लोखंडी कुप्पी, घमेली, फावडे आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले. बनावट सिमेंटच्या माध्यमातून ग्राहकांची फसवणूक करून कंपनीच्या ब्रँडचा गैरवापर केल्याचा आरोप असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही बडनेरा पोलीस तपास करीत आहेत.

चिंचोलीत जुगार अड्ड्यावर धाड; ११ जुगारी जाळ्यात

बेलोरा/प्रतिनिधीः- ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी चिंचोली येथील गवळीपुरा परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर छापा टाकून ११ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, सहा दुचाकी, दहा मोबाईल फोन आणि जुगारासाठी वापरलेले पत्ते असा एकूण ६ लाख ४८ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा रचला. तेथे काही जण ५२ पत्त्यांवर 'एक्का बादशाह' हा पैशांचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी तातडीने कारवाई करत जुगार खेळणाऱ्या सर्वांना रंगेहात पकडले. छाप्यात आरोपींकडून ३ हजार ४४० रुपये रोख, जुगारासाठी वापरलेले ५२ पत्ते, सहा दुचाकी आणि दहा अँड्रॉइड मोबाईल जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या सर्व मालमत्तेची एकूण किंमत ६.४८ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी मोहम्मद रज्जाक मोहम्मद जहीर, योगेश वानखडे, नंदकिशोर जपुलकर, शुभम बावणे, अलकेश गित, सैयद तोसिब, आकाश धुर्वे, सुरज भिमटे, यश कोसे, सतीश दामडे आणि सुकराम बारस्कर यांच्याविरुद्ध मुंबई जुगार प्रतिबंधक कायद्यातील कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद राऊत यांच्या नेतृत्वातील पथकाने केली. पुढील तपास ब्राम्हणवाडा थडी पोलीस करीत आहेत.

फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

संपर्क:
९४२२८५७१६९,
९४२२९१८५६९

WANTED

Walk-in-Interview on 30/07/2026 at 12:30 P.M.
Name of the College : Chatrapati Shivaji Kala Mahavidyalaya, Asegaon Purna, Tq.Chandur Bazar, Dist. Amravati
Run By Veer Bajiprabhu Krida Va Vyayam Mandal, Belora.

Interview for the post of CHB teacher for the session 2026-27 will be held on 30.07.2026 at 12.30 pm. Principal Office, Chatrapati Shivaji Kala Mahavidyalaya, Asegaon Purna, Dist. Amravti.

Applications are invited for appointments of candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under :

Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes
(As per Regulation No.2/2020 and its para-11, G.R.Dated 17/10/2022)

Sr.No.	Subject/Course	Total No.of Contributory Post
1.	English	02
2.	Marathi	02

Vacancies for Non-Grant Courses/Programmes
(As per Regulation No.2/2020 and its para-11, G.R.Dated 17/10/2022)

Sr.No.	Subject/Course	Total No.of Contributory Post
1.	Geography	02
2.	English Litt.	02
3.	Home Economics	02
4.	Sociology	03

Eligibility : Academic qualifications shall be as per U.G.C.Regulation 2018 (University Direction No.08/2019 & 14/2019 for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकिर्ण-2018/(185/18)मशि-3, dt.14.11.2018. The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

Attend the personal interview at your own cost along with original and two sets of Xerox copies of documents.

Smt.R.V.Tayade	**Shri B.B.Kadu**	**Dr.S.D.Jawanjal**
President	**Secratary**	**Principal**
V.B.K.Mandal, Belora	**V.B.K.Mandal, Belora**	**C.S.K.Mah.Asegaon Purna**

महाराष्ट्र शासन
धर्मादाय सह आयुक्त कार्यालय
अमरावती विभाग, अमरावती

जा.क्र./धसआ/अधि/४५६०/ २०२६ दिनांक २१/०७/२०२६

जाहीर नोटीस

अर्ज क्र.०२०/कलम ४७/ २०२६
श्री लक्ष्मी नारायण बोरगांव (थांडे) ता.थामणगाव रेल्वे, जि.अमरावती
नो.क.ए.-६२७/अमरावती
अर्जदार :- श्रीमती पुर्णिमा गुणवंतराव वडतकर + ४
विरुध्द
गैरअर्जदार :- श्री गजानन नारायणराव कोंबे + ४

सर्व संबंधित लोकांना कळविण्यात येते की, मा. धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे दिनांक ०८/०७/२०२६ रोजीचे आदेशान्वये वरील नमुद न्यासात महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४७ प्रमाणे नविन विश्वस्तांची नेमणुक करावयाची आहे. सदरच्या न्यासात विश्वस्त होण्यासाठी खालील लोकांनी मा.धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांच्याकडे अर्ज केला आहे.

१. श्रीमती पुर्णिमा गुणवंतराव वडतकर, रा.वार्ड नं.३, बोरगाव (थांडे) ता.थामणगाव रेल्वे, जि.अमरावती
२. श्री संदिप ज्ञानेश्वरराव थांडे, रा.वार्ड नं.३, बोरगाव (थांडे) ता.थामणगाव रेल्वे, जि.अमरावती
३. श्री अजय केशवराव थांडे, रा.वार्ड नं.३, बोरगाव (थांडे) ता.थामणगाव रेल्वे, जि.अमरावती
४. जितेंद्र विनायकराव थांडे, रा.वार्ड नं.३, बोरगाव (थांडे) ता.थामणगाव रेल्वे, जि.अमरावती
५. श्री गणेश शांतीलाल राठी, रा. सदगुरु प्लॉझा, प्लॅट ४०४, टिळक नगर पुलगांव, ता.देवळी, जि. वर्धा

सदरच्या न्यासात जर कोणालाही विश्वस्त होण्याची ईच्छा असेल तसेच वरील चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयावयाचा असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती या पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचि विचार केला जाणार नाही व चौकशी पुर्ण करुन अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २१.०७.२०२६ रोजी काढण्यात आली.

शिक्का

सही /-
अधीक्षक.(न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.४५९/२०२६ **ने.ता.२४.०८.२०२५**

अर्जदार - १) रामनारायण कमलनारायण जयस्वाल, वय वर्षे, व्यवसाय- शेती
२) किशोर कमलनारायण जयस्वाल, वय ४८ वर्षे, व्यवसाय- शेती
३) सत्यनारायण कमलनारायण जयस्वाल, (मयत)
३अ) रेखा सत्यनारायण जयस्वाल, वय ५७ वर्षे, व्यवसाय- घरकाम
३ब) शुभम सत्यनारायण जयस्वाल, वय ३२ वर्षे, व्यवसाय- शेती
३क) शुभ्रता सत्यनारायण जयस्वाल, वय २९ वर्षे, व्यवसाय- घरकाम
४) मंगला विनय जयस्वाल, वय ४८ वर्षे, व्यवसाय- घरकाम
५) सुशिला दिलीप जयस्वाल, वय ५४ वर्षे, व्यवसाय- घरकाम
६) ममता अनिल जयस्वाल, वय ४५ वर्षे, व्यवसाय- घरकाम
अर्जदार नं.१,२,३ अ,ब,ड रा.पेठपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
अर्जदार नं.३ क रा.पांगरा, ता.पाशिया, जि.छिंदवाडा (म.प्र.)
अर्जदार नं.४, रा.वंडली, अमरावती, ता.जि.अमरावती
अर्जदार नं.५, रा.वृंदावन नगर, अकोला, ता.जि.अकोला
अर्जदार नं.६,रा.हिरुळपूर्णा सर्फाबाद, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --
कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र.१,२,४,५ व ६ ची आई तर अर्जदार क्र.३(अ) ची सासू तर अर्जदार नं. ३ (ब,क,ड) ची आजी नामे **रामकली कमलनारायण जयस्वाल** ही **दिनांक १९/१२/२०१९** रोजी तिचे राहते घरी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. ३(अ) चे पती तर अर्जदार क्र. ३ (ब,क,ड) चे वडिल नामे **सत्यनारायण कमलनारायण जयस्वाल** हे दिनांक **०३/०५/२०२५** रोजी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक :- १५/०७/२०२६

शिक्का

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३१५
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

श्री.ए.बी.कट्टे २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१४८१/२०२६
महेशकुमार व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.०४.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार - १. **श्री. महेशकुमार जानकीप्रसाद गुप्ता**
एस/ओ जानकीप्रसाद लक्ष्मणप्रसाद गुप्ता
वय ६७ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.सक्करसाथ बालाजी मंदिराच्या मागे, अमरावती
२. **उमेश कुमार गुप्ता, एस/ओ जानकीप्रसाद लक्ष्मणप्रसाद गुप्ता,**
वय ६६ वर्षे, व्यवसाय- व्यापारी
रा. मनु गॅरेज गली, वल्लभ नगर वॉर्ड सागर मध्यप्रदेश
३. **कविता गुप्ता, डब्ल्यु/ओ विनोद गुप्ता,**
वय ६४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.लल्ला कसाई गली, भगत सिंह वॉर्ड सागर मध्यप्रदेश
४. **रमेश जानकीप्रसाद गुप्ता**, एस/ओ.जानकीप्रसाद लक्ष्मणप्रसाद गुप्ता
वय ६२ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा.सक्करसाथ बालाजी मंदिराच्या मागे, अमरावती
-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत जानकीप्रसाद लक्ष्मणप्रसाद गुप्ता आणि आशाराणी जानकीप्रसाद गुप्ता** हे अनुक्रमे दिनांक १४.०१.२०१३ आणि दि.२९.१२.२०१५ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **महेशकुमार व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **महेशकुमार व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

जाहीर सूचना

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, मुंजषा वाठ, रा. सुपुर्दे कॉलनी, कठोरा नाका, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी विजय तुळशिराम व-हाडे यांच्या मालकीची मौजे- कामुंजा येथील गट क्र. ४८, ७९ आर शेत जमीन विकत घेण्याचा सौदा केला आहे. नमुद विजय तुळशिराम व-हाडे यांच्या व्यतिरिक्त इतर कोणाचाही, हक्क, बोजा, वारस हक्क व इतर काही भानगड असल्यास त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क करावा.

संपर्क
मंजुषा वाठ
रा. सुपुर्दे कॉलनी, कठोरा नाका, अमरावती,
ता.जि.अमरावती
मो.नं.- ९४२१७४३७०५

-सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.४६७/२०२६ ने.ता.२७.०८.२०२६

अर्जदार - १. **श्रीमती सुवर्णा ज्ञानेश्वर साठवणे,**
वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
२. **शुभम ज्ञानेश्वर साठवणे,** वय ३१ वर्षे, धंदा - मजुरी
३. **चेतन ज्ञानेश्वर साठवणे,** वय २९ वर्षे, धंदा - मजुरी
तिघेही रा.पेठपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **ज्ञानेश्वर शामराव साठवणे हे दिनांक १४/०४/२०२६** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि. अमरावती येथे मय्यत झालेले आहे.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २०.०७.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुर्जी, मौजे मुऱ्हा खु. येथील भूमापन गट नं.१३३ याचे एकुण क्षेत्र ०२ हे.५८ आर यापैकी लिहून देणार **१) सुरेश दामोधर चिंचाळे** यांचे मालकीचे क्षेत्र ०२ हे.५८ आर ही या नोटीसेची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अमरावती
दिनांक २३.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुर्जी, मौजे लोहराजपूर येथील भूमापन गट नं.९६ याचे एकुण क्षेत्र ०३ हे.४९ आर यापैकी लिहून देणार **१) सारंगधर वामन राऊत** यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हे.७४ आर ही या नोटीसेची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अमरावती
दिनांक २३.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुर्जी, मौजे मुऱ्हा खुर्द येथील भूमापन गट नं.९७ याचे एकुण क्षेत्र ०१ हे.५८ आर यापैकी लिहून देणार **१) दिपक हिरालाल जयस्वाल** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.७९ आर ही या नोटीसेची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अमरावती
दिनांक २३.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

पाहिजेत

सबा मायनॉरिटीज एज्युकेशनल ॲंड वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित
मनोहरराव नाईक उर्दु माध्यमिक विद्यालय, गुलिस्ता नगर, अमरावती,
तालुका-जिल्हा अमरावती
अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त
या शाळेत खाली दिलेल्या माहितीप्रमाणे पद भरणे आहे.

अ.क्र.	पदाचे नांव	शैक्षणिक व्यावसायिक पात्रता	अनुदान	पदसंख्या	संवर्ग
०१	क्रिडा शिक्षक अंश अनुदानित	B.Com/B.A. /B.Sc., B.P.Ed. HSC, B.P.E.	६०%	०१	खुला
०२	सहाय्यक शिक्षक वर्ग ८ वा अंश अनुदानित	B.A.B.Ed. (English) B.Sc.B.Ed. (Maths) TET/CTET Paper-II

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

सीताबाई संगई कन्या शाळेत पालक सभा

अंजनगाव सुर्जी- सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी संचलित कन्या शाळेत माता पालक सभेचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.शाळेच्या मुख्याध्यापिका सांगोळे यांच्या पुढाकाराने या सभेचे दोन सत्रात आयोजन करण्यात आले होते.या सभेला विद्यार्थिनी आणि त्यांच्या मातांचा मोठ्या संख्येने प्रतिसाद लाभला.यावेळी शाळेचे पर्यवेक्षक डहाळे यांनी पालकांना मार्गदर्शन केले.त्यांनी विद्यार्थिनींच्या दैनंदिन आहार, आरोग्य आणि शिस्त या विषयांवर अतिशय प्रेरणादायी विचार मांडले.मुख्याध्यापिका सांगोळे यांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, स्वच्छता आणि भविष्यातील उपक्रमांबाबत पालकांशी सविस्तर चर्चा केली.इयत्ता ८ ते १० वी च्या सभेसाठी माता पालक प्रतिनिधी म्हणून दिपाली संदीप माकोडे आणि कल्पना सुरेश खेरडे यांनी तर इयत्ता ५ ते ७ वी च्या सभेसाठी आशा बांगडे यांनी प्रतिनिधित्व स्वीकारले.शाळेच्या विज्ञान शिक्षिका खोरगडे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून पौगंडावस्थेतील मुलींच्या समस्या आणि त्यावरील उपाय याबाबत पालकांशी हितगुज साधले.पहील्या सत्राचे संचालन वैशाली गायगोले यांनी केले तर आभार वैष्णवी सेवाने यांनी मानले.दुसऱ्या सत्राचे संचालन गोतमारे यांनी तर आभार वाघ यांनी केले.एकूणच ही माता पालक सभा अत्यंत खेळीमेळीच्या आणि सकारात्मक वातावरणात पार पडली.

विद्यापीठात अजित पवार यांना जयंतीदिनी अभिवादन

अमरावती- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांना त्यांच्या जयंती दिनी अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी अजित अनंतराव पवार यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सी.ए पुष्कर देशपांडे, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव (प्रशासन) रविंद्र सयाम, सहा. कुलसचिव (अंकेक्षण) विलास काकडे, प्रशासन विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.संचालन व अजित पवार यांच्याबद्दल माहिती अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी दिली.

पोलीस पाटलांची बैठक

टाकरखेडा संभू - आगामी गणेशोत्सव, पोळा, गोकुळाष्टमी, ईद आदी सण-उत्सव शांततेत व उत्साहात पार पडावेत, यासाठी वलगाव पोलीस ठाण्यात हद्दीतील पोलीस पाटलांची बैठक आयोजित करण्यात आली.पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली वलगाव पोलीस ठाण्याच्या सभागृहात ही बैठक पार पडली.बैठकीत गावांमधील कायदा व सुव्यवस्था, स्थानिक अडीअडचणी तसेच सणोत्सवाच्या काळात शांतता व सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. गावांमध्ये घडणाऱ्या कोणत्याही संशयास्पद हालचाली, वादविवाद किंवा कायदा-सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणाऱ्या घटनांची माहिती तात्काळ वलगाव पोलीस ठाण्याला देण्याचे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक रीता उईके यांनी पोलीस पाटलांना केले. तसेच पोलीस पाटलांच्या अडचणी जाणून घेत त्यांचे निराकरण करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.या बैठकीस टाकरखेडा संभू, साऊर, शिराळा, गोपाळपूर, निमखेडा, जावरा, विर्शी, खारतळेगाव, कामुंजा, कुंड, हातखेडा, कळमगव्हाण, दस्तरापूर, देवरी निपाणी, आमला, आष्टी, नांदुरा बु., सावरखेडा, वझरखेड, रामा, नारायणपूर, सुलतानपूर, थुगाव, नया अकोला, रेवसा, पूसदा, वायगाव, सालोरा बु. आणि मक्रमपूर येथील पोलीस पाटील उपस्थित होते.

मोर्शीत विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ सर्वपक्षीय मोर्चा

दिल्लीतील लाठीचार्जचा तीव्र निषेध

मोर्शी/ वार्ताहर

दिल्ली येथील जंतर-मंतर परिसरात आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस लाठीचार्जच्या निषेधार्थ मोर्शी शहरात सर्वपक्षीय कार्यकर्ते, विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर आणि नागरिकांच्या वतीने निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी चौकातून भरपावसात निघालेला हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. मोर्चामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी 'मोदी तेरी तानाशाही नहीं चलेगी',

'आमचा संघर्ष न्यायासाठी', 'विद्यार्थ्यांचा सन्मान आमचा अधिकार' अशा घोषणा देत परिसरिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे काही काळ तणाव दणाणून सोडला. यावेळी आंदोलकांनी दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा तीव्र निषेध व्यक्त करत, शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे हे लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचे म्हटले. या घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, जखमी विद्यार्थ्यांना न्याय द्यावा तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना संविधानाने दिलेला लोकशाही पद्धतीने मत व्यक्त करण्याचा आणि आंदोलन करण्याचा अधिकार सुरक्षित ठेवावा, अशीही मागणी आंदोलकांनी केली.

मोर्चाच्या शेवटी नायब तहसीलदार चारुदत्त पाटील यांना विविध मागण्यांचे लेखी निवेदन देण्यात आले.या मोर्चात मोर्शी शहरासह तालुक्यातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, सर्वपक्षीय कार्यकर्ते, शिक्षक, डॉक्टर, प्रतिष्ठित नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दोन आठवड्यांनंतर पावसाचे पुनरागमन; बळीराजाला दिलासा

आसेगाव पूर्णा - आसेगाव पूर्णा व परिसरात गेल्या दोन आठवड्यांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत होते. पावसाअभावी सोयाबीन, कापूस व इतर पिकांची वाढ खुंटू लागली होती. शेतीची कामे ठप्प झाली होती, तर त्याचा परिणाम स्थानिक बाजारपेठेतील व्यवहारांवरही झाला होता. सकाळपासून पावसाने पुन्हा हजेरी लावताच शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला. शिवारात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी पुन्हा शेतीच्या कामांना लागले आहेत. पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे. बाजारपेठेतील मंदावलेली देवाणघेवाणही पुन्हा सुरू झाली असून कृषी निविष्ठा, खत-बियाणे तसेच इतर व्यावसायिक व्यवहारांना गती मिळाली आहे. सलग आणि समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामाला मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

गुरुपौर्णिमेनिमित्ताने 'त्रिदिवसीय गुरुचरित्र पारायण'

अमरावती- गुरुपौर्णिमेनिमित्त श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र आरोग्य सेवा कॉलनी रहाटगाव येथे आषाढ पौर्णिमा २९ जुलै रोजी परब्रम्ह श्री स्वामी समर्थांना गुरु करण्याचा व गुरु पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये साप्ताहिक पारायण २६ ते २८ जुलै पर्यंत त्रिदिवसीय गुरुचरित्र पारायण होणार आहे. तरी सर्व भाविकांनी तसेच स्वामी समर्थ सेवेकऱ्यांनी दत्त जयंती सप्ताह व स्वामी पुण्यतिथी सप्ताह प्रमाणेच तीन दिवसीय पारायण,भूपाळी आरती यानंतर परब्रम्ह श्री स्वामी समर्थ महाराजांना गुरु करण्याचा संकल्प युक्त कार्यक्रम होणार आहे. हवनयुक्त पारायण करण्याकरिता

श्री स्वामी समर्थ सारामृत पोथी संकल्प सोडण्यासाठी पळी,पंचपात्र, ताम्हण, हार, प्रसाद, नारळ, विडा ,सोबत आणावे. सदर कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथील आयोजक मंडळींनी केले आहे.

संत अच्युत महाराज भक्त परिवार पंढरपूरकडे रवाना

अमरावती- 'पाउले चालती पंढरीची वाट' या उक्तीप्रमाणे संत अच्युत महाराज भक्त परिवारातील सुमारे २०० वारकरी आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे रवाना झाले आहेत. जन्मभूमी संस्थान वरूड, कर्मभूमी संस्थान शेंदूरजना बाजार, अमरावती, दर्यापूर आणिाज यांच्या पावन सान्निध्यात आणि श्री दत्ताजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चार ट्रॅव्हल्सद्वारे पंढरपूर नागपूर येथील भाविक या वारीत सहभागी झाले आहेत.वारीच्या प्रारंभी श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे शिवभवन, आई रुक्मिणी माता आणि भगवान पांडुरंग यांचे दर्शन घेण्यात

आले.त्यानंतर संत अच्युत महाराजांची तपोभूमी बोरगाव धर्माळे येथे वारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. डॉ. आशिष धर्माळे, त्यांचे सहकारी आणि ग्रामस्थांनी महाप्रसादाचे आयोजन करून सर्व वारकऱ्यांची सेवा केली.इंजि. सागर पासेबंद यांनी प्रास्ताविक केले, तर संत श्री सचिनिक डॉ. आशिष धर्माळे यांनी केले.यानंतर संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला भेट देण्यात आली.सायंप्रार्थनेनंतर पियुष महाराज यांचे सुंदर कीर्तन पार पडले. यावेळी कार्यालयाचे प्रमुख बोदडे यांचा सपत्नीक सत्कार डॉ. अनिल सावरकर आणि लेंडे गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी दत्ताजी शिंदे यांनी आभार मानून सूचना दिल्या.

घराच्या आवारातून दुचाकी लंपास

अमरावती- गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शोभानगर परिसरात घराच्या आवारातून टेस्ट राईडसाठी वापरली जाणारी दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना उघडकीस आली आहे. चोरीस गेलेल्या दुचाकीची किंमत सुमारे ८५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. याप्रकरणात फिर्यादी योगेश नवलकिशोर राठी (५०), रा. कठोरा रोड, यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विद्यापीठात समान संधी कक्ष समन्वयक व विद्यार्थी विकास अधिकारी कार्यशाळा

अमरावती- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात ३१ जुलै, रोजी सकाळी १० वाजता डॉ. के.जी. देशमुख सभागृह येथे समान संधी कक्षाचे समन्वयक व विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेमध्ये विद्यार्थी विकास विभागाच्या विविध योजना, शिष्यवृत्ती, उपक्रम महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी विकास कक्षामार्फत राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे समान संधी कक्षाचे समन्वयक आणि विद्यार्थी विकास अधिकारी यांनी कार्यशाळेला उपस्थित राहणे अनिवार्य असून, यासंदर्भात विद्यार्थी विकास विभागाकडून सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्रभारी अधिकारी, सर्व संलग्नित महाविद्यालयांचे पदव्युत्तर शिक्षण विभाग, पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र यांना पत्राद्वारे कळविण्यात आले असून सर्व महाविद्यालयांनी आपले समान संधी समन्वयक तसेच विद्यार्थी विकास अधिकारी यांची गुगल फार्म https://forms.gle/mnPSt6STbN5IRPJT7 या लिंकवर नोंदणी करावी, असे

आवाहन विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी केले आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांवर मंत्रालयात सकारात्मक बैठक

मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव सादर करण्याची ग्वाही; समांतर आरक्षण, नोकरी, अनुदान व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रासह अनेक मागण्यांवर चर्चा

आसेगाव पूर्णा/ वार्ताहर

विदर्भासह राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत मंत्रालयात राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या पाठपुराव्यानंतर झालेल्या या बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली असून,धोरणात्मक निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज

चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १५ वर्षांपासून प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांसाठी आंदोलन सुरू आहे. १० मार्च रोजी अमरावती येथे विभागीय आयुक्त कार्यालयावर काढण्यात आलेल्या महाएल्गार मोर्च्यानंतर मंत्रालय स्तरावरील बैठकीचे आश्वासन देण्यात आले होते. बैठकीत प्रकल्पग्रस्तांचे नोकरीतील समांतर आरक्षण ५ टक्क्यांवरून १५ टक्के करण्याची मागणी, उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कृषी विद्यापीठांप्रमाणे ५० टक्के जागा राखीव ठेवून अनुशेष भरणे, वयोमर्यादा ओलांडलेल्या (एच.बार.) प्रकल्पग्रस्तांना एकरकमी ४० लाख रुपये अनुदान देणे, सरळ खरेदी धारक व ऐच्छिक पुनर्वसितांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देणे, स्पर्धा परीक्षेची अट रद्द करणे, कंत्राटी प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायम करणे, आत्महत्या केलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबीयांना शासकीय नोकरी अथवा ५० लाख रुपयांची आर्थिक मदत देणे, बोगस प्रमाणपत्रधारकांवर विशेष तपास पथक (एसआयटी) नेमून कठोर कारवाई करणे, नोकरीतील वयोमर्यादेत दोन वर्षांची वाढ तसेच प्रत्येक जिल्ह्यात प्रकल्पग्रस्त भवन उभारण्यासह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

मागण्यांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असून, मंत्रिमंडळ बैठकीतही तो मांडण्याबाबत सकारात्मक भूमिका असल्याची माहिती मंत्री मकरंद पाटील यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिली. बैठकीस बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक मनोज चव्हाण, उपाध्यक्ष प्रा.निलेश ठाकरे, सचिव गौतम खंडारे, संघटक राजू लोणकर यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.तसेच मदत व पुनर्वसन, जलसंपदा, जलसंधारण विभागांचे प्रधान सचिव, उपसचिव व संबंधित अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी, व्हीआरडीसीचे संचालक, मुख्य अभियंते आणि कार्यकारी अभियंते हे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठकीत सहभागी झाले.

आयुक्तालयात अजित पवार यांना अभिवादन

अमरावती- राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी उपायुक्त संतोष कवडे, सहायक आयुक्त वैशाली पाथरे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही यावेळी आदरांजली वाहिली.

पावसाळ्यात साथरोगांना आळा घालण्यासाठी मनपाची मोहीम

शहरभर तातडीने फवारणी, फॉगिंग आणि डास निर्मूलनाचे निर्देश

अमरावती/ का.प्र.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया तसेच इतर साथीच्या रोगांचा संभाव्य प्रादुर्भाव रोखण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने व्यापक कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच शहरातील सर्व प्रभागांमध्ये तातडीने फवारणी, फॉगिंग, डास निर्मूलन, जनजागृती आणि स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात, असे स्पष्ट निर्देश महापौर तेजवानी यांनी दिले.

यासंदर्भात महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या दालनात पावसाळ्यातील साथरोग नियंत्रणाबाबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. बैठकीला महापौर तेजवानी, आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, उपमहापौर भेंडे, स्थायी समिती सभापती मार्डीकर, सभागृह नेते गावंडे, विरोधी पक्षनेते इंगोले, गटनेते डॉ.तायडे, शेख हमीद शेख वाहेद,आमले, शहर सुधार समिती सभापती कुरील, नगरसेवक चिमोटे, ॲड. देशपांडे, अतिरिक्त आयुक्त देशमुख, अतिरिक्त आयुक्त नाईक, उपायुक्त वानखडे, उपायुक्त बोरेकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. जाधव, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. पोहनकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे तातडीने शोधून त्यांचे निर्मूलन करणे, डासांच्या अळ्यांचा नाश करणे, साचलेल्या पाण्याचा निचरा करणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे तसेच नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर

जनजागृती करणे या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक प्रभागात नियमित फवारणी करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. महानगरपालिकेकडे उपलब्ध वाहनावरील फॉगिंग मशिनच्या माध्यमातून नियोजनबद्ध फॉगिंग मोहीम राबविण्यात येणार आहे. याशिवाय आवश्यकतेनुसार अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून रविवारी आणि सुट्टीच्या दिवशीही विशेष फवारणी व फॉगिंग मोहीम सुरू ठेवण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

शहरातील ज्या भागांमध्ये पाणी साचलेले आहे, त्या सर्व ठिकाणी मलेरियाविरोधी लार्वीसाईड (एमएलओ ऑइल) टाकून डासांच्या अळ्यांचा नाश करण्याचे निर्देश देण्यात आले.

साथरोग नियंत्रणासाठी उपायुक्त, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय अधकिारी, स्वच्छता विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे काम करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय राहिल्यास साथरोग नियंत्रण अधिक परिणामकारक होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

आशा सेविकांमार्फत शहरातील घराघरांत जाऊन कुलर, फुलदाण्या, टायर, रांजण, मडकी तसेच इतर पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात येणार आहे.

नागरिकांना घर आणि परिसरात पाणी साचू न देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असून 'एक दिवस – कोरडा दिवस (ड्राय डे)' ही संकल्पना प्रभावीपणे राबविली जाणार आहे. स्वास्थ्य निरीक्षकांकडून आवश्यक सूचना व नोटिसा देऊन नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

शहरातील पशुधन मालकांनी शेणखत तातडीने उचलावे, यासाठी नोटिसा देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच या संदर्भात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. वृत्तपत्रे, पत्रके, बॅनर्स, सामाजिक माध्यमे आणि इतर प्रसारमाध्यमांच्या साहाय्याने साथीचे रोग प्रतिबंधक उपाय नागरिकांपर्यंत पोहोचविले जाणार आहेत.

मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या माध्यमातून शहरातील स्वच्छता, फवारणी, फॉगिंग आणि साथरोग प्रतिबंधक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देशही देण्यात आले. शहरातील प्रत्येक भागात स्वच्छता आणि डास निर्मूलनाच्या उपाययोजना काटेकोरपणे राबविण्यावर भर देण्यात आला.

बैठकीच्या शेवटी आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध, तातडीने आणि प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश दिले. महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे तसेच उपस्थित लोकप्रतिनिधींनीही नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून परिसर स्वच्छ ठेवावा, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी आणि अमरावती शहर स्वच्छ, सुरक्षित व रोगमुक्त ठेवण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

CHANGE OF NAME

Passport No : S8332935
Old Name : ALIZA NAQEEB UL HAQUE
New Names : ALIZA HAQUE NAQEEB UL HAQUE
Address: Near panch Banglow , Mominpura, Tajnapeth , Akola - 444001 (M.S)

CHANGE OF NAME

Passport no : S 8332933
Old Name : IZHAR UL NAQEEB UL HAQUE
New Names : IZHAR UL HAQUE NAQEEB UL HAQUE
Address: Near panch Banglow , Mominpur, Tajnapeth , Akola - 444001 (M.S)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

४८ कोटींच्या दंडवसुलीवर 'अदृश्य हात'?

कारवाईचा गाजावाजा; पण वसुली शून्य! महसूल यंत्रणा शासनाची की दंडग्रस्तांची?

दंडग्रस्तांवर माया की शासनाच्या तिजोरीवर डल्ला?

ॲड. समीर ठाकूर

अकोला : अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील कथित अतिरिक्त गौण खनिज उत्खनन प्रकरणात शासनाने तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावल्याचा मोठा गाजावाजा झाला. महसूल विभागाने कारवाईचे दावे केले, समपहरणाच्या नोटिसा दिल्याचे सांगितले, सातबाऱ्यावर बोजे चढविल्याचेही सांगण्यात आले; परंतु या सर्व गदारोळानंतरही शासनाच्या तिजोरीत एक रुपयाही जमा झालेला नसल्याचे वास्तव आता प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच मोठे प्रश्नचिन्ह उभे करत आहे.

आज सामान्य नागरिकाने महसूलाची काही हजार रुपयांची थकबाकी ठेवली, तर महसूल यंत्रणा क्षणार्धात सक्रिय होते. जप्ती, बँक खाते गोठविणे, मालमत्तेचा ताबा, निलामी, वसुलीचे फर्मान अशा कारवाया झपाट्याने केल्या जातात. मात्र जेव्हा प्रश्न ४८ कोटी रुपयांच्या दंडाचा येतो, तेव्हा तीच यंत्रणा अचानक संथ का पडते? हा केवळ प्रशासकीय विलंब आहे की त्यामागे कोणाचा तरी 'अदृश्य हात' कार्यरत आहे? हा प्रश्न आता महसूल विभागाच्या दालनातही कुजबुजला जात आहे.

विशेष म्हणजे, संबंधित दंडग्रस्तांनी अपील दाखल केल्याची माहिती पुढे केली जात आहे. मात्र अपील दाखल होणे म्हणजे वसुलीला आपोआप स्थगिती मिळणे नव्हे. कायद्यानुसार सक्षम प्राधिकरणाने स्पष्ट स्थगिती आदेश दिला असल्याशिवाय शासनाची वसुली प्रक्रिया थांबत नाही. मग या प्रकरणात असा कोणता स्थगिती आदेश आहे? असल्यास तो सार्वजनिक का केला जात नाही? आणि नसल्यास महसूल प्रशासनाने स्वतःहून वसुलीची गती का रोखली? या प्रश्नांची उत्तरे आजतागायत मिळालेली नाहीत.

महसूल विभागाकडून काही मालमत्तांवर बोजा चढविल्याचे सांगितले जाते; मात्र सर्व संबंधित मालमत्तांवर समान निकषाने कारवाई झाली का, याबाबत मोठी शंका व्यक्त होत आहे. कोणत्या मालमत्तांची जप्ती झाली, कोणत्या वगळल्या गेल्या आणि कोणत्या कारणाने वगळल्या गेल्या? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे अद्याप उपलब्ध नाहीत. परिणामी, कारवाईत कथित निवडकपणा झाला का, याबाबतही चर्चा रंगू लागली आहे.

दरम्यान, दंड वसुली जितकी लांबेल तितका दंडग्रस्तांना वेळ मिळणार आणि शासनाचा महसूल मात्र तिजोरीत येणार नाही, हे वास्तव आहे. या काळात मालमत्तांचे व्यवहार होऊ शकतात, त्यांचे मूल्य बदलू शकते, कायदेशीर गुंतागुंत वाढू शकते. जर शेवटी अपील फेटाळले गेले, तर या विलंबामुळे शासनाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार? हा प्रश्न प्रशासनासाठी टाळता येणार नाही. या प्रकरणातील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे आदिवासी जमिनींवरील कथित स्टोन क्रशर उद्योग. आदिवासी जमिनीवर भाडेपट्टा देताना शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक होती का? करारनामे कायदेशीर होते का? जमिनीचा वापर बदलण्याची प्रक्रिया पूर्ण झाली होती का? त्या ठिकाणी सुरू असलेल्या उद्योगांना आवश्यक परवानग्या होत्या का? या सर्व प्रश्नांची स्वतंत्र चौकशी अपेक्षित असताना महसूल विभागाने कोणती ठोस पावले उचलली, याबाबत अद्याप मौन पाळले जात आहे.

महसूल प्रशासनातील विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांनी कोणत्या तारखेला कोणते आदेश दिले? जप्तीचे आदेश निघाले का? निलामीची फाईल कुठे थांबली? वसुलीचा आढावा किती वेळा घेण्यात आला? वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेतली का? या सर्व बाबी जनतेसमोर मांडल्या गेल्या पाहिजेत. कारण आजपर्यंत कागदांवर कारवाई आणि प्रत्यक्षात महसूल शून्य अशीच परिस्थिती दिसून येत आहे.

महसूल विभागाचे काम केवळ फाईल हलविणे नसून शासनाचा पैसा सुरक्षितपणे तिजोरीत जमा करणे हे आहे. जर दंडाची रक्कम वर्षानुवर्षे वसूल होत नसेल, तर त्या कारवाईचे औचित्यच काय, असा सवाल आता उपस्थित होत आहे. महसूल प्रशासन शासनाच्या हितासाठी काम करत आहे की दंडग्रस्तांना वेळ मिळावा यासाठी, अशी तीव्र भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

या प्रकरणात केवळ स्थानिक अधिकाऱ्यांची नव्हे, तर वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांच्या देखरेखीचीही कसोटी लागली आहे. कारण ४८ कोटी रुपयांचा महसूल अडकून पडणे ही केवळ प्रशासकीय चूक नसून शासनाच्या आर्थिक हिताशी संबंधित गंभीर बाब आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून वसुलीच्या प्रत्येक टप्प्याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी आता अधिक जोर धरू लागली आहे.

■ दंडवसुलीचा कालबद्ध आराखडा तयार केला होता का?

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ नुसार एवढ्या मोठ्या दंडाच्या वसुलीसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्यात आला होता का? कोणत्या अधिकाऱ्यावर कोणती जबाबदारी निश्चित करण्यात आली होती? वसुलीचा आढावा किती वेळा घेण्यात आला? की केवळ फाईलींची देवाणघेवाण, पत्रव्यवहार आणि कागदोपत्री हालचाली यांनाच कारवाईचे स्वरूप देण्यात आले? या सर्व प्रश्नांची अधिकृत उत्तरे देण्याची वेळ आता महसूल प्रशासनावर आली आहे.

■ महसूल विभागाची 'शहागिरी' की नियमित प्रक्रिया?

दरम्यान, दंडग्रस्त चांडक यांच्या निवासस्थानी रात्रीच्या वेळी महसूल विभागातील कर्मचारी काही कागदपत्रांच्या फाईली घेऊन गेल्याची चर्चा तहसील कार्यालय परिसरात रंगत आहे. त्या भेटीचा उद्देश नोटीस बजावणे होता, की न्यायालयीन प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे देणे, याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध नाही. या चर्चांची स्वतंत्र पुष्टी झालेली नसली, तरी या घटनेमुळे महसूल विभागाच्या भूमिकेबाबत विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

एमबीबीएस 'मॅनेजमेंट कोटा'च्या आमिषाने २९.१० लाखांची फसवणूक

नीटमध्ये कमी गुणांवर प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासन

-इंदोर येथील सात जणांवर गुन्हा दाखल

अमरावती/प्रतिनिधीः-

मुलीला डॉक्टर बनविण्याच्या पालकांच्या स्वप्नाचा गैरफायदा घेत एमबीबीएस प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवत अमरावतीतील एका दुग्धव्यावसायिकाकडून तब्बल २९ लाख १० हजार रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी इंदूर येथील एका महिला डॉक्टरसह सात जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून आर्थिक व्यवहारांचा तपास सुरू केला आहे.



गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ओम कॉलनी येथील रहिवासी सोनल हरीराज तिवारी यांनी याबाबत तक्रार दिली आहे. त्यांच्या मुलीने जून २०२४ मध्ये नीट परीक्षा दिल्यानंतर कमी गुण असूनही छत्तीसगडमधील नामांकित वैद्यकीय महाविद्यालयात मॅनेजमेंट कोट्यातून एमबीबीएस प्रवेश निश्चित करून देण्याचा दावा आरोपींनी केला होता. त्यासाठी विविध टप्प्यांत मोठी रक्कम भरण्यास सांगण्यात आले.

आरोपींच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून तिवारी यांनी एकूण २९.१० लाख रुपये दिले. मात्र, प्रवेश प्रक्रिया पूर्ण न करता आरोपींनी वेळोवेळी नवीन कारणे सांगून जवळपास दोन वर्षे टाळाटाळ केली. अखेर प्रवेशही मिळाला नाही आणि दिलेली रक्कमही परत करण्यात आली नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची खात्री झाल्यानंतर तिवारी यांनी ☞(पान २ वर)

कठोरा रोडवर सापडला अज्ञात तरुणाचा कुजलेला मृतदेह

मृत्यूचे गूढ उकलण्याचे पोलिसांसमोर आव्हान

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरालगतच्या कठोरा रोडवरील एका खासगी शाळेजवळ अज्ञात तरुणाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने बुधवारी परिसरात एकच खळबळ उडाली. मृतदेहाची अवस्था विद्रूप असल्याने हा मृत्यू काही दिवसांपूर्वी झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात हत्या, अपघात किंवा अन्य कोणतीही शक्यता नाकारलेली नसून सर्व अंगांनी तपास सुरू करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे ठाणेदार पुनीत कुलटे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर वरिष्ठ अधिकारी, फॉरेन्सिक ☞(पान २ वर)

लक्ष्मीनगरातील नाल्यात पाच महिन्यांचे अर्भक सापडले

गाडगेनगर पोलिसांचा तपास सुरू

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरातील लक्ष्मीनगर परिसरातील एका लहान नाल्यात बुधवारी सकाळी मानवी अर्भक आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, हा अर्भक सुमारे पाच महिन्यांचा असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. पुढील तपासासाठी अर्भकाचा डीएनए नमुना जतन करण्यात आला असून, वैज्ञानिक तपासाच्या माध्यमातून या प्रकरणाचा उलगडा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या घटनेप्रकरणी अज्ञात महिलेविरुद्ध ☞(पान २ वर)

श्याम इंडो फेबच्या गोदामातून ३७ लाखांच्या यंत्रसामग्रीची चोरी

-कंपनी चार वर्षांपासून बंद

नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-

नांदगावपेठ पंचतारांकित एमआयडीसीमधील गेल्या चार वर्षांपासून बंद असलेल्या श्याम इंडोफॅब प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या गोदामातून तब्बल ३७ लाख ☞(पान २ वर)

■ ही कंपनी निर्मल उज्ज्वल समूहाने मागील वर्षी विकत घेतली होती.परंतु काही कालावधीत ती बंद पडली. सध्या निर्मल उज्वल को ऑप सोसायटीवर गंडांतर आल्यामुळे ठेवीदारांची ओरड सुरू असतांनाच हा सर्व प्रकार घडल्याने या चोरीच्या घटनेकडे संशयाच्या नजरेने बघितल्या जात आहे.

■ सुरक्षा रक्षकांची चौकशी-

याठिकाणी तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकांची नांदगाव पेठ पोलिसांनी कसून चौकशी सुरू केली असून सुरक्षा रक्षकांकडून माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. दोन दिवस पोलिसांनी सर्व सुरक्षा रक्षकांची चौकशी पूर्ण केली असून अद्याप पोलिसांना त्यांच्या कडून योग्य ती माहिती प्राप्त झाली नाही.

आज तिवसा शहर बंदची हाक

तिवसा/प्रतिनिधीः-

देशाची राजधानी दिल्लीत गेल्या महिण्याभऱ्यापासून सुरु असलेल्या आंदोलनातील सहभागी विध्यार्थ्यांवर पोलीसांनी केलेल्या लाठीचार्ज कारवाई विरोधात उद्या गुरुवार रोजी दुपारी १२ वाजता तिवसा शहर कडकडित बंदची हाक देण्यात आली. विध्यार्थ्यांच्या समर्थनात पेट्रोल पंप चौकात निषेध आंदोलन असून या आंदोलनात सर्व विध्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन ☞(पान २ वर)

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

अमरावती /प्रतिनिधीः-:

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे गुरुवार, दि. २३ जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार, बावनकुळे सकाळी १०.३० वाजता तिवसा तहसील कार्यालयात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियानास उपस्थित राहतील. दुपारी १२ वाजता अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथील छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान शिबीराचे उद्घाटन करतील. हे शिबीर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आले आहे. दुपारी ३ चिखलदरा येथील पोलीस स्टेशनच्या कवायत मैदानावर आयोजित छत्रपती शिवाजी महाराज ☞(पान २ वर)

पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा; खरीप पिकांना जिवदान

टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-

टाकरखेडा संभू परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी वर्ग चिंतेत होता. मात्र सोमवारपासून पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने खरीप हंगामातील पिकांना जिवदान मिळाले असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी कापूस, सोयाबीन आणि तूर या पिकांची मोठ्या प्रमाणावर पेरणी केली होती. पेरणीनंतर पावसाने ☞(पान २ वर)

खचलेल्या विहिरीची नगराध्यक्षांकडून पाहणी

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः- चांदूर रेल्वे नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष प्रियांका निलेश विश्वकर्मा यांनी २१ जुलै रोजी सकाळच्या सुमारास शहरातील विविध भागांची पाहणी करून सुरू असलेल्या व प्रलंबित नागरी कामांचा आढावा घेतला. यावेळी उर्दू शाळेसमोरील खचलेल्या विहिरीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यानंतर मेटे ☞(पान २ वर)

शासकीय निधी खासगी बँकांमध्ये का?

डीपीसी बैठकीत, आ. संजय खोडके व आ. बच्चू कडूंचा संतप्त सवाल

-पालकमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

अमरावती/प्रतिनिधीः-

अमरावती येथे झालेल्या जिल्हा नियोजन समिती (डीपीडीसी) बैठकीत विधान परिषदेचे सदस्य बच्चू कडू आणि आमदार संजय खोडके यांनी राज्य व केंद्र शासनाकडून जिल्ह्याच्या विकासासाठी प्राप्त होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या शासकीय निधीबाबत अत्यंत गंभीर मुद्दा उपस्थित केला. शासनाच्या आर्थिक नियमांनुसार हा निधी शासकीय अथवा राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये जमा करणे बंधनकारक असताना, काही विभागांनी तो थेट खासगी ☞(पान २ वर)

■ शेतकऱ्यांची बँक शासकीय ठेवींना वंचित

याच बैठकीत बच्चू कडू यांनी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचाही मुद्दा ठामपणे मांडला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सर्वाधिक आधार देणारी ही बँक असूनही शासकीय ठेवींच्या बाबतीत तिच्यावर अन्याय होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

हिवरखेड अपघातात सुनेपाठोपाठ सासऱ्याचाही मृत्यू

बेलोरा गावात एकाच वेळी अंत्यसंस्कार

मोर्शी/प्रतिनिधीः- मोर्शी येथून अवघ्या दहा किमी अंतरावर असलेल्या हिवरखेड येथील बस थांब्यासमोर दि.२१जुलै रोजी आयशर ट्रकने पॅसेंजर ऑटोला धडक दिल्याने झालेल्या अपघातात शितल रवींद्र ताथोडे रा.बेलोरा (लोणी)या ३५ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला. रात्री बारा वाजता याच अपघातातील मृतक महिलेचे सासरे आबाराव पुंडलिकराव ताथोडे वय ६९ यांचा जिल्हा सामान्य रुग्णालयात मृत्यू झाला. तर आकाश ☞(पान २ वर)

अचलपूर शहरात महाराजस्व समाधान शिबीराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अचलपूर/प्रतिनिधीः-

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अचलपूर शहरातील महालक्ष्मी सेलिब्रेशन हॉलमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.या शिबीरात अचलपूर व चांदूर बाजार तहसील कार्यालयाच्या वतीने नागरिकांना विविध शासकीय दाखले आणि महसुली सेवा उपलब्ध ☞(पान २ वर)